म. ग्रं. सं. ठाणें

विषय

लेखक भा.के.गांगन

सन

लय क्रमांक

पुस्तकाचें नांव

भाग २

३१

कादं

To,

The Hon. K. T. Telang,

a humble token of my esteem

B. K. Gangbai

22/3/85

# वधूदर्पणमाला.

## ५.

---

# आनंदीबाई.

---

भाग पहिला.

---

हें पुस्तक

**भानु केशव गांगनाईक**

यांनीं

**श्री द्वारकानाथ गंगोपाध्याय**

ह्यांच्या मूळ बंगाली ग्रंथाच्या आधारानें लिहिलें.

---

अरक्षिता गृहे रुद्धाः पुरुषैराप्तकारिभिः ॥
आत्मानमात्मना यास्तु रक्षेयुस्ताः सुरक्षिताः ॥ १ ॥
(मनु.)

कोंडून ठेविल्यानें, स्त्रीचें रक्षण कधीं नव्हे जाण ॥
ती करिल आत्मरक्षण, तेव्हां तद्रक्षणीं नको आण ॥ १ ॥

आवृत्ति पहिली—१००० प्रती.

सन १८८५.

किंमत १२ आणे.

मुंबईमध्यें
"इंडियन प्रिंटिंग" छापखान्यांत छापिलें.

---

(सर्व प्रकारचे हक्क ग्रंथकर्त्यानें राखून ठेविले आहेत.)

परमसन्मान्य

# रा. रा. नारायण महादेव परमानंद,

ह्यांस,

त्यांच्या अंतःकरणाची प्रेमळता आणि
स्वभावाची अत्यंत सरळता,

हे

अनुपम गुण पाहून,

**अत्यंत पूज्यभावपूर्वक**

हें लहानसें पुस्तक

मीं

**समर्पण केलें आहे.**

# वधूदर्पणमाला.

ह्या मालेचे खालीं दिलेले अंक विक्रीस तयार आहेत. ते या पृष्ठाचे मागें लिहिलेल्या ठिकाणीं विकत मिळतील.

३. स्त्रीधर्म.–ह्यांत मनुस्मृति आणि महाभारत यांत सांगितलेले स्त्रियांचे धर्म, मूळ संस्कृत श्लोक रूपानें सांगून, त्याचा अर्थ देऊन, शिवाय त्यावर मनांत ठसे अशी बोधपर व्याख्या केली आहे. किंमत ४ आणे; ट. ख. ०॥. आणा.

४. सद्गुणी सून.–ह्यांत एका उत्तम सुनेच्या वर्तनाचें वर्णन असून, त्याचें कथानक हृदयद्रावक व मनोरंजक आहे. नायिकेचें जें एकंदर चरित्र वर्णिलें आहे, तें आमच्या स्त्रियांना अनुकरणीय आहे. त्यावरून, कुटुंबांतल्या एका चांगल्या माणसाच्या योगानें इतरांस किती सुख होतें, आणि किती साह्य मिळतें, हें चांगलें लक्षांत येईल. किंमत १४ आणे; ट. ख. १॥ आणा.

५. आनंदीबाई.–ह्या गोष्टीवरून, काटकसरीनें खर्च केल्यानें मनुष्यांचे स्थितींत किती फेरबदल होतो, आणि तीं किती सुखी होत असतात, हें स्पष्ट रीतीनें दाखविलें आहे. शिवाय स्त्रीपुरुषांचें ऐक्य असणें हेंच संसार करण्याचें उत्तम साधन आणि उत्तम फल आहे, असें दाखवून दिलें आहे. किं. १२ आणे; ट. ख. १ आणा.

हीं पुस्तकें वेगळीं वेगळीं चित्रविचित्र कागदी वेष्टणानें जाड पुठ्ठा घालून बांधविलीं आहेत. हींच तीन्ही, कापडानें एकत्र बांधलेलीं आणि वर सोनेरी अक्षरें व नकशीचे ठसे उठविलेलीं घेतल्यास, किं० १ रु. १२ आणे; ट. हां. २ आणे पडतील. तीन्ही एकदम घेण्यांत वेष्टण चांगलें मिळून एकंदरींत ३ आणे कमी पडतील.

# हीं पुस्तकें विकत मिळण्याचीं ठिकाणें.

## मुंबई.

"इंदुप्रकाश" छापखाना.—कावजी पाटलाच्या तलावाचा रस्ता.
"नेटिव ओपिनियन" " —गिरगांव, पोस्ट हपिसाजळ.
"इंडियन प्रिन्टिंग" " —गिरगांव, पालवाचा रस्ता.
"सुबोधप्रकाश" " —चिंच्याचे बाजारा समोर.
"दीनबंधु" " —भायखळा, सांकळी तलावाजवळ.
"सुबोधपत्रिका" कचेरी.—पालवाचा रस्ता.
"शेतकऱ्यांचा कैवारी." " —उमरखाडी.
"विविधज्ञानविस्तार" " —काळकादेवीचा रस्ता.
"आत्माराम सगुण आणि कंपनी." — "
"गोपाळ, नारायण आणि कंपनी." — "
"आर्यन् ट्राक्ट सोसायटी." — "
"प्रार्थनासमाज मंदिर." —गिरगांव.

## पुणें.

"आर्यभूषण" छापखाना.—बुधवार पेठ.
"किताबखाना" — "
"विष्णु गणेश जोशी" बुकसेलर— "

## रत्नागिरी.

"बकुल" छापखाना.

शाळेंत जाणाऱ्या मुलांस हीं पुस्तकें हवीं असल्यास त्यांनीं, मुंबई प्रार्थनासमाजाजवळ रा. रा. लक्ष्मण गणेश मुंज यांच्या नांवें मागविल्यास, त्यांना डांक हांशील पडणार नाहीं.

[stamps]

# प्रस्तावना.

स्त्रीशिक्षण हा विषय आतां सर्वत्र इतका ठाऊक झाला आहे कीं, त्या संबंधानें येथें विशेष ऊहापोह करून लिहिण्याची आतां मुळींच गरज उरली नाहीं. देशसुधारणेस आवश्य गोष्टी कोणत्या, ह्या संबंधें मतभेद उत्पन्न होणें हें साहजिकच आहे. परंतु, आजकाल सुधारणेच्या शिखरास जाऊन पोंचलेल्या राष्ट्रांच्या इतिहासाचें ज्ञान अंशतः तरी अवगत होऊन, ज्यांची बुद्धि प्रगल्भ झाली आहे, त्यांचे विचार स्त्रीशिक्षणाच्या संबंधानें बहुधा एकसारखे आहेत. आणि साहचर्यानें ते इतके पसरत चालले आहेत कीं, जुन्या प्रतीच्या लोकांस देखील, ते अलिकडेस बरेच आवडूं लागले आहेत.

प्रस्तुत ग्रंथमालेच्या कर्त्याचे मनांत स्त्रीशिक्षणाची आवश्यकता पूर्णपणें बिंबून त्यानें ह्या देशसुधारणेच्या अमोल्य साधनास स्वशक्त्यनुरूप हातभार लावण्याचा निश्चय केला आहे. आणि ह्या त्याच्या निश्चयाचें पहिलें फळ 'वधूदर्पण' हा ग्रंथ होय. हा ग्रंथ त्यानें तीन वर्षांचे पाठीमागें छापून प्रसिद्ध केला. आणि तो करितेवेळीं त्यास आपल्या श्रमाचें चांगलेंसें चीज होईल, असें वाटलें नव्हतें. याकरितां त्यानें आपल्या पहिल्या ग्रंथाला 'वधूदर्पण, भाग १; किंवा वधूदर्पणमाला १,' असें कांहीं एक म्हटलें नव्हतें. परंतु तो ग्रंथ प्रसिद्ध होऊन पुरे सहा महिने देखील लोटले नाहींत तोंच, त्याच्या सर्व प्रती खपून जाऊन, अजूनही त्याचेसाठीं धूम मागण्या

येतच आहेत. हा त्याचा पहिला यत्न चांगला सिद्धीस गेला असें पाहून, त्यास कृतनिश्चयानुरूप पुढील प्रयत्नास लागण्यास उमेद आली. पण पुढें एका बंगाली बाबूचा आणि त्याचा थोडासा परिचय होऊन बंग भाषेचें कांहींसें ज्ञान त्यानें प्राप्त करून घेतलें. त्यामुळें, त्या भाषेंत स्त्रीशिक्षणवृद्धयर्थ लिहिलेले ग्रंथ त्याला पहाण्यास सांपडले. त्या ग्रंथांतून कांहीं ग्रंथ "**न्याशनल इंडियन असोशिएशन**" नामक मंडळीच्या बंगाल प्रांतांतील शाखेनें, कुलीन व प्रतिष्ठित स्त्रियांस वाचण्याकरितां ह्मणून बक्षिसें देऊन प्रसिद्ध करविलेले होते. आणि त्या सर्व ग्रंथांस जगप्रसिद्ध व लोकहितचिंतक, **मिस मेरी कार्पेन्टर** बाई, जिनें हिंदू स्त्रियांची शोचनीय स्थिति सुधारण्यासाठीं आपलें सर्व आयुष्य खर्च केलें, त्या बाईचे स्मरणार्थ "**मेरी कार्पेन्टर ग्रंथावली**" असें नांव दिलें आहे. त्या ग्रंथावलींतून "**मेजो बोऊ**" आणि "**सुरुचिर कुटिर**" आणि अन्य पुस्तकांपैकीं "**नारीधर्म**" अशा तीन पुस्तकांनीं त्याचें मन विशेष वेधलें. हीं पुस्तकें तेथील विख्यात विद्वान् गृहस्थांनीं लिहिलेलीं आहेत. ह्या पुस्तकांविषयीं, त्या प्रांतांतील लोकांच्या मनांत इतकी प्रीति आणि पूज्यबुद्धि उत्पन्न झाली आहे कीं, थोड्याच अवकाशांत त्यांच्या दोन दोन, तीन तीन आवृत्ति निघून पार झाल्या. ह्मणून प्रस्तुत ग्रंथकारानें आपलें लिहून तयार केलेलें पुस्तक, ह्मणजे **वधूदर्पणमाला. २**, हें कांहीं दुसऱ्या कारणामुळें एकीकडेस

ठेवून, प्रथम ह्या तीन पुस्तकांचा लाभ आपल्या महाराष्ट्रीय भगिनींस करून देण्याचें मनांत आणलें. आणि त्याचीं "सद्गुणी सून," "आनंदीबाई" आणि "स्त्रीधर्म," अशीं हीं तीन फळें होत.

आतां हीं भाषांतरें ह्मणजे शब्दशः आहेत असें नाहीं, तर, ह्या प्रांतांतील चाली वहिवाटींस आणि रीतरिवाजांस, जितकें साधलें तितकें धरून, त्यांची प्रतिमा मराठींत उतरण्यासाठीं, प्रस्तुत ग्रंथकारास पुष्कळ ठिकाणीं भाषांतरविषयक पुस्तकांचें पूर्वस्वरूप बरेंच पालटावें लागलें आहे. आणि कित्येक स्थळीं तर अर्थाची विसंगतता भासूं नये ह्मणून, आणि विवक्षित भाग अधिक मनोरंजनावह व्हावा ह्मणून, जागजागीं नवीन भरही घालावी लागली आहे. असो. तर, ही जी त्यानें आपल्या अल्प सामर्थ्याप्रमाणें स्वदेशभगिनींची सेवा केली आहे, तिचा कांहीं तरी उपयोग झाला, असें कळल्यानेंच ग्रंथकर्ता कृतकृत्य होईल.

"वधूदर्पण" लिहितेवेळीं ग्रंथकर्त्याचा पहिलाच प्रसंग होता. पण त्यानंतरचा जो कांहीं थोडाबहुत अनुभव त्याला मिळालेला आहे, त्यावरून, हीं पुस्तकें त्यानें जपून लिहिण्याचा यत्न केला आहे; तरी, अजूनही यांत पुष्कळच दोष राहिले आहेत, हेंही ग्रंथकर्त्याला कळतें आहे, ह्मणून त्या सर्वांचें जोखीम तो आपले मांथीं घेण्यास तयार आहे. आणि जें कांहीं रहस्य आहे असें वाटत असेल, त्याचा सगळा वांटा, ग्रंथकर्त्याचे मित्र आणि पुस्तकसमूहाचे जनक, रा. रा. विना-

**यक्क कोंडदेव ओक**, ज्यांनीं आपला अमूल्य वेळ निवळ स्नेहभावानें खर्चून, हे मालेचे अंक छापत असतां तपासले, त्यांचा आहे, असें सांगून ग्रंथकर्ता त्यांचे आभार मानितो.

ह्या पुस्तकामध्यें, आनंदराव आणि आनंदीबाई यांच्या लग्नसमयीं जो उपदेशाचा भाग आला आहे, तो, ग्रंथकर्त्याचे मित्रद्वय, रा. रा. **यशवंत पुरुषोत्तम मणेरीकर** यांनीं, रा. रा. बळवंत भाऊ नगरकर यांच्या द्वितीय लग्न प्रसंगीं वधूवरांस जो उपदेश केला होता, त्यांतला आहे. हा कांहीं महिन्यांपूर्वी सुबोधपत्रिकेंत छापला होता, हा त्यांचेच हातें थोडासा फेरफार करवून येथें घातला आहे.

हीं तीनही पुस्तकें जानेवारीचे १ ले तारखेसच बाहेर पडावयाचीं, परंतु तीं येथील "**डेक्कन् व्हर्नाक्यूलर ट्रान्सलेशन सोसैटी**" नामक ग्रंथोत्तेजक मंडळीकडे आश्रयार्थ पाठविलीं होतीं. त्यामुळें उशीर लागला. सदर मंडळीनें त्यांपैकीं, "**सद्गुणी सून**" हें पुस्तक पसंत करून त्याचा निकाल केला आहे, व उदारपणानें त्यास फार चांगला आश्रय दिला आहे; ह्याबद्दल ग्रंथकर्ता त्या मंडळीचे फार फार उपकार मानितो. बाकी राहिलेल्या दोन पुस्तकांवर परीक्षकांचे अभिप्राय येऊन निकाल लागण्यास अजून बराच वेळ लागेल, असें समजून ग्रंथकर्त्यानें वर्गणीदारांचें नुकसान होऊं नये ह्मणून आपणांकडून होईल तितकी जलदी करून हीं पुस्तकें प्रसिद्धीस आणलीं आहेत. तरी सदर कारणानें उशीर लागल्याबद्दल आगाऊ आश्रयदाते त्यास क्षमा करतील अशी आशा आहे.

शेवटीं, "इंडियन प्रिंटिंग प्रेस" चे मालक रा. रा. सदानंद बाळकृष्ण पालेकर यांनीं, हीं पुस्तकें अशा सुंदर रीतीनें छापण्याचे कामीं साहाय्य केलें, आणि मालेचें पहिलें पुस्तक लोकांपुढें ठेवण्यास जसें उदारबुद्धीनें उत्तेजन दिलें होतें, त्याचप्रमाणें याही प्रसंगीं तें दिलें, याबद्दल ग्रंथकर्ता त्यांचा फार फार आभारी आहे. तसेंच या पुस्तकांच्या मुखपृष्ठावरील चित्र रा. रा. दौलतराव रामकृष्ण यांनीं रेखून दिलें होतें, आणि त्या रेखणीप्रमाणें रा. रा. श्रीरंग रघुनाथ व रा. रा. तुकाराम रामकृष्ण कोरगांवकर, यांनीं तें कोरून तयार केलें; ह्मणून ग्रंथकर्ता त्या सर्वांचाही फार उपकारी आहे.

याशिवाय ग्रंथकर्त्याच्या ज्या ज्या मित्रांनीं, हीं पुस्तकें प्रसिद्धीस आणण्याचे कामीं, अनेक प्रकारें साहाय्य केलें, त्या सर्वांचा तो अतिशय आभारी आहे. आणखी, ज्याच्या कृपाप्रसादानें ह्या ग्रंथकर्त्यास हे ग्रंथ करण्याची स्फूर्ति झाली, आणि ज्या मित्रमंडळीच्या अंतःकरणांत त्याला साह्य करण्याची प्रेरणा झाली, त्या सर्व मंगलमय जगदीश्वराचे अप्रतिम उपकार अनन्यभावें कबूल करून, आणि त्याचे आभार मानून, ही प्रस्तावना ग्रंथकर्ता येथें समाप्त करितो.

मुंबई, खत्तरआळी, २४.
ता० १ फेब्रुआरी १८८५.

तीवरून मात्र या गोष्टीचें कांहीं प्रमाण सांपडतें. भांडण होऊं लागलें ह्मणजे त्यानें आपले डोळे तांबडे तुंद करावे, आणि ह्मणावें, "काय करूं! मी ख्रिस्ती पडलों, तेव्हां मला ईश्वराच्या दहा आज्ञा पाळाव्या लागतात ; नाहीं तर एका क्षणांत या गुलामांचा निर्वंश करून सोडला असता! मी वीराचा बच्चा; हें या बेल्यांना अजून कळून आलें नाहीं; बंदूक ह्मटली ह्मणजे आमच्या हाताचा मळ; एक गोळी सोडीन तर पंधरा वीस असामींस पाणी मागावयास देणार नाहीं! परंतु अशीं माकडें मारून हात मलिन करावे कोणीं? असा विचार करून यांजवर दया करण्यास जावें, तों हे बेटे अधिकाधिकच डोक्यावर बसतात." अशी त्याची नेहमीं वल्गना चालत असे. समयीं ही त्याची वल्गना पत्करेल, परंतु त्याचे मुलगे व बायको पहावी तर तीं केवळ जळतीं आग होती. असो.

या भागांतील रहाणारे लोक बहुतेक हलक्या प्रतींतीलच होते. ते बिचारे काबाडकष्ट करून आपलें पोट जसेंतसें भरीत ; तेव्हां या शेंदाडशिपायाचे जुलमामुळें ते बिचारे अगदीं चेंगरून गेले होते. परंतु कोणाचाही जुलूम हा फार दिवस टिकत नाहीं; त्या गरीब बिचाऱ्यांचें रक्षण त्याच्या जुलमापासून होण्याकरितां, तेथें अकस्मात् एक गोष्ट घडून आली. ती अशी: एके दिवशीं रात्रीचे प्रहरीं ड्यानियलचे घरावर दगड, रेती, हाडें इत्यादिकांचा वर्षाव होऊं लागला. हा वर्षाव कोठून होतो व कोण करतो, याचा तर्क कांहींच

करितां येईना. ड्यानियल व त्याचे मुलगे हे शिव्यागाळी देत देत शोध लावण्याचे हेतूनें घराबाहेर पडले; परंतु हे बाहेर जसे आले तसा तो वर्षाव अधिकाधिकच होऊं लागला, आणि त्यांपैकीं कितीएक दगड यांचे अंगावरही येऊं लागले. हें जेव्हां त्यांनीं पाहिलें, तेव्हां ते भयभीत होऊन, घरांत पळून गेले. शेवटीं शेजारपाजारचे लोक एकत्र होऊन त्यांचे साह्यार्थ धांवून आले; तेव्हां कांहीं वेळानें वर्षाव व्हावयाचा बंद झाला. एवढ्या मध्यानरात्रीचे समयीं शेजारचे लोक आपल्या साह्यार्थ धांवून आले, याबद्दल ड्यानियल यानें यत्किंचितही त्यांचे उपकार मानिले नाहीत! त्याला वाटत असे कीं, मी ह्मणजे मोठा साहेब, आणि हीं काळीं माकडें. आमची सेवाचाकरी करण्याकरितां व आमच्या उपयोगीं पडण्याकरितांच हीं केवळ जन्मास आलीं आहेत; अशा लोकांचे जर उपकार मानावे, तर मग घरच्या कुत्र्यामांजराचे देखिल उपकार मानावयास नकोत काय?

पुन्हा दुसरे दिवशीं सकाळीं ड्यानियलचे अंगांत पूर्वजांचे वीरश्रीचा गर्व खेळूं लागला; त्यानें पहिल्यानें पुष्कळ हात पाय आपटून "यंव करीन, त्यंव करीन; पण या द्वाड भुताची एके दिवशीं खोड जिरवून टाकीन," अशी पुष्कळ वल्गना केली. आणि तदनंतर बंदुकीस हात घालून तिला पुष्कळ दिवसांचा गंज चढला होता, तो साफ करूं लागला. ड्यानियल हा रोमनक्याथलिक पंथांतील ख्रिस्ती होता, तेव्हां त्यास सैतानाचें ह्मणजे भुतांचें भय विलक्षण असावयाचेंच, यांत कांहीं वि-

शेष नवल नाहीं. बंदूक साफ करतां करतां त्याचे मनांत आलें कीं, जर हें खरोखरचें भूत असलें, आणि जर कां याला मी गोळी घातली, तर निरर्थक आपल्या हातींच आपला नाश करून घेतल्यासारखें होईल; असा विचार करून त्यानें बंदूक साफ करण्याची तशीच ठेविली. दुसरें त्यानें असें पाहिलें कीं, या आजूबाजूचे लोक फार मलिन व पापी आहेत. त्यांचीं घरें पाहिलीं तर तीं इतकीं घामट असतात कीं, जणुं हीं भूतांचींच घरें आहेत कीं काय असें वाटतें; तेव्हां अशा घाणेरड्या ठिकाणीं भुतें राहिलीं, तर त्यांत नवल तें कोणतें? जर आजुबाजूचे लोक इतक्या घाणेरड्यापणानें राहातेना, तर आज हा असा प्रसंग मजवर कां ओढवला असता? असें मनांत आणून शेजारचे लोकांना तो शिवीगाळ करूं लागला. तें ऐकून त्याच्या शेजाऱ्यांपैकीं कोणी एकानें देखील चकार शब्द कसा तो काढला नाहीं. मध्यें दोन दिवस सामसुमीचे गेल्यावर, तिसरे दिवशीं रात्रीं पुन्हा पहिल्याप्रमाणेंच भूतचेष्टा होऊं लागली. शेजारच्या लोकांच्या अतिशय मळीनपणा, हाच या भूतचेष्टेला मूळकारण होय, अशी ड्यानियल साहेबाची पक्की खात्री झाली; आणि त्याकरितां तो दिवसेंदिवस जसजशा शेजारचे लोकांना फारच अचकटविचकट व अभद्र अशा शिव्या देऊं लागला; तसतशा इकडे भूतचेष्टाही उत्तरोत्तर अधिकाधिक होऊं लागल्या. होतां होतां भूतचेष्टेशिवाय एक रात्रही सुनी जाईना.

ड्यानियल साहेबांनीं हा त्रास निवारण करण्याकरितां पुष्कळ उपाय योजिले; कितीएक असामींचा संशय घेऊन त्यांजवर फिर्यादीही केल्या; दारीं रामोशी बसविले; पण कांहीं केल्या उपद्रव ह्मणून कमी होईना. शेवटीं निरुपाय होऊन त्यांस एक भाड्याचा बंगला घेतला व तेथें रहावयास गेले, आणि हें घर विकून टाकण्याकरितां वर्तमानपत्रांतून जाहिराती दिल्या. सर्व शहरभर दौंडी पिटविली; पण भुतांचें घर असें समजून कोणीही तें विकत घेण्यास धजेना. असो. याप्रमाणें पुष्कळ दिवसपर्यंत त्याला तें घर कुलूप घालून तसेंच रिकामें ठेवावें लागलें.

## प्रकरण तिसरें.

---

### निराश्रित मुलगा.

आनंदराव फडणीस या नांवाचा एक मुलगा होता. सन १८७० सालीं त्याचें सोळा सतरा वर्षांचें वय असतां तो मुंबई शहरामध्यें आला. आनंदराव हा मूळचा नगर जिल्ह्यांतील कोपरगांवचा राहणारा होता. आणि त्याचा बाप हा कोपरगांव येथील एका संभावित व फार नावाजलेल्या अशा कुटुंबापैकीं एक होता. तो पैसा मोठ्या विलक्षण रितीनें मिळवीत असे, पण

मागें खर्च फार असल्यामुळें शिल्लक कांहींच राहीना. त्याचे पोटीं आनंदराव हा एकुलता एकच कायतो मुलगा होता. आनंदराव दहा वर्षांचा असतां, त्याची आई परलोकवासी झाली. बायको वारल्यावर आनंदरावाचा बाप थकला, आणि पहिल्याप्रमाणें पैसे मिळविण्याची त्याची सर्व उमेद खचून गेली. मिळकत कमी झाली त्या मानानें वरचा खर्चही कमी झाला पाहिजे होता; पण पूर्वीपासून त्यांचा खर्चीक स्वभाव पडल्यावरून त्याचा खर्च कांहीं केल्यानें कमी होईना. शेवटीं त्याला कर्ज काढावें लागलें. आनंदराव यावेळीं नगरास राहून तेथल्या हायस्कुलांत इंग्रजीचा अभ्यास करीत होता. आनंदराव हा स्वभावानें मोठा बुद्धिमान्, सदाचारी, शांत आणि नम्र असा होता. तो ज्या ज्या वर्गांत शिकत जाई, त्या त्या वर्गांत हुशार मुलें असत त्यांत याची गणना होई. तो सोळा वर्षांचा असतां दुसऱ्या वर्गांत इंग्रजी सहावे इयत्तेचा अभ्यास करीत असे. या सुमारास दुर्दैवानें त्याच्या बापास मृत्यूनें गांठिलें. आनंदरावास अगदीं जवळचा असा आप्त कोणीही नव्हता; तेव्हां संसाराचें सर्व ओझें त्याचे एकट्याचेच माथीं पडलें. बाप वारला तेव्हां सोयरे धायरे लोकांनीं त्याला कोपरगांवास आणलें, आणि तीन चारशें रुपये खर्च करवून त्याजकडून बापाचें उत्तरकार्य करविलें. घरांत जीं वडिलोपार्जित भांडींकुंडीं होतीं, तीं सर्व त्याला या उत्तरकार्याचे खर्चाकरितां विकावीं लागलीं. बाप चार पांचशें रुपयांच्या कर्जाचें ओझें आपल्या

डोईवर ठेवून गेला आहे, हें आनंदरावाला तोंपर्यंत मुळींच ठाऊक नव्हतें; जर आनंदरावास ठाऊक असतें, तर त्यानें सोयरे धायरे लोकांच्या भरीस भरून पारलौकिक कृत्या निमित्त एवढा खर्च कधींच केला नसता. वार्षिक दोनएकशें रुपये उत्पन्नाचा त्याचा वडिलोपार्जित एक जमिनीचा तुकडा होता, त्यावर शाळेसंबंधी आपला सर्व खर्च चालेल, या भरंवशावर तो निश्चिंत राहिला.

बापाचें तें और्ध्वदेहिक सर्व कृत्य आटोपल्यावर, अभ्यास करण्याकरितां ह्मणून आनंदराव पुन्हा नगरास गेला. तेथें जाऊन त्यास दोन महिने देखील लोटले नाहींत, तोंच त्याच्या एका आताचे हुलकावण्यावरून बापाचे कर्जदारांनीं त्याचे स्थावर मिळकतीवर दावा केला; आणि त्याबद्दल त्याजवर फिर्याद मांडली आहे असें त्यास कळलें. शेवटीं कर्जदारांचे तर्फेचा निकाल होऊन त्यांनीं त्याची असलेली सर्व मिळकत जप्त करून आपले स्वाधीन करून घेतली; तेव्हां अर्थातच आनंदराव सर्वांशीं निराश्रित होऊन पडला. त्याला यापुढें मदत करील असा एक देखील मनुष्य राहिला नाहीं. आनंदराव हा अज्ञान सोळा वर्षांचा मुलगा, त्यांत चोहोंकडून विपत्तीनें अगदीं ग्रासून गेलेला, त्यास हाता तोंडाची भेट होण्यासही कोणताच मार्ग ह्मणून राहिला नाहीं, अशा संकटाचे समयीं ह्मटलें असतां मोठमोठे शाहाणे व पोक्त असे अनेक लोक अगदीं त्रासून जातात; पण आनंदराव हा अप्रौढ असतांही मोठा धोरणी व दूरदर्शी

होता; यामुळें या संकटसमयीं तो यत्किंचित्‌ही डगमगला नाहीं. कांहीं दिवस विचार करून त्यानें असें पाहिलें कीं, याउपर नगरास राहून आपला अभ्यास कोंणत्याही प्रकारें चांगल्या रीतीनें होणार नाहीं. येथें राहून दारोदार माधुकरी मागून ज्ञातिबांधवांचे उपहासास पात्र होण्यापेक्षां, कोठें तरी देशांतर करून तेथें उपासमार होऊन मृत्यु जरी आला तरी बेहत्तर आहे. मुंबई शहरामध्यें उदार अंतःकरणाचे व परोपकारी असे अनेक महात्मे सज्जन गृहस्थ आहेत ह्मणून सांगतात, तर तेथें जाऊन आपल्या संकटाची गोष्ट त्यांच्या कानावर घातली असतां, ते मदत करण्यास मागें घेतील असें वाटत नाहीं. असा विचार करून त्यानें मुंबईस येण्याचा बेत केला; परंतु यावेळीं त्याजपाशीं दोनच रुपये काय ते शिलक राहिले होते; आणि ते मुंबईपर्यंत आगगाडीचे भाड्यास अपुरे होते, ह्मणून त्यानें पायींच जाण्याचा विचार केला. इतकें लांब पायीं चालत जाण्याची सवय आनंदरावास कसली ती जन्मांत ठाऊक नव्हती, यामुळें मुंबईस येऊन पोंचावयास त्याला वीस दिवस लागले. एवढ्या दिवसांत त्याचे पदरीं जे दोन रुपये शिलकीस होते, त्यांतून एक पै देखील त्याला खर्च करावी लागली नाहीं. वाटेनें चालत येत असतां माधुकरी मागून त्यानें आपला उदरनिर्वाह केला. वाटेंत कोठें तर लागली असतां त्या तरीचें भाडें सुद्धां त्याला द्यावें लागत नसे. तरींत लोक बसले ह्मणजे कोण कोठें जाणार

याविषयीं परस्पर विचारपूस करीत असतात, त्याप्रमाणें एके ठिकाणीं तेथल्या तरवाल्यानें " तूं कोठल्या गांवीं जाणार? " ह्मणून आनंदरावास विचारलें, तेव्हां मी मुंबईस जात आहें असें त्यानें सांगितलें. सोळा वर्षांचा मुलगा आणि तो एवढ्या लांब पायीं चालला आहे, हें ऐकून सर्वांना मोठें नवल वाटलें. इतके हाल सोसून मुंबईस जाण्याचें कारण तरी काय? असा त्यांतून पुष्कळांनीं त्याला प्रश्न केला; परंतु उगाच कारणाशिवाय परकी गृहस्थांजवळ आपल्या दुःखाची गोष्ट सांगणें हें आनंदरावाला बरें दिसेना; आणि लोक तर जों जों त्याची सांगण्याची इच्छा नाहीं, असें पहात, तों तों त्याला ती सांगण्याविषयीं फारच आग्रह करीत, आणि त्यानें ती सांगितली नाहीं ह्मणजे ते उदासीन होत, व आपला तिरस्कार दाखवीत. शेवटीं असें झालें कीं, त्याला ती आपली कर्मकथा लोकांजवळ सांगणें भागच पडलें. अशा लहानशा वयामध्यें याच्या पुढील सर्व आशांची धूळधाणी झाली, हें ऐकून सर्वांना मोठें दुःख वाटलें. उंच कुळांतील श्रीमंत लोक सामान्य स्थितींतील लोकांस जितके कठीण हृदयाचे समजतात, तितके ते खरोखर पाहिलें असतां हृदयाचे कठीण मुळींच नसतात. पुष्कळ सुशिक्षित लोकांप्रमाणें त्यांना जरी नुस्ती तोंडाची वडबड करितां आली नाहीं, तरी त्यांचें अंतःकरण हें फार कोमल असतें, आणि अशी एकादी दुःखाची गोष्ट ऐकली, कीं तें तेव्हांच विरघळून जातें. याला दृष्टांत फार नको. त्याला पैलतीरीं उतरण्याबद्दल को-

ठल्याही तऱ्यानें त्याजपासून एक कवडी देखील कशी ती घेतली नाहीं. तरींत बसणारे उतारूलोक बहुतकरून सर्व सामान्य स्थितींतीलच होते, तरीही त्यांनीं आनंदराव या मुलाची अशी दुर्दशा झालेली ऐकून त्याला आपल्या घरीं न्यावें, त्याचा आदरसत्कार करावा, आणि त्याला जेऊं घालावें. एक एक तरीवर तर त्याला आपल्या घरीं घेऊन जाण्याविषयीं लोक इतकी ओढाताण करीत असत कीं, त्यांतून कोणाचे घरीं जावें आणि कोणाचे घरीं न जावें, याची त्याला मोठीच पंचाईत पडे. आपली दुःखदायक स्थिति ऐकून गरीब लोकांच्या अंतःकरणाला सुद्धां द्रव आला, आणि आपणास मदत करण्याकरितां त्यांनीं आपल्याकडून कोणत्याही रीतीचा यत्न करावयाचा ह्मणून ठेवला नाहीं, असें जेव्हां त्यानें पाहिलें, तेव्हां मुंबईस पोहोंचल्यावर तेथील लोकांकडून आपणास साहाय्य मिळण्यास यत्किंचित् देखील अडचण पडणार नाहीं, अशी आनंदरावाचे मनामध्यें बळकट आशा उत्पन्न झाली. याप्रमाणें ते जवळचे दोन रुपये तसेच पदरीं बांधून, आनंदराव मुंबईस सुखरूप येऊन पोंचला. एवढें मोठें प्रचंड शहर त्यानें पूर्वीं कधींच पाहिलें नव्हतें. मुंबईपासून दहा मैलांवर कुर्लें ह्मणून एक खेडेगांव आहे, तेथें तो एका भिक्षुक ब्राह्मणाचे घरीं आदले रात्रीं वस्तीस राहिला, आणि पहांटेस उठून मुंबईस यावयास निघाला, तो असा आठ वाजण्याचे सुमारास मुंबईत येऊन ठेपला. मोठमोठाल्या भव्य इमारती, रस्त्यांतून चालत जाणाऱ्या सुंदर सुंदर गाडी घोड्यांची दाटी,

इत्यादि चमत्कार पाहून ही खरोखरी लंकापुरीच आहे, असें आनंदरावास वाटलें. ज्या शहरांत इतक्या धनाढ्य शेट सावकारांची वस्ती आहे, त्या ठिकाणीं मजसारख्या यःकश्चित् निराश्रित मनुष्यास खरोखर आश्रय मिळाल्यावांचून रहाणार नाहीं, असें त्याला खचीत वाटलें. आदले रात्रीं वर सांगितलेल्या ब्राह्मणानें जरी त्याला पोटभर जेऊं घातलें होतें, तरी वाटेनें चालत आल्याचे श्रम झाल्यामुळें लवकरच त्याचे पोटांत अतिशय क्षुधा लागली. ह्मणून पहिल्यानें कोणा तरी यजमानाचे येथें जाऊन "भिक्षांदेहि" करून जठराग्नि शांत करावा, आणि नंतर कोठें तरी बिऱ्हाडाची सोय पहावी, असा त्यानें विचार केला. मोठमोठाले महाजन, शेटसावकार आणि रोजगारी गृहस्थ, ह्यांचेकडे आलिजा कारखाने असतात, ह्मणून अशांचे येथें पाहिल्यानेंच माधुकरी मागण्यास गेलें तर तेथें दाद लागण्यास उशीर लागेल, असें समजून मध्यम स्थितींतील गृहस्थ पाहून त्यांचेच येथें जावें असें त्याला वाटलें, आणि त्याप्रमाणें तो पुष्कळ घरें हिंडला; परंतु कोणी एकानें देखील त्याला घांसभर अन्न वाढलें नाहीं. तेव्हां निरुपाय होऊन मोठ्या महाजनांचे येथें जाऊन त्याला याचना करावी लागली; पण तेथेंही ज्यांचे ज्यांचे दारीं त्यानें जावें तेथें तेथें देवडीवरचे शिपायांनीं "कौन है? निकल जाव," असें दरडाऊन सांगून त्या बिचाऱ्यास हांकून द्यावें. शेवटीं गरीब बिचारा तो मुलगा भुकेनें अगदीं व्याकूळ होऊन खाणावळीचा शोध करीत करीत फणसवाडींतील एके खाणावळींत

गेला; परंतु तेथें चार आणे देऊनही त्याला पोटभर अन्न जेवायास मिळालें नाहीं. आनंदरावास गांठचे पैसे मोडण्याचा या ठिकाणीं हा पहिल्यानेंच प्रसंग आला, आणि हें पाहून त्याला अतिशयच दुःख वाटलें. जरकरतां लवकर कोठें आश्रय मिळाला नाहीं, तर पुढें कोणता उपाय करावा? एका खेपेचे जेवणाला जर चार आणे द्यावे लागले, तर या मानानें जवळ असलेले पैसे पुरे चार दिवस देखील पुरणार नाहींत; मग पुढें कोणता उपाय करावा? या काळजीनें आनंदरावाचें तोंड अगदीं उतरून गेलें. पूर्वी तो एवढ्या अडचणींत होता तरी संसाराचा मार्ग इतका बिकट आहे याचा अनुभव हावेळपर्यंत त्याला मुळींच आला नव्हता. पुढें आपली काय स्थिति होईल, याची कल्पना त्याचे समूर मूर्तिमंत उभी राहून त्याचे डोळे पाण्यानें भरून आले; परंतु हा समय चिंता करण्याचा किंवा रडण्याचा नव्हे, तर आपलें संरक्षण कसें होईल याबद्दल कांहीं तरी तोड काढण्याचा होता, ह्मणून पुन्हा एकदां जिवापलीकडे श्रम करून पहाण्याचा त्यानें निश्चय केला; परंतु यावेळीं देखील त्याचे सर्व यत्न आणि परिश्रम अगदीं निष्फळ झाले. कांहीं वेळानें संध्याकाळ होत आली, आणि हळू हळू रात्रही पडूं लागली, तेव्हां आतां रात्र कोठें व कशी घालवावी ही काळजी त्याचे मनामध्यें उत्पन्न झाली. सकाळचे वेळीं ज्या खाणावळींत जाऊन भोजन केलें होतें, तेथें पुनः तो गेला, आणि रात्रीची रात्र रहा-

ण्यापुरती जागा देण्याविषयीं तेथील यजमानाची त्यानें पायधरणी केली. मुंबईसारखी वस्ती, तेथें समयीं एका वेळेस जेऊं घालतील, परंतु निजूं देणार नाहींत, अशी लोकस्थिति आहे, व ती सर्वत्र जगजाहीर आहे तेव्हां निजण्याचे संबंधेंही तेथें त्याची निराशा झाली, असें पाहून त्यानें आपले नेत्र पुन्हा एकदां अश्रूंनीं भरून आणले.

वरतीं अफाट आकाश व हृदयामध्यें अपार चिंता, अशा स्थितींत आनंदरावानें पायां भोंवतीं आपले दोन्ही हात गुंडाळून घेतले आहेत, व मान खालीं घालून हनवटी गुडघ्यावर टेंकून विचार करीत एका रस्त्याचे बाजूला बसला आहे, आणि डोळ्यांतून पाण्याचा लोट एकसारखा चालला आहे, इकडे रस्त्यांतून कितीएक लोक आपापल्या घरीं चालले आहेत, कितीएक याला रडत असतां पहात आहेत, परंतु त्यांतून एक देखील पुढें येऊन, "बाबा, तूं रडतोस कां," ह्मणून विचारीत नाहीं. मुंबईसारख्या व्यापारी शहरामध्यें पाहिलें असतां जे ते आपापल्या कामामध्यें अगदीं गढून गेलेले असतात; यामुळें लोकांच्या दुःखाचें कारण विचारण्यास त्यांना फारसा वेळ नसतो. जितके ह्मणून लोक तेथें येत, तितके घाई घाईनें निघून जात. त्यांतून कोणी तरी पुढें येऊन मला माझ्या दुःखाचें कारण विचारील, असें आनंदरावाला प्रत्येक खेपेस वाटे, परंतु कोणी एकानें देखील पुढें येऊन त्याला कुशल प्रश्न कसला तो विचारला नाहीं. असा बराच वेळ गेल्यावर अगदीं काळोख

पडत आला, असें जेव्हां आनंदरावानें पाहिलें तेव्हां त्याला पराकाष्ठेचा हुंदका येऊन तो अतोनात रडूं लागला. त्यावेळीं रस्त्यांतून चालत जाणारा एक गृहस्थ आनंदरावाचे जवळ आला आणि 'तूं कां रडतोस, तुला काय झालें,' असें त्यानें त्याला विचारलें. त्यासरसें आनंदरावानें रडें आवरून आपली आरंभापासून शेवटपर्यंत सर्व कर्मकथा त्यापाशीं सांगितली. आनंदराव त्या गृहस्थाला आपली हकीकत सांगत असतां, ती ऐकावयास त्याचे भोंवती लोकांची पुष्कळच दाटी जमली; आणि ती तो सांगत असतां, ज्याचे जें तोंडास येईल तें तो त्याला बोलूं लागला, आणि जेव्हां त्याची गोष्ट सांगून संपली, तेव्हां त्यांतून पुष्कळांनीं हुर्यो करून एकच गोंगाट केला. सारांश, सांगावयाचें काय कीं, त्यांतून एकाला देखील त्याची ती गोष्ट ऐकून दया आली नाहीं. ज्या गृहस्थानें त्याला तूं कां रडतोस ह्मणून पहिल्यानें प्रश्न केला होता, तो ह्मणाला,—"बाबा, असा रस्त्यावर रडत बसशील तर रात्रीचेवेळीं तुला चोर समजून पोलीस धरील, आणि नाहक चौकींत नेऊन टाकील." असें ह्मणून चालता झाला. एवढ्यामध्यें यशवंतराव माणगांवकर या नांवाचे एक तरुण गृहस्थ काय गर्दी आहे हें पहाण्याकरितां पुढें गेले. यशवंतराव हे गिरगांवांत रहात असत. ते सेन्टझेवियर कॉलेजांत जाऊन लिटलगोचे परीक्षेचा अभ्यास करीत असत. कालेजांतून त्यांना दरमहा बारा रुपये स्कॉलरशिप मिळे, त्यांतून पांच रुपये कॉलेजची फी देऊन बाकी राहि-

लेल्या सात रुपयांत खोलीचें भाडें व पोटापाण्याचा खर्च ते चालवीत असत. हे गृहस्थ येथील ब्राह्मसमाजाचे व प्रार्थनासमाजाचे असे दोहोंचेही सभासद होते. त्यांनीं यज्ञोपवीताचा त्याग करून प्रसिद्धपणें ब्राह्मधर्माचा स्वीकार केला होता. आणि याच कारणामुळें वडिलांकडून त्यांना कोणत्याही प्रकारें साहाय्य मिळत नसे. ज्या ठिकाणीं यशवंतराव रहात असत, त्या ठिकाणीं बहुतेक प्रार्थनासमाजाचे सभासदांचीच वस्ती होती, आणि तेथें आणखीही कित्येक मंडळी आपल्या आप्तांपासून निराळें राहून प्रसिद्धपणें ब्राह्मधर्माप्रमाणें वागणारी होती. त्या सर्व मंडळीचें परस्परांवर इतकें प्रेम होतें कीं, जणु हे एकाच रक्तमांसाचे आहेत कीं काय असें वाटे. कुटुंबांतील माणसांप्रमाणें ते एकाच ठिकाणीं अन्नव्यवहार करीत असत, आणि ह्मणूनच यशवंतरावांना तेवढ्या थोड्याशा प्राप्तींत कोणत्याही गोष्टीची ददात ह्मणून पडत नसे. यशवंतराव हे फार उदार स्वभावाचे व फार कोंवळया मनाचे होते. दुसऱ्याचें दुःख पाहिलें कीं त्यांना पराकाष्ठेचा कळवळा येत असे, आणि इतर दयावान् लोकांप्रमाणें ते केवळ तोंडचाच शुष्काशुष्क कळवळा दाखवून राहात नसत; तर दुसऱ्यांचे दुःखाचा परिहार करण्यासाठीं आपल्या जिवापलीकडे जरी श्रम करावे लागले, तरी ते करण्याविषयीं मागें पुढें मुळींच पहात नसत. आनंदरावांचे भोंवती लोकांचा गराडा पडून अतिशय दाटी झाली होती; त्या दाटीमध्यें यांनीं आपलें अंग फार प्रया-

सानें पुढें सारून आनंदरावांची सगळी हकीकत लक्षपूर्वक ऐकली, आणि लोकांनीं हुर्यो करण्यास आरंभ केला तेव्हां हे पुढें सरसावून आनंदरावांस ह्मणाले, “अहो, असे रस्त्यावर बसून ज्याला त्याला आपलें दुःख सांगण्यानें का आपणांस कोणी आश्रय देणार! उठा आणि मजबरोबर चालूं लागा, आपली दुसरीकडे कोठें सोई होईपर्यंत मी शक्त्यनुरूप माझ्यानें होईल तितकी आपणांस मदत करीन.” हें वचन ऐकल्याबरोबर परमेश्वरानें आपली प्रार्थना ऐकून ही अगदीं ऐन वेळीं आपणांस मदत पाठविली कीं काय, असें वाटून आनंदरावाचा आनंद गगनीं मावेनासा झाला. त्यानें तडकन उठून पहिल्यानें डोळ्यांचीं आंसवें पुसलीं, नंतर कमरेचें धोतर सरसावून तो यशवंतरावाचे मागोमाग चालता झाला. ज्या स्नेही मंडळींत यशवंतराव रहात असत, त्या मंडळींतील एकुणएकाचा स्वभाव यशवंतरावाला चांगल्या प्रकारें माहीत होता. गांठच्या पैशांला चट्टा लागला तरीही चिंता नाहीं, पण दुसऱ्याचें संकट यथाशक्ति निवारण करावयाचें, असा तेथील मंडळीचा निश्चय होता, आणि इतक्या संकटांत पडलेल्या गृहस्थास तर हटकून मदत केल्यावांचून ते रहाणार नाहींत, अशी यशवंतरावांची पक्की खातरी होती, ह्मणूनच आनंदरावास आपल्या बरोबर येण्यास त्यांनीं मोठ्या धैर्यानें सांगितलें. असो. यशवंतरावांनीं आनंदरावांस आपल्या बिऱ्हाडीं नेलें व तेथील सर्व स्नेहीमंडळीस आनंदरावांचे दुर्द-

शेची हकीकत सांगितली. ती ऐकून मंडळीला फारच वाईट वाटलें, व यशवंतरावांनीं त्याला अशा ठिकाणीं आणलें ह्मणून त्यांचे उपकार मानिले. गरीब व निराश्रित लोकांस मदत करणारे जे कोणी परोपकारी गृहस्थ मुंबई शहरामध्यें होते, त्या सर्वांचे दारीं यशवंतरावांनीं एक आठवडापर्यंत खेपा घालघालून आनंदरावाचे साह्यार्थ मदत मागितली; परंतु ह्मणण्यासारखी मदत त्यांना मुळींच मिळाली नाहीं. जे मदत करण्यासारखे गृहस्थ होते, त्यांना इतक्या जणांना मदत करावी लागे कीं, आणखी एकाद्याला मदत करणें ह्मटलें ह्मणजे, तें त्यांच्या शक्तीपलीकडेस जाई. पुष्कळ मनुष्यांचें ओझें थोड्याशा लोकांवर पडलें ह्मणजे त्या ठिकाणीं असेंच व्हावयाचें. केवळ दुसऱ्यांवर उपकार करण्याचे हेतूनें रात्रंदिवस खपूनही ज्यांना यश येत नाहीं, त्यांना त्रास देऊन त्यांचेच येथें याउपर रहाण्याची आपली शोभा नाहीं, असें आनंदरावास वाटलें. आणि त्यानें मुंबई सोडून कोठें दुसरीकडे जाण्याचा आपला हेतु दर्शविला. परंतु आनंदरावाचा स्वभाव व आचरण पाहून त्या सगळ्या मंडळीचें प्रेम त्याजवर अतिशय जडलें होतें. परंतु हा त्याचा हेतु ऐकून त्यांना फारच वाईट वाटलें; आणि असा बुद्धिवान्, सद्गुणी आणि गरीब मुलगा आणखी दुसरे ठिकाणीं जाऊन जर असाच संकटांत पडला, तर त्याच्या या गुणांचें खरोखरच चीज होणार नाहीं, असें मंडळीला वाटलें.

शेवटीं त्यांनीं त्याला धीर देऊन आपल्यापाशीं आणखी कांहीं दिवस राहवून घेतलें. पुढें थोड्याच दिवसांनीं यशवंतरावांचे श्रमांला यश आलें, आणि आनंदरावाला उपजीविकेपुरते पैसे मिळण्याचें एक साधन सांपडलें. त्यांच्याच शेजारीं कोणी सदानंद नांवाचे एक श्रीमान गृहस्थ रहात असत, त्यांच्या मुलांना दररोज सांज सकाळ दोन दोन तास शिकविण्याचें काम त्याला मिळालें. त्याबद्दल आनंदरावास महिन्याचे कांठीं त्या गृहस्थानें आठ रुपये देण्याचें कबूल केलें. कांहीं दिवसांनीं आनंदराव त्याच गृहस्थाचे शिफारशीवरून डाक्तर विल्सनचे विद्यालयांत म्याट्रिक्युलेशनचा अभ्यास करण्याकरितां जाऊं लागला. तेथें त्याला फी वगैरे कांहीं एक द्यावी लागत नसे. त्याची हुशारी पाहून तेथील मुख्य साहेबांची याजवर अतिशय प्रीति जडली. आनंदराव त्याच वर्षी युनिव्हर्सिटीमध्यें म्याट्रिक्युलेशनची परीक्षा द्यावयास गेला आणि त्यांत तो पास होऊन त्याचें नांव पहिल्या वर्गांत आलें.

## प्रकरण चवथें.

---o---

### नोकरी.

वर सांगितल्याप्रमाणें आनंदराव म्याट्रिक्युलेशनचे परीक्षेंत पास झाल्यावर, कालेजांत राहून पुढचा अभ्यास करावा कीं काय या विचारांत पडला. कालेजचा खर्च ह्मटला ह्मणजे कांहीं लहानसहान नव्हे; तेव्हां नेहमीं दुसऱ्यावर अवलंबून राहून तेथील उंच प्रतीची विद्या शिकणें हें आपल्यासारख्यांस मुळींच योग्य नाहीं, असें त्याला वाटलें. ह्मणून कोठें तरी चाकरी पहाण्याचा त्यानें निश्चय केला. आनंदरावाचें हस्ताक्षर ह्मटलें ह्मणजे मोत्यासारखें होतें, तेव्हां थोड्या दिवसांचे शोधानें विलायतेहून नवीनच आलेल्या एका व्यापाऱ्याकडेस त्याला दरमहा पंधरा रुपयांची चाकरी लागली. हपिसांतील सर्व कांहीं काम तो फार मेहनत घेऊन वेळच्यावेळीं करूं लागला. याची काम करण्याची हातोटी, सहनशीलता आणि भिडस्त स्वभाव पाहून साहेबांची मर्जी फार बहाल झाली व तिसऱ्या महिन्यापासूनच त्यानें याला पंचवीस रुपये पगार केला. ज्यावेळीं याला पंधरा रुपये पगार मिळत असे, त्यावेळीं दहा रुपयांत आपला सर्व नित्यखर्च आटोपून दरमहा पांच रुपये शिलकीस ठेवण्याचा त्यानें निश्चय केला. पैसा

संग्रह करून ठेवण्याचा अभ्यास नसला तर परिणामीं किती दुःख भोगावें लागतें, याचा अनुभव बापाचे मरणा नंतर त्याला लागलाच कळून आला होता. आणि या संसारांत मनुष्याला जर सुखी व्हावयाचें आहे, तर त्याला जे अनेक उपाय करावे लागतात, त्यांत द्रव्यसंचय करणें हा एक उपाय त्याला अगदीं अवश्य केलाच पाहिजे. कारण "सर्वे गुणाः कांचनमाश्रयन्ते" याजविषयींही त्याची पक्की खातरी झाली होती. या दोन गोष्टी तर सर्वांना कळतात, तशा त्यालाही कळत होत्या; पण भेद इतकाच कीं, कोणी तसें वागण्याचा निश्चय करीत नसतात, व यानें तो करून आपल्या शक्तीप्रमाणें पैसा शिलकीस ठेवूं लागला. पुढें जेव्हां त्याला पंचवीस रुपये मिळूं लागले, तेव्हां त्याला आपला खर्च वाढविण्याचें कोणतेंही कारण दिसलें नाहीं. कारणाशिवा उगाच उधळा खर्च करून भावी सुखाचें मूळ खुडून टाकणें हें बुद्धिमान् पुरुषाचें लक्षण नव्हे. तसेंच आनंदरावानें आपल्या मनदेवतेस न रुचे असें काम कधींच केलें नाहीं. तो आपल्या पगारांतून दरमहाचे दरमहा अर्धा पगार शिलकीस पाडूं लागला. पैकीं दहा रुपये व्यांकेंत ठेवून बाकी अडीच रुपये रहात असत ते सत्कर्मी लावण्याच्या हेतूनें त्यानें निराळेच काढावे, आणि प्रसंगानुसार जरूरी दिसेल तसा त्यानें त्यांतून खर्च करावा. संसारामध्यें अनेक प्रकारचीं परोपकाराचीं कामें करावीं लागतात, आणि त्या परोपकाराचे कामामध्यें दान करणें हें सर्वांनाच साधतें असें नाहीं. सारांश, असें

दान करणें झाल्यास अगोदर त्याबद्दल सारासार विचार करणें हें अत्यंत आवश्यक आहे; आणि हा सारासार विचार करतेसमयीं दानाची आवश्यकता, त्याचा मोठेपणा, त्याजपासून होणारी फलप्राप्ति, आणि आपली आवड, एवढ्या गोष्टी लक्षांत ठेवून त्याप्रमाणें खर्च केला पाहिजे. ज्या परोपकाराचे कामामध्यें नांवलौकीक वाढतो, कीर्ति पसरते, अशा कामांत अविचारी लोक कधीं कधीं अतोनात पैसा उधळीत असतात; परंतु कार्याचे मोठेपणाकडे किंवा शुभाशुभ फलाकडे ते दृष्टि देत नाहींत. नांवलैकिकाच्या व कीर्तीच्या अशा अनेक कामांस आनंदरावांकडून सहसा मदत ह्मणून कधींच मिळाली नाहीं. तो आपल्या आवडीप्रमाणें चांगल्या चांगल्या कामीं, कोणास नकळत नेहमीं सढळ हातानें मदत करीत असे. फार काय, पण ज्या कामांत नांवलौकीक कसला तो मुळींच नाहीं, व ज्या कामांस आपले लोक, चांगलें मानीत नाहींत, अशांपैकीं पुष्कळ कामांस सत्कर्म असें समजून तो मोठ्या उत्साहानें मदत करीत असे. तसेंच या लहानशा पगारांतून आपल्या सहायकर्त्या बंधूंना मदत करण्याचा एकादा प्रसंग आला असतां त्यास अतिशय आनंद वाटावा. आणि ज्यांचे उपकार मरेपर्यंत कधींही फिटायाचे नाहींत ते तो क्षणोक्षणीं आठवीत असे, आणि त्यांचा विसर कधींही पडूं नये ह्मणून तो परमेश्वराची प्रार्थना नेहमीं करीत असे.

आनंदरावानें एक वर्षपर्यंत त्या व्यापाऱ्याचे दु-

नीं राहून साहेबाचे हपिसांतील सर्व कांहीं कामकाज
त्या इमानइतबारें केलें. इतक्यामध्यें दुसऱ्या एका
त व्यापाऱ्याचे हपिसांत कीर्द व खतावणी जाणणा-
असा एक हुशार व अनुभविक कारकून पाहिजे
ा. आणि तो पसंत पडल्यास त्याला दरमहा पन्नास
ये पगार मिळेल, अशाविषयीं जाहिरात वर्त-
नपत्रांतून लागली होती. ती वाचून शेकडों
कांनीं ती जागा मिळण्याविषयीं अर्ज पाठविले, मो-
ठाल्या लोकांचीं शिफारस पत्रें नेलीं, त्यांत आमच्या
ंदरावानेंही एक अर्ज पाठवून दिला, परंतु त्याबरोबर
ारस पत्र वगैरे कांहींएक नव्हतें. पुष्कळ अर्जांची
माणें रास पडली तेव्हां, तेथील साहेबानें चांगल्या व-
दार अशा अक्षरांचे अर्ज निराळे काढले, आणि त्या
दारांस अमुक दिवशीं अमुक वाजतां आमच्या हपि-
परिक्षेकरितां यावें, अशाबद्दल सूचना दिली.
ं आनंदरावही सर्वांबरोबर त्या दिवशीं परिक्षेस
ा. परीक्षा आटोपल्यावर दैवयोगानें आनंदराव
सर्वांत पहिला आला. तेव्हां अर्थातच त्याला ती
ा मिळण्याचें ठरलें. आनंदराव दुसरीकडे जात
हें जेव्हां त्याच्या साहेबाला कळलें, तेव्हां त्यानें
ची पुष्कळ प्रकारें समजूत केली, आणि तूर्त
महिन्यापासून मी तुला दहा रुपये अधिक
आणि माझा व्यापार थोडासा अधिक
वाढला ह्मणजे तुला पन्नास रुपये लवकरच करीन,
ह्मणून आश्वासन दिलें. परंतु साहेबाचे वचनावर विश्वास

ठेवून वाट पहात बसणें हें आनंदरावाला बरें दिसलें नाहीं. या गोष्टींत आनंदरावानें मोठासा शहाणपणा केला असें आह्मांस तर वाटत नाहीं. आणि या गोष्टीचा त्याला पुढें पश्चात्तापही झाला आहे. असो. तूर्तचे प्रसंगीं तर आनंदरावानें आपला फायदा करून घेतला, आणि महिन्याचे महिन्यास बरेच रुपये शिलकीस पाडून तो आपल्या भावी सुखाचा पाया दिवसेंदिवस मजबूत करूं लागला.

## प्रकरण पांचवें.

### गूढ विचार.

आज दोन वर्षांहून अधिक दिवस आनंदरावाला मुंबईत येऊन झाले. लहानपणापासून ब्राह्मधर्म व प्रार्थनासमाज यांचेविषयीं शोध व चौकशी करीत रहाण्याचा त्याला भारी नाद होता. ब्राह्मसमाजाचे व प्रार्थनासमाजाचे लोक ईश्वराची भीति बाळगून नीतीनें वागणारे असतात, असें याला वाटून आपणही त्याप्रमाणेंच चालावें असा याचे मनाचा ग्रह झाला. तेव्हां अर्थातच आनंदराव हा ब्राह्मधर्मानुयायी आहे, असें लोक समजत असत. तो प्रार्थनासमाजांत व ब्राह्मस-

माजांत नित्य नेमानें जात येत असे; त्यावरून ते-थील पुष्कळ लोकांची व याची ओळख पडली होती; यावेळीं त्याचें वय पुरें अठरा वर्षांचें होतें. या सुमारास प्रार्थनासमाजाचे लोकांमध्यें पुनर्विवाह व ब्राह्मविवाह करण्याविषयीं मोठी चळवळ चालली होती. आणि ज्यांनी पुनर्विवाह केलेला व जातिभेद मोडलेला होता, अशीच मंडळी यांत प्रमुख होती. एके दिवशीं प्रार्थना-मंदिरांतील नेहमींची उपासना आटोपल्यावर एक स-भासद व्यासपीठापाशीं जाऊन ह्मणाला कीं, "सभासद गृहस्थ हो! अम्मळ थांबा. मला पुण्याहून एका मित्राचें पत्र आलेलें आहे; त्यांत ते लिहितात कीं, येथील यजुर्वेद शाखेंतील एका कुलीन व संभावित ब्राह्मण गृहस्थाची बारा वर्षांची मुलगी दुर्दैवानें विधवा झालेली आहे, आणि जर कोणी त्याच शाखेंतील सुशील असा मुलगा मिळाला, तर; तिचा पुनर्विवाह करून द्यावा असा तिचे बापाचा विचार आहे. तर मित्र हो! ही गोष्ट आपण लक्षांत ठेवून जर असा कोणी मु-लगा आपल्या आढळण्यांत आला, तर कृपाकरून मला कळवा, ह्मणजे त्याप्रमाणें उत्तर पाठविण्यास ठीक पडेल." ही बातमी ऐकतांच असा मुलगा आ-पल्या मंडळीपैकीं कोणी आहे कीं काय, याविषयीं म-डळींत चौकशी चालू झाली. तेव्हां पुष्कळांचें लक्ष आनं-दरावाकडे गेलें. शेवटीं त्यांनीं आनंदरावाजवळ या संबंधानें गोष्ट काढिली. परंतु कित्येक विशेष कारणांवरून आप-ल्याच्यानें या गोष्टीस रुकार देववत नाहीं, ह्मणून त्यानें

सांगितलें. अशा शुभ कार्यांत रुकार न देण्याचीं याचीं कारणें तरी काय असावीं, तीं सांगण्याविषयीं पुष्कळ असामींनीं त्याला आग्रह केला. या संबंधानें आनंदरावाचीं जीं कारणें होतीं, तीं सर्व त्याला सारख्या महत्वाचीं वाटत होतीं. तेव्हां पहिल्यानें कोणतें कारण सांगावें याचा त्याला मोठा विचार पडला. शेवटीं त्यानें थोडीशी सामान्य प्रस्तावना करून नंतर तीं कारणें सांगण्यास आरंभ केला. तो ह्मणाला, "मित्रहो, लग्न न करण्याचीं माझीं अनेक कारणें आहेत, परंतु त्यांत मुख्य ह्मटलीं ह्मणजे तीन होत, आणि तीं तिन्ही माझ्या मतें सारख्या महत्वाचीं आहेत. आणि ज्या अर्थी आपण तीं विचारीत आहां त्या अर्थी तीं मी उघडपणें सांगतों. पहिलें हें:—माझ्या मतें मजसारख्याचें वय अजून लग्न करण्यास योग्य झालें नाहीं. पुरुषाचें पंचवीस वर्षांचें व स्त्रीचें निदान अठरा वर्षांचें तरी वय झाल्याशिवाय तीं लग्नास योग्य झालीं, असें माझ्यानें ह्मणतां येत नाहीं. दुसरें कारण हें:— नलराजाचे गुण हंसमुखानें ऐकून दमयंतीनें नलराजाला मनानें वरिलें अशी पूर्व कथा आहे, आणि अशा हंसमुखांतल्या गुणवर्णनाचा मी अनादर करीत नाहीं; परंतु माझें ह्मणणें इतकेंच आहे कीं, जी आपली अर्धांगिनी होणार व जिला आपल्या जन्माची सोबतीण करणें आहे, तिची प्रत्यक्ष ओळख झाल्याशिवाय, किंवा आमचे परस्परांचे विचार परस्परांना समजल्याशिवाय आणि स्वभाव, गुण, आचार, विचार आदिकरून सर्व कांहीं

गोष्टी परस्परांच्या परस्परांना चांगल्या प्रकारें कळल्याशिवाय लग्न करणें, हें माझ्या बुद्धीस योग्य वाटत नाहीं. आणि तिसरें हें कीं, जोंपर्यंत कुटुंबाचा चरितार्थ चालविण्याची मजमध्यें शक्ति आली नाहीं, तोंपर्यंत लग्न करून आपणांस बांधून घेणें हें मला प्रशस्त दिसत नाहीं. आपलें व आपल्या बायकोचें पोट भरण्याचीच जर शक्ति नाहीं, तर पुढें मुलें लेंकरें होऊन हा संसार दुःखानें व दरिद्रानें हेरपळून टाकणें, हें माझ्या मतें अगदींच अयोग्य कर्म आहे. ह्मणून जाणूनबुजून अशा अपराधांत पडून पापाचा धनी होणें, हें मला नीट दिसत नाहीं. याकरितां सर्व प्रकारें कुटुंबाचा भार वहाण्याची शक्ति अंगीं येईपर्यंत अविवाहितच राहण्याचा मी निश्चय केला आहे." याप्रमाणें लग्न न करण्याचीं जीं मुख्य तीन कारणें होतीं, तीं त्यानें मंडळीला स्पष्ट करून सांगितलीं. तेव्हां मंडळीला त्याचे हे प्रौढ विचार खरोखरच अंतःकरणापासून आहेत कीं काय, याविषयीं संशय आला, आणि ते मनांत समजले कीं, याचे ठायीं विधवेशीं विवाह करण्याचें धैर्य नाहीं; ह्मणून कसें तरी वाक्पांडित्य दाखवून प्रसंग टाळण्याचा याचा इरादा आहे; या पलीकडे दुसरें कांहीं नाहीं. त्यांपैकीं एकजण आनंदरावास उद्देशून असेंही ह्मणाला कीं, "महाराज, आपलें संभाषण ऐकून आपण या देशचे रहिवासी आहां, असें वाटत नाहीं. जर करितां आपली कातडी गोरी असती, तर खरोखर आपण विलायतेहून आलां आहां असा आमचा समज होऊन, आपण देश,

काल व वधूवरें यांस अनुसरून बोलत आहां असें वाटलें असतें; परंतु तसें कांहीं नाहीं. आह्मी उष्ण देशांतील लोक, थंड देशांतील लोकांची रीति, नीति आदिकरून गोष्टींचें जर अनुकरण करूं गेलों तर आमचा निभाव कोठपर्यंत लागेल, याचाही विचार करणें आवश्यक आहे. आपण पूर्वी सांगितल्याप्रमाणें साहेब लोकांचे चालीप्रमाणें विवाह करूं इच्छितां. पण, विवाहाचे पूर्वी आपले कन्येबरोबर कोणास बोलण्याचालण्यास परवानगी देईल आणि आपणांशीं विवाह लावून देण्याकरितां कन्या अठरा वर्षांची होई पर्यंत अविवाहित ठेवील, असा एक तरी गृहस्थ आजमित्तीस आपणांत आहे काय? आपण जर या प्रकारचें वेड डोक्यांत धरून लग्नाचा निश्चय कराल तर मी खात्रीनें सांगतों कीं, आपणांस ब्रह्मचारी किंवा कार्तिकस्वामीच होऊन राहिलें पाहिजे; आणि खरें दांपत्यसुख ज्याला ह्मणतात तें आपणांस आजन्मपर्यंत लाभणारच नाहीं." त्याजवर आनंदराव हांसून ह्मणाला, "अहो, जर विवाह आपल्या मनांतील इच्छेप्रमाणें होणार नाहीं, तर विवाह करण्यापेक्षां कार्तिकस्वामी होऊन राहाणें हें मला पतकरेल. आपल्या मताप्रमाणें चालत असतां मजवर हजारों जरी संकटें आलीं, तरी मी यत्किंचित्‌ही डगमगणार नाहीं, इतकें आपण खूप लक्षांत ठेवावें." आनंदरावाचें हें बोलणें ऐकून मंडळी वाईट तोंड करून उठून चालती झाली, आणि रस्त्यांतून चालतां चालतां त्याजविषयीं भलती भलती चिकित्सा

करूं लागली. एकजण ह्मणूं लागला कीं, "ही आनंदरावाची सगळी तोंडची गर्वोक्ति आहे; दुसरें कांहीं नाहीं. तो आपणांस मोठा आधुनिक ब्राह्म आहें असें समजतो; पण एक तरी गोष्ट तो आपल्या अंतःकरणाच्या खऱ्या कळवळ्यापासून बोलत असतो असें आपणास निश्चयपूर्वक वाटतें काय? बाऱ्या चढतें रक्त आंगांत खेळत आहे तोंपर्यंत अशाच उड्या मारमारून धामधूम करील, व शेवटीं निरुपायानें प्रायश्चित्त घेऊन जर याणें आठ वर्षांचे मुलीबरोबर विवाह न केला, तर काय ह्मणाल तें ऐकेन." दुसरा एकजण ह्मणाला, "याचे अंगीं धर्मपरायणता आहे कीं नाहीं, याविषयींच मला मोठा संशय आहे. केवळ बाह्य अवडंबर दाखवून फुशारकी मिरवीत आहे. ईश्वरावर जर याचा भरंवसा असता, तर अशी गोष्ट तो कधींच बोलता ना, कीं, भावी संततीचा प्रतिपाळ करण्याची शक्ति येईपर्यंत लग्न ह्मणून कधींच करणार नाहीं. किती तरी मूर्खपणा हा! धर्मपरायण मनुष्य कधीं तरी असें बोलेल का? त्याला ठाऊक नाहीं काय कीं 'ईश्वर सर्वांची काळजी वाहतो.' धर्मानें बंधन ज्याला दृढ नाहीं, त्याच्यानें कोठपर्यंत चांगल्या मार्गानें चालवेल हें आपणच सांगा." या प्रकारें आनंदरावाचे संबंधानें जो तो निंद्य भाषण करूं लागला, आणि सर्वांचा त्याजवरील विश्वास उडाला. केवळ ज्यांचें त्याजवळ रात्रंदिवस उठणें बसणें असे, ते मात्र त्याला चांगला मनुष्य समजत असत.

तरुणांजवळ त्यांच्या विवाहाची गोष्ट निघाली

ह्मणजे त्यांचें मन अगदीं चंचळ व उतावीळ होऊन जातें; विवाहाचें नांव घेतलें कीं ते अगदीं वेडावून जाऊन त्यांची तत्परता स्वहित व सद्सद्विचारशक्ति हीं एके बाजूस राहतात; असें असतां तरुण आनंदरावापाशीं विवाहाची गोष्ट काढल्यानें त्याची बुद्धि यत्किंचित्ही डगमगली नाहीं, हें एक शुभ चिन्ह व आश्चर्यच समजलें पाहिजे. अनुचित समयीं विवाह करून घोरतर संकट, दुःख, इत्यादिकांनीं आपला संसार अगदीं व्याप्त करून टाकणें हें कांहीं शहाणपणाचें काम नव्हे; आणि हें ज्ञान तरुणपणीं बहुतेकांना नसतें. आमच्या लोकांची ही अशी दुर्दशा होण्याला या गोष्टीचें अज्ञानपण हें एक मुख्य कारण होय. या गोष्टीचे संबंधानें आनंदरावानें मनाचा जो मोठा निग्रह केला होता, त्यावरून त्याची सद्सद्विचारशक्ति मोठी विलक्षण होती असें दिसून येतें. लोकांनीं त्याची इतकी निर्भर्त्सना केली तरी तो यत्किंचित्ही डगमगला नाहीं, हा एक त्याचा मोठा दृढ निश्चयीपणाच दिसून येतो. कोणतेंही एकादें बरें वाईट कृत्य करणें न करणें हें बहुधा लोकांची जी बरीवाईट मसलत व ईर्षा असते, तिजवरच अवलंबून असतें. ह्मणजे, लोकांचे मनाविरुद्ध कोणतेंही कार्य करण्यास पुष्कळांना धैर्य होत नाहीं. परंतु आनंदरावानें या लहान वयांतच या गोष्टीचा दृढनिश्चय लोकांना दाखविला; यावरून त्याची भावी सुखाविषयींची कळकळ आणि दूरदर्शीपणा यां संबंधानें कोणतीही

शंका ह्मणून राहिली नाहीं. लोक त्याची ज्याचे त्याचे पाशीं निंदा करीत, हें त्याचे कानावर आलें; परंतु त्यानें त्यांजविषयीं आपल्या मनामधला रोष किंवा किंतु कसा तो मुळींच बाहेर दाखविला नाहीं.

## प्रकरण सहावें.

### अनाथ मुलगी.

डाक्तर विश्राम या नांवाचे एक फार विद्वान्, शहाणे व सज्जन असे गृहस्थ होते. ते पुष्कळ वर्षें मुंबईंत राहून वैद्यकीचा धंदा करीत असत. ते पूर्वी वैद्य पाठशाळेंत सरकारी नोकर होते; परंतु तेथील वरिष्ठांशीं यांचें बनेनासें झाल्यामुळें, ते सरकारी चाकरीचा राजीनामा देऊन स्वतंत्र धंदा करूं लागले. डाक्तर साहेब यांच्या वयाचे मानानें पाहिलें असतां फार जुनाट वैद्यकोटींतील ते एक होते. त्यांचा स्वभाव अति उदार आणि मोकळा असे. त्यांची वैद्यकीचे कामांत हुशारी, सदाचार, आणि गोरगरीबांवर दया, आदिकरून गुण पाहून लोकांची त्यांजवर मोठी श्रद्धा होती; आणि त्या मानानें त्यांची गिऱ्हाइकीही पुष्कळच असे. त्यांना ओळखीत नसे असा एकही

मनुष्य साऱ्या मुंबई शहरांत नव्हता. वैद्यकीचे धंद्यांत त्यांना विपुल पैसा मिळे, परंतु त्या मानानें त्यांचा खर्च पाहिला असतां तोही फार अवाढव्य असे. एक तर त्यांच्या येथें मुलांचा भरणा फार; शिवाय अनाथ व निराश्रित अशा पुष्कळ मुलांस ते आपल्या खर्चानें विद्या शिकवीत असत. मुलांस व मुलींस विद्या शिकविण्याचे कामीं त्यांचा अतोनात पैसा खर्च होई. मुलांस उंच प्रतीचें शिक्षण देण्याकरितां जशा अनेक शाळा आहेत, तशा मुलींकरितां नाहींत, ह्मणून त्यांना आपल्या मुली आलेक्झान्ड्रिया स्कुलांत पाठवाव्या लागत, आणि त्यामुळें त्यांना त्यांचा खर्च फार येई. त्यांना त्यांच्या औरस मुलीं शिवाय एक पाळलेली कन्या होती.

विश्वनाथ भट या नांवाचे एक गरीब व वृद्ध ब्राह्मण डाक्तर साहेबांचेच शेजारीं चौपाटीवर रहात असत. विश्वनाथ भट हे मूळचे गोमांतक प्रांतांतील रहाणारे होते. त्यांना आनंदी ह्मणून एक कन्या होती. आनंदी पांच वर्षांची असतां विश्वनाथ भटजीनें तिचे पांचशें रुपये घेऊन त्याच प्रांताकडील रहाणाऱ्या एका व्यंकटेश नांवाचे कुलिन ब्राह्मणाशीं तिचा विवाह लावून दिला. व्यंकटेश याचें वय त्यासमयीं सुमारें चाळीस वर्षांचें असावें. तो घरचा मोठा सधन होता असेंही कांहीं नव्हतें; परंतु थोड्याशा पैशाचे लोभानें विश्वनाथ भटजींनीं आपल्या मुलीचे गळ्यांत हा फांस घातला. लग्न होऊन एक वर्ष लोटलें नाहीं तोंच व्यंकटेशाला

एकाएकीं भयंकर आजार होऊन देवाज्ञा झाली. तेव्हां विश्वनाथभटजींचे बायकोवर ही आकाशची कुऱ्हाडच पडल्यासारखें झालें. नंतर थोड्याच दिवसांनीं विश्वनाथ भटजींनीं आपलीं भांडीं कुंडीं सर्व कांहीं जिनगी विकून टाकून बायको व मुलगी यांस बरोबर घेऊन त्र्यंबकेश्वरची वाट धरली. पण काय ग्रहदशा त्यांचे पाठीस लागली ती, त्यांना तेथें जाऊन दोन पावणेदोन वर्षें झालीं नाहींत तोंच त्यांचें कुटुंब निवर्तलें. तेव्हां विश्वनाथभट मुलीस घेऊन पुन्हा मुंबईस येऊन राहिले. पुढें आनंदी ही दहा वर्षांची झाल्यावर विश्वनाथ भटजींना नवज्वराची भावना होऊन तेही कैलासवासी झाले. विश्वनाथ भटजींचा व डाक्तर साहेबांचा लहानपणापासूनचा परिचय असून, त्यांच्या वडिलांपासून त्यांचा पुरोहितपणा त्यांजकडेसच चालत आलेला होता. विश्वनाथभटजी आजारी असतां त्यांस औषधोपचार डाक्तर साहेब हे जात्याच करीत असत. मरणकाळीं विश्वनाथभटजींनीं आपली कन्या डाक्तर साहेबांचे हातीं देऊन प्राण सोडला. तेव्हांपासून तिचा प्रतिपाळ करण्याचा भार डाक्तर साहेबांनीं आपल्या माथीं घेतला, आणि आपल्या मुलीप्रमाणें तिचें लालनपालन करून, तिला विद्या शिकवूं लागले. डाक्तर साहेबांचे घरीं राहून तिला सुमारें चार वर्षें होत आलीं. तेवढ्या वेळांत डाक्तर साहेबांचे घरचीं माणसें तिच्याशीं मोठ्या प्रेमानें वागून, आईबापांचे मृत्यूपासून होणाऱ्या दुःखाचा तिला त्यांनीं विसर पाडला. आनंदी-

बाई डाक्तरसाहेबांना बाबा ह्मणत असे, व त्यांच्या कुटुंबास आई ह्मणत असे; आणि वडील कन्येप्रमाणें त्यांच्या घरचा सर्व कांहीं कारभारही तीच पाहात असे.

डाक्तर साहेबांनीं आनंदीबाईचे शिक्षणसंबंधीं फार चांगली व्यवस्था केली होती. आनंदीबाईच्या विद्याभ्यासास आरंभ मोठेपणीं झाला, ह्मणून तिला मोठी विद्या संपादन करितां येईल असा मुळींच संभव नव्हता. तेव्हां आतां तिला जी कांहीं विद्या शिकवावयाची, ती तिच्या भावी संसारांत उपयोगी पडेल अशीच शिकविली पाहिजे, असा विचार करून डाक्तर साहेबांनीं तिचे शिक्षणसंबंधीं सर्व प्रकारचा बंदोबस्त तशाच प्रकारचा ठेविला होता. ह्मणजे, पहिल्यानें कांहीं दिवस तिला फक्त मराठी भाषा व व्यवहारोपयोगी हिशेब हे शिकविले. त्यांत तिची गति इतकी चांगली झाली कीं थोड्या अवकाशांतच ती आपल्या मनांतील विचार शुद्ध, सरळ आणि सोप्या भाषेंत उत्कृष्ट रीतीनें बोलूं लिहूं लागली; आणि व्यवहारांतील लहानसहान हिशेबही तिला बिनचूक करितां येऊं लागले. हें पाहून डाक्तर साहेबांनीं तिला इंग्रजी शिकविण्यास आरंभ केला. कारण, सामान्य व्यवहारांतली इंग्रजी भाषा समजण्यापुरता त्या भाषेचा अभ्यास झाला ह्मणजे मनुष्यास संसारांत उपयोगीं पडणाऱ्या अशा अनेक विषयांची माहिती सहज करून घेतां येते, हें त्यांस ठाऊक होतें. जीं पुस्तकें शिकलें असतां इंग्रजी भाषा समजण्यापुरतें ज्ञान

प्राप्त होतें, अशा आवश्यक सर्व पुस्तकांतून कांहीं पुस्तकें दोन वर्षांचे आंतच आनंदीबाईनें एकापाठीमागून एक वाचून टाकलीं, आणि इंग्रजी भाषा थोडी बहुत समजण्यापुरतें ज्ञान तिनें संपादिलें. नंतर इंग्रजी भाषेमधील गृहधर्म, आरोग्यशास्त्र, शारीरशास्त्र, शरीरपालन, लहानसहान रोगांचीं लक्षणें व त्यांची चिकित्सा, शुश्रूषा, इत्यादि विषयांवरील सोपे सोपे ग्रंथ तिनें वाचण्यास आरंभ केला. मराठी भाषेंत या सर्व विषयांवर जीं दोन चार पुस्तकें झालीं आहेत, तीं तिनें पूर्वी नुसतीं वाचून टाकलीं होतीं, असें नाहीं, ह्मणजे आनंदीबाईचें सर्व कांहीं वाचणें व शिकणें "परस्वाधीन जिणें व पुस्तकी विद्या" ह्मणतात त्यांतलें नव्हतें. ती जी कांहीं विद्या शिकली होती, तिचा ती अनुभव घेऊन पहात असे, आणि डाक्तर साहेबही या गोष्टीविषयींची फार खबरदारी ठेवीत असत. त्यांजकडेस जे कोणी लहानसहान रोगांवर औषधें मागावयास येत, त्यांस आनंदीबाईकडूनच ते औषधें देववीत; यावरून वैद्यकासंबंधी तिनें किती माहिती करून घेतली होती, हें स्पष्टपणें दिसून येतें. याप्रमाणें आनंदीबाईनें पुष्कळ गोष्टींचा अनुभव संपादन केल्यावर डाक्तर साहेबांनीं तिला धर्मविषयक व नीतिविषयक कांहीं पुस्तकें वाचावयास दिलीं, आणि प्रसंगानुसार त्या सर्व विषयांवर त्यांनीं तिला बोधही करीत असावा. अनेक विषयांवरील लहान लहान बहुतेक ग्रंथ वाचल्यानें, व डाक्तर साहेबांचे सदुपदेश ऐकल्यानें, आनंदी-

बाईची बुद्धि दिवसेंदिवस परिपक्क होऊं लागली; आणि धर्माविषयींची आस्तिक्यबुद्धीही तिचे ठायीं दृढ झाली; आणि लोकांच्या कल्याणाविषयींची कळकळ तिचेठायीं वाढत चालली. या सर्व कांहीं गोष्टींचा अनुभव ती घेत असतां त्यांजबरोबर हात राखून खर्च करणें व द्रव्यसंचय करणें या गोष्टीचेंही ज्ञान तिनें सहज प्राप्त करून घेतलें. युरोपांत व अमेरिकेंत या संबंधानें जे जे उपाय योजीत असतात, त्या सर्वांची माहिती तिनें अनेक पुस्तकें वाचून मिळविली होती. आणि हें ज्ञान पुढें तिला पुष्कळ गोष्टींत फार उपयोगी पडलें. शिवणकलेंत आणि सूपशास्त्रांत ह्मणजे पक्वान्नें वगैरे करण्याचे कामांत तर आनंदीबाई केवळ उत्कृष्ट सुगरीणच होऊन गेली होती. डाक्तर साहेबांचे मुलींस व आनंदीबाईस शिवणकाम शिकविण्याकरितां एक ह्मातारा शिंपी येत असे. त्याजकडून आनंदीबाईनें शिवणकामाची माहिती एका वर्षांत इतकी करून घेतली कीं, दुसरे वर्षापासून डाक्तर साहेबांचे घरीं शिंप्याचें काम फारसें लागलेंच नाहीं. इतकेंच केवळ नव्हे, तर डाक्तर साहेबांच्या दुसऱ्या ज्या लहान लहान मुली होत्या, त्यांसही शिवणकाम तीच शिकवूं लागली. याप्रमाणें आनंदीबाई मोठ्या सुखसमाधानानें डाक्तर साहेबांचे येथें कालक्रमण करूं लागली. तिनें जी विद्या संपादन केली होती, ती जरी उंच प्रतीची विद्या नव्हती, तरी संसारांत अत्यंत उपयोगी पडणाऱ्या विद्येपैकींच एक होती, यांत संशय

नाहीं. आलीकडच्या कितीएक विद्यार्थ्यांप्रमाणें, आनंदीबाईला आमाझोन नदीची ओंडी, आलप्स पर्वताची उंची, आणि सोनपतपानपतचे लढाईतील वीरपुरूषांचीं नांवें व त्यांची वंशावळि इत्यादि कांहींच तोंडपाठ येत नव्हतें; हें खरें; तरी एवढ्यावरूनच ती सुशिक्षित मुलगी नव्हे असें जर कोणी समजेल तर ती त्यांची मोठी चूक आहे, असेंच मानलें पाहिजे.

## प्रकरण सातवें.

### ओळख.

आनंदीबाईनें चिरकाल वैधव्यस्थितींतच लोळत पडावें असा डाक्तर साहेबांचा मनसोबा नव्हता. आनंदीबाई जरकारितां अशीच वैधव्यदशेंत राहिली, तर तिला आमरण दुसऱ्यावरच अवलंबून राहिलें पाहिजे, याविषयीं डाक्तरसाहेबांची पक्की खात्री होऊन चुकली होती. आणखी त्यांस अनेक गोष्टींच्या अनुभवावरून असें कळलें होतें कीं, अशा वैधव्यामध्यें काळ काढणें हें स्त्रियांस महत्संकट असून, त्या स्थितींत त्या कोणत्याही प्रकारें देशोन्नतीच्या कामास उपयोगी पडत नाहींत; आणि त्यांचा पुनर्विवाह केला ह्मणजे,

त्यांच्या जिण्याचें सार्थक्य होऊन सगळें सुरळीत चालतें. ह्मणून आनंदीबाईचा पुनर्विवाह करून देण्याविषयीं डाक्तरसाहेबांनीं निश्चय केला.

डाक्तर साहेब हे प्रार्थनासमाजाचे सभासद होते. परंतु केवळ नामधारी सभासद असतात तसे ते नव्हते; तर ते ब्राह्मधर्मास अनुसरून बोलल्याप्रमाणें तंतोतंत चालणारे होते. त्यांची अभिरुचि व त्यांचे विचार, हे फारच चांगले व पोक्त होते. आनंदीबाईचे मनाजोगा वर मिळण्याकरितां त्यांनीं एक तोड काढली, ती अशी: ते प्रति शनिवारीं आपल्या घरीं कांहीं सदाचारसंपन्न ब्राह्म मंडळीला चाहाकाफीकरितां किंवा भोजनाकरितां निमंत्रण करूं लागले. या पूर्वीं एक विशेष गोष्ट येथें सांगितली पाहिजे, ती ही कीं, डाक्तर साहेबांचे येथें जेवणाचे वेळीं स्त्रीपुरुषांनीं एके ठिकाणीं बसून भोजन करण्याचा परिपाठ असे. यावेळीं आनंदीबाईचें वय पुरें अठरा वर्षांचें होतें. डाक्तरसाहेबांचे येथें जी जी ब्राह्ममंडळी बोलावीत असत, त्यांमध्यें आनंदराव हे एक असत. संध्याकाळचे वेळीं निमंत्रित मंडळी डाक्तरसाहेबांचे घरीं जमत असे, त्यावेळीं आनंदीबाईनें हार्मोनियम व फिड्ल हीं वाद्यें वाजवावीं, आणि त्यांच्या सुरावर प्रार्थनासंगीतांतील ईश्वरभक्तिपर व देशोन्नतिविषयक रचिलेलीं इतर कांहीं पदें मंजुळ स्वरानें तालसुरावर ह्मणून, जमलेल्या मंडळीची करमणूक करावी. नंतर सर्वांनीं एके ठिकाणीं एका पंक्तीला बसून भोजन करावें. तो भोजन समारंभ चालला असतां मंडळीचीं

अनेक विषयांवर संभाषणें व्हावयाचीं, आणि भोजन आटोपल्यानंतरही बराच वेळपर्यंत तीं चालू रहावयाचीं.

या प्रकारें कांहीं महिने लोटले. तेव्हां आनंदीबाईचे सद्गुण पाहून अविवाहित अशा तरुण मंडळींतून कोणकोणाचें मन तिजकडेस वळलें आहे, आणि त्याचप्रमाणें आनंदीबाईचें मन कोणावर बसलें आहे, हें डाक्तर साहेब पाहूं लागले. आनंदीबाई स्वभावानें फार लाजाळू असे, आणि त्यांत आपले मनांतील हेतु दुसऱ्यांस कळूं नये, ह्मणून ती फारच सावधपणा बाळगीत असे. यामुळें तिच्या मनांतील हेतु एकाएकीं कोणास कळून आला नाहीं. परंतु पेटलेला अग्नि वस्त्रानें जसा झांकून ठेवतां येत नाहीं, त्याप्रमाणें आनंदीबाईचे हृदयांत प्रज्वलित झालेला हेतु तिला फार दिवस झांकून ठेवतां आला नाहीं; तेव्हां आनंदरावांवर तिचें मन बसलें आहे, हें डाक्तर साहेब यांजला केव्हांच कळून आलें. नंतर डाक्तर साहेबांनीं आनंदरावाला बोलावून ह्याबद्दल त्याचें मत कसें काय आहे तें विचारलें. तेव्हां आनंदरावही या गोष्टीस नाकबूल न होतां, उलट आनंदीबाईचे सद्गुण पाहून आपण फार खुष झालों आहों, व तिजशीं विवाह करण्यास आपण फार उत्सुक आहों, असें बोलून दाखविलें, आणि वाग्निश्चय होण्या पूर्वीं तिजबरोबर कांहीं विशेष गोष्टींविषयीं थोडें भाषण होईल तर बरें असें ह्मटलें. डाक्तर साहेबांनीं या प्रकारें संभाषण करण्याविषयीं मुळींच अडथळा घेतला नाहीं.

त्यांनीं आनंदीबाईचे विचारानें एक दिवस कायम केला, आणि त्या दिवशीं आनंदरावानें येऊन काय तें संभाषण करावें असें ठरविलें.

## प्रकरण आठवें.

### भेट.

डाक्तर साहेबांच्या त्या बंगल्यामधीलच एका एकांत अशा खोलीमध्यें, आनंदराव व आनंदीबाई यांची भेट होण्याचें ठरलें. त्या दिवशीं नेमलेल्या वेळीं आनंदीबाई ही त्या खोलीमध्यें बसून आनंदरावाची वाट पहात राहिली होती. तिनें एक पुस्तक हातांत उघडून घेतलें होतें; परंतु तें ती वाचीत होती असा केवळ अर्थ नव्हे, तर "लक्ष एकीकडेस आणि मन भलतीकडेस," या ह्मणीप्रमाणें ती पुस्तकाकडेस फक्त नेत्र मात्र लावून, त्याचीं पृष्ठें हातानें चाळीत राहिली होती; परंतु तिचें सारें मन आनंदराव केव्हां येतात याकडेस होतें. कांहीं असो, तें पुस्तक जरी तिनें वाचण्याचे हेतूनें घेतलें नव्हतें, तरी पण शेवटीं तेंच तिच्या मोठ्या पथ्यावर पडलें. ज्यांच्यामध्यें फार बोलणें चालणें नाहीं, अशा स्त्रीपुरुषांची पहिल्यानेंच भेट झाली ह्मणजे, प्रथम संभाषणास आरंभ करावा कसा, याची त्यांना

मोठी पंचाईत पडते. आणि, त्याप्रमाणें आनंदीबाई-ही त्या विचारांतच होती; परंतु आनंदराव आल्यावर ती सगळी पंचाईत तेव्हांच नाहींशी झाली. तो खो-लीमध्यें येऊन बसला नाहीं तोंच त्यानें आनंदीबा-ईचे हातीं पुस्तक पाहून आणि त्याकडे बोट करून ह्मटलें, "कस्सचें पुस्तक तें!"

आनंदी०–आपली फ्रेंच वीरपत्नी स्त्री जोयन् इचें तें चरित्र आहे.

आनंद०–एकुण जोयन् इचें चरित्र तुह्मी वाचलें आहां. तिचेविषयीं तुह्मांस काय वाटतें? ती कशी होती?

आनंदी०–असें काय विचारतां! फ्रेंच लोकांना येवढें स्वातंत्र्य मिळण्याला जी कारणभूत झाली, ती बायको सामान्य का?

आनंद०–बरें, तिचेप्रमाणें आपणही जगांत लोकप्रिय व्हावें, अशी तुमची इच्छा आहे काय?

आनंदी०–पण असे मनांत मांडे खाऊन उपयोग तो कोणता!

आनंद०–याला मांडे खायाला कशाला पाहिजेत? पण समजा कीं, तसाच कांहीं दैवयोग घडून आला, तर मग?

आनंदी०–तसा दैवयोग तर घडून येऊं द्या. मग पुढचें पुढें.

आनंद०–समजा कीं, यावेळीं तसा दैवयोग घडून आला आहे. आतां पुढें?

आनंदी०–असे मनांत मांडे खाऊन जर कार्यसिद्धि

होत आहे, तर जशी मी असावें असें आपल्यास वाटतें आहे, तशी मी झालें आहें, असें आपण मनांत समजून आनंद माना ह्मणजे झालें.

आनंद०—माझ्या वाटण्याकडेस तुमचें काय आहे? समजा कीं, मला वाटेल कीं तुह्मी विहिरींत उडी टाकावी! ह्मणून का तुह्मी तसें करणार!!

आनंदी०—नाहींच; तसें कसें होईल! मी आपल्या सद्सद्विचारबुद्धीस दुसऱ्याचे इच्छेच्या स्वाधीन कां ह्मणून करीन? परंतु, आपली सारासार विचारशक्ति ज्या ठिकाणीं दुसऱ्याचे बुद्धीनें व विचारानेंच चालली पाहिजे, तेथें मग ती निराळी गोष्ट.

आनंदीबाईचें हें उत्तर ऐकून आनंदराव मनामध्यें फार हर्ष पावला, आणि मोकळ्या मनानें तिला ह्मणाला,—"तुमचें भाषण ऐकून मी फार खुष झालों. ज्या स्त्रिया आपल्या सद्सद्विवेकबुद्धिप्रमाणें न वागतां, घरांतील वडील किंवा आवडतीं माणसें जसें सांगतील तसें चालतात, त्यांचे आज्ञे बाहेर एक पाऊल सुद्धां टाकीत नाहींत, अशा कुलिन स्त्रियांना हल्लींचे काळीं मोठा मान आहे; परंतु या गोष्टीचे संबंधानें निदान माझ्यानें तरी त्यांची फारशी तारीफ करवत नाहीं. कारण, असें दुसऱ्याचे तंत्रानें चालण्याचे योगानें मनुष्यांचे आयुष्यक्रमांत त्याची उन्नति होण्यास मार्ग राहत नाहीं. स्नेह व प्रीति यांस गुंतून आपलें तनमनधन दुसऱ्याचे स्वाधीन करणें हें तुह्मांस इष्ट वाटत नाहीं,

आणि तुमच्या मनाला जें खरोखर वाटत आहे, तेंच स्पष्टपणें तुह्मी बोलतां, हें ऐकून मला विशेष आनंद वाटत आहे. परंतु एका गोष्टीविषयीं आपणां उभयतांनाही फार सावधान राहिलें पाहिजे, आणि असें सावधान राहणें हें अत्यंत आवश्यक आहे, असें तुह्मीही कबूल कराल, असें मला वाटतें. सुंदर व सुगंधिक पुष्प जें आहे, तें कोणाचें चित्त हरण करणार नाहीं बरें? त्याजवर प्रीति व त्याचा स्वीकार करण्याविषयीं कोणाच्यानें तरी मागें घेववेल काय? त्याचप्रमाणें सद्गुणी व सुशील अशा कुलिन स्त्रिया सर्वांच्या आदरास आणि सन्मानास पात्र होत असतात. सुवासिक पुष्पाचा ज्याप्रमाणें सर्व लोक मोठा आदर करीत असतात, तसा साध्वी कुलिन स्त्रियांचाही सन्मान राखण्याविषयीं सर्वांना साहजिकच इच्छा होत असते. आणि अशा ज्या आवडणाऱ्या स्त्रिया असतात, त्यांजबरोबर कोणीही लग्न करील; यांत ह्मणजे मोठें विचाराचें काम आहे, असें नाहीं. आतां असें लोकांच्या आदरास पात्र होण्याचीं कारणें अनेक आहेत. मनुष्याचे अंगीं जे निरनिराळे गुण असतात, त्यांतील एका एका गुणानेंच कधीं कधीं मनुष्य मोहित होतो. परंतु लग्नाचा मुख्य उद्देश ह्मटला ह्मणजे तो एकच आहे. केवळ प्रेमालाच मोहित होऊन लग्न करण्यास तयार होणें हें योग्य कर्तव्य नव्हे. तर, लग्नाचा मुख्य उद्देश काय, हें लक्षांत बाळगून मग त्याप्रमाणें वर्तावें. जो कोणी आपल्या अधिकाराचा पगडा दुसऱ्यावर

चालविण्यास सिद्ध नाहीं, किंवा जो कोणी दुसऱ्याचे विचार समूळ नाहींसे करून त्यावर आपल्या विचारांची छाप बसवूं इच्छीत नाहीं, त्यानें लग्नाचा ठराव करण्यापूर्वी परस्परांच्या स्वभावाविषयीं चांगल्या प्रकारें माहिती करून घ्यावी, हें त्याचें अवश्य कर्तव्यकर्म आहे. स्वभाव भिन्न, रुचि भिन्न, विचार भिन्न, आचार भिन्न, अशीं जीं माणसें असतात, त्यांनीं "उतावीळ नवरा व गुढघ्यावर बाशिंग" या ह्मणीप्रमाणें विवाहसूत्रानें आपणांस एकदम बांधून घेणें हें बरोबर नाहीं. अशानें तीं आपापलें जिणें केवळ दुःखास कारण मात्र करतात. त्यापासून त्यांना सुख ह्मणून कधीं व्हावयाचें नाहीं. तेव्हां आपणां उभयतांचे हेतु व विचार काय आहेत, हें लग्नाचा ठराव करण्यापूर्वी समजून घेणें अवश्य आहे, आणि तें समजून घ्यावें ह्मणूनच आज तुमच्या भेटीस आलों आहें."

आनंदीबाईस वाटलें कीं, ज्या लग्नामध्यें प्रीतीचा अभाव आहे, तें लग्न विधिविरुद्ध, असें जें आपण इतके दिवस समजत होतों, तें तेवढ्या गोष्टीनेंच विधिविरुद्ध होतें असें नाहीं. प्रीति हेंच कायतें लग्नाचें मूळसूत्र नव्हे, हें तिला या प्रसंगीं कळून आलें. प्रीतिखेरीज लग्नाचे जे दुसरे फार गहन हेतु आहेत, ते आनंदरावाशीं संभाषण चालल्यानें आपणांस कळून आले, असें तिला वाटून, ती मनांतले मनांत आनंदरावाचे फार उपकार मानूं लागली. परंतु इकडे तिचे मनांत एका दुसरेच गोष्टीविषयींची चुटपुट लागून राहिली होती.

ती ही कीं, जरकरितां, आनंदरावाचे आणि आपले आचार विचार जमले नाहींत, तर पुढें गत कोणती करावी ? काय, आनंदरावाचे नादावर पाणी सोडावें ? छेः, हा असला विचार मनांत आणणें हें देखील तिला मोठें संकट होऊन गेलें. आनंदरावानें तर तिचें मन अगदीं वेडें करून सोडलें होतें, आणि ह्मणून तसला विचार आपले मनांत देखील तिच्यानें आणवेना. कर्तव्यबुद्धीनें जर अत्यंत प्रिय अशा आप्त जनांची अवज्ञा करण्याची मसलत दिली, तर तीप्रमाणें चालणें हें आपलें खरोखर कर्तव्यकर्म आहे; परंतु आमच्या देशांतील स्त्रियांच्या अंगीं अजून तें सामर्थ्य आलें नाहीं. ती दुर्बळता आनंदीबाईचे अंगींही या प्रसंगीं दिसून आली. पण अशा दुर्बळतेचा आश्रय करून मनुष्य निश्चिंत राहूं शकत नाहीं; तशी आनंदीबाईची अवस्था झाली. तिचे मनांत क्षणोक्षणीं निरनिराळ्या प्रकारचे तरंग येऊं लागले. आनंदरावाचे आचारविचार आपल्या आचार विचारास प्रतिकूळ होणार नाहींत, असा विचार करून, ती मनाचें शांतवन करूं लागली, पण त्यापासून तिचें मन कांहीं केल्या स्वस्थ होईना. एकएकदां भलतीसलती वाईट कल्पना तिचे मनामध्यें येऊन त्यापासून तिला फार दुःख व्हावें. परंतु आनंदराव तिचे समूर असल्याकारणानें तिला तें बाहेर दाखवितां आलें नाहीं. हृदयांतील यातना बाहेर प्रगट करण्याचा प्रसंग न मिळाला, ह्मणजे जसें मनुष्य अंतर्यातनेनें कासावीस होतें, तशी आनंदीबाईची या प्रसंगीं

थोडीशी स्थिति झाली. एकएकदां या अंतर्यातनेनें तिनें अगदीं व्याकुळ होऊन जावें; पुन्हा विचारांत पडल्यासारखें व्हावें. शेवटीं तिचे मनामध्यें असा विचार उत्पन्न झाला कीं, जर कदाचित् दैव प्रतिकूळ झालें, तर मग चिरकाळपर्यंत याच स्थितींत तळमळत पडावें लागणार. तर बेहत्तर आहे कीं, कांहीं होवो, कितीही संकटें व अडचणी सोसाव्या लागोत, तें मी आनंदानें पत्करीन; पण आनंदरावाला म्हणून हृदयाचे बाहेर कधीं जाऊं देणार नाहीं. असा मनाचा धडा केल्यावर, तिचें मन थोडेंसें शांत झाल्यासारखें झालें. आनंदरावानें आनंदीबाईचे तोंडाकडेस जेव्हां न्याहाळून पाहिलें, तेव्हां ती कोणत्या तरी मोठ्या काळजीनें व्याकूळ झाली असावी, असें त्याला वाटलें. आणि जेव्हां ती थोडीशी शांत झाली आहे, असें याला दिसलें, तेव्हां तो तिला म्हणाला, " माझ्या बोलण्यानें तुम्हांला वाईट वाटलें कीं काय? तसें झालें असेल तर मला क्षमा करा. मी तुमच्या मनास दुखविण्याकरितां म्हणून बोललों नाहीं. "

आनंदी०—छेः तसें कांहीं नाहीं. पण आपल्या संभाषणानें मला पुष्कळच लाभ झाला, आणि त्याकरितां मी आपले फार फार उपकार मानितें.

आनंद०—तर मग मी जें कांहीं आतां भाषण केलें, त्या संबंधानें आणखी थोडेंसें बोलण्यास तुमची कांहीं हरकत आहे काय?

आनंदी०-छेः हो, आपण तसला कांहीं एक वि-

चार मनांत आणूं नका, आणि जें कांहीं बोलणें विचारणें असेल, तें खुशाल बोला विचारा.

या नंतर जगण्याचें सार्थक्य कोणतें, आणि आपलें कर्तव्य काय, ह्याविषयीं त्यांनीं कांहीं वेळ संभाषण केलें. आपल्याला कसकसें वागायाचें याची तपशिलवार यादी आपल्या मनामध्यें आनंदरावानें करून ठेवली होती, ती तिला उलगडून दाखविली. परंतु इकडे आनंदीबाईनें तशा प्रकारची तयारी आपल्या मनामध्यें कांहींएक करून ठेविली नव्हती. तेव्हां तिचे विचार व हेतु आनंदरावाच्या विचार व हेतूकडेस साहाजीकच वळले. सारांश, उभयतांचे विचार एक होऊन एका प्रवाहानें वाहत जाऊं लागले. प्रचंड वादळ होऊन तें आटोपल्यावर, पृथ्वी जशी शांत रूप धारण करिते, त्याप्रमाणें आनंदराव व आनंदीबाई यांचीं मनें विचाररूप वादळानें गडबडून जाऊन शेवटीं तीं अगदीं शांत होऊन गेलीं. नंतर त्यांनीं इकडल्या तिकडल्या थोडा वेळ गोष्टी बोलून एकमेकांचा निरोप घेतला.

# प्रकरण नववें.

—o—

## संचयाभ्यास हें लक्ष्मीचें मूळ होय.

आनंदरावानें आठ वर्षें चाकरी केली, आणि त्या आठ वर्षांत पांच हजार रुपये संग्रहीं ठेविले. त्याला पन्नास रुपये पगार झाला तेव्हांपासून तो वर्षाचे कांठीं चारशें रुपये शिलकीस पाडीत असे. याशिवाय रुपये व्याजीं लावून तो आणखी व्याजाची भर त्या रकमेस घाली. लग्न करण्यापूर्वी एकादें लहानसें घर स्वल्पांत मिळाल्यास तें विकत घ्यावें, असा आनंदरावानें विचार केला होता. आनंदरावाचे मनमिळाऊ स्वभावामुळें त्याचे हपिसांतील सर्व कारकून वगैरे लोक त्याच्याशीं मोठ्या प्रेमानें वागत असत. त्याचे हपिसामध्यें रहिमुद्दीन् ह्मणून एक हवालदार होता. हा हवालदार त्याच्या फार प्रीतींतला माणूस होता. प्रथम प्रकरणांत सांगितलेल्या ड्यानियल साहेबांचें घर शहरच्या ज्या भागामध्यें होतें, त्याच भागामध्यें रहिमुद्दिन् हा रहात असे, आणि आनंदराव हा थोडक्या व्याजानें कर्जाऊ रुपये त्यास देत असे. ह्मणून तो आपल्या शेजारपाजारच्या लोकांस रुपयांची गरज लागली ह्मणजे, ते आनंदरावाकडूनच त्यांना देववी, आणि मुदतीचे मुदतीस त्यांजकडून व्याज मुद्दल वगैरे उगराणी करून ती आनंदरावास तो आणून देई.

या त्याच्या मेहनतीबद्दल आनंदरावही त्याला व्याजाचे रकमेंतून कांहीं अंश देत असे. एके दिवशीं आनंदरावानें रहिमुद्दिन् यास जवळ बोलावून ह्मटलें, "अरे रहिमुद्दिन्, माझ्या मनांतून एक लहानसें घर थोडक्यांत, आणि चांगल्या ठिकाणीं असें मिळाल्यास घ्यावयाचें आलें आहे. जर कोठें तुझे आढळांत चांगलें सोयकर आलें तर मला अवश्य कळीव."

**रहिमुद्दीन्**—साहेब, आमच्या शेजारीं ड्यानियल साहेबाचें एक घर विकावयाचें आहे; परंतु त्या घरांत भुतांची वस्ती आहे असें समजून, तें विकत घेण्यास कोणाचा धीर होत नाहीं. आपण भूतपिशाच अगदीं मानीत नाहीं, तें सर्व थोतांड आहे, असें जेव्हां तेव्हां आपण ह्मणतां, तर मग तें घर विकत घेण्यास आपणांस कांहीं हरकत आहे काय?

**आनंदराव**— आह्मीं भुतांवर विश्वास ठेवीत नाहीं, हें खरें आहे; परंतु मनुष्य भूत होऊन जी कांहीं चेष्टा करितो, त्यावर आमचा विश्वास आहे. मला वाटतें कीं, तुझे शेजारचे लोक ड्यानियल साहेबाला तेथून पिटाळून लावण्याकरितांच भुतें झालीं असावींत. उद्यां मीं घर घेतल्यावर त्या चेष्टा मजबरोबरही लावणार नाहींत कशावरून!

**रहिमुद्दिन्**— आपण त्याविषयीं अगदीं काडी इतकी देखील काळजी करूं नका. आमच्या शेजारच्या लोकांचें आपल्यावर मोठें इमान आहे, आणि त्यांच्याकडून आपणांस कोणत्याही प्रकारें त्रास होणार

नाहीं, याविषयीं पाहिजेल तर मी जामीनकी देतों. जर आपणांस दुसरी तिसरी कांहीं हरकत नसून, तें घर विकत घ्यावयाचें असेल, तर येऊन पहा; आणि पसंत पडल्यास बेलाशक विकत घ्या.

आनंदराव– तथापि तूं ही गोष्ट शेजारच्या लोकांच्या कानावर घाल, आणि ते काय ह्मणतात तें पहा.

त्याच संध्याकाळीं रहिमुद्दिन् हापिसांतून घरीं गेल्यावर शेजारपाजारच्या लोकांस त्यानें ती गोष्ट कळविली. तेव्हां आनंदरावासारखा भला माणूस आपल्या शेजारीं रहावयास येणार, हें ऐकून ते फार आनंदित झाले. दुसरे दिवशीं रहिमुद्दिन् हपिसांत गेल्यावर, तेथील शेजारी लोक काय ह्मणत होते तें आनंदरावांस सांगितलें. नंतर आनंदरावानें वांद्र्यास जाऊन ड्यानियल साहेबाची भेट घेतली; आणि त्याला त्या घराची किम्मत वगैरे विचारली. ड्यानियल साहेबानें प्रथमतः कांहीं तरी अवाढव्य किम्मत सांगितली; परंतु आनंदराव तें घर घेण्याविषयीं विशेष आतुर आहे असें न वाटल्यावरून तो हळू हळू, ती उतरीत गेला, आणि शेवटीं सतराशें रुपयांना द्यावयास राजी झाला. घर विकत घेण्यापूर्वी तें एकदां आनंदीबाईस आणून दाखवावें, असा आनंदरावानें विचार केला; आणि हा हेतु डाक्तर साहेबांचे कानावर त्यानें घातला. डाक्तर साहेब ही गोष्ट ऐकून फार खूष झाले, आणि आनंदीबाईस व आपल्या पत्नीस बरोबर घेऊन अमुक दिवशीं येऊं ह्मणून त्यानीं सांगितलें. मग नेमलेल्या दिवशीं

संध्याकाळचे वेळीं डाक्तर साहेब सर्वांस बरोबर घेऊन घर पहावयास गेले. ते येणार ह्मणून आनंदराव पूर्वींच तेथें जाऊन त्यांची वाट पहात राहिला होता. पुढें सर्व जणें तेथें पोंचल्यावर त्यांनीं त्या घराचा कोंपरान् कोंपरा चांगल्या रीतीनें फिरून पाहिला. घर पुष्कळ दिवस रिकामें राहिल्यानें तें किंचित् मोडकळीस आल्या-सारखें झालें होतें; तथापि तें दिसण्यामध्यें फारच टुमदार असें होतें. त्याचे चारही बाजूंस एकेक दरवाजा व जागजागीं सुंदर खिडक्या असून, पुढचे बाजूस एक मोठा दिवाणखाना, आणि दिवाणखान्याचे बाहेर लांब-चलांब एक सज्ज्या होता; घराचे पश्चिमेच्या बाजूनें समुद्राचा मनोहर देखावा दिसे, आणि पुढचे बाजूस लहा नसाच पण सुशोभीत बागही होता. या शिवाय एका अंगास सैंपाक करण्यास व चाकर नोकरांस रहाण्यास एक बैठी चाळ; आणि दुसरे अंगास तबेला, असा बांधलेला होता; अशा सर्व सोई तेथें होत्या. सारांश, थोडीशी दागदुजी केली असतां, तें घर सर्व प्रकारें मोठें सोई-वार आणि मनाजोगें होईल असें दिसे. डाक्तरसाहेब जातेवेळीं आनंदरावास ह्मणाले, "आनंदराव, बाबा घर तर मोठें नामी आहे. आज असलें घर नवीन बांधाव-यास गेलें तर तें पांच हजारांत देखील होणार नाहीं. आणि तूं ह्मणतोस कीं तो सतराशें रुपयांना द्यावयास राजी आहे; तेव्हां घ्यावयाचेंच असेल तर आतां खरे-दी पत्र करून घेण्यास विलंब लावूं नको."

दुसरे दिवशीं आनंदरावानें ड्यानियल साहेबाचे पद-

रांत सतराशें रुपये घालून खरेदीपत्र वकिला मार्फत रजिस्टर करून घेतलें, आणि घराची अवश्य तेवढी डागडुजी करण्यास आरंभ केला. ती करण्यास त्याला सुमारें तीनशें रुपये पर्यंत खर्च आला.

घराची डागडुजी करण्याचें काम सर्व पूर्ण होण्यास पुरे दोन महिने लागले. नंतर आनंदराव लग्नाचे उद्योगास लागला.

## प्रकरण दहावें.

### लग्न.

आनंदरावापाशीं साडेपांच हजार रुपयांची माया होती, त्यांतून दोन हजार रुपये घर विकत घेण्यांत व तिची डागडुजी करण्यांत खर्च होऊन गेले. आतां त्याच्याजवळ साडेतीन हजार काय ते शिलकीस राहिले. आनंदरावाचे जे हितचिंतक मित्र होते, त्यांनीं त्याला लग्नानिमित्त एक हजार रुपयांहून अधिक खर्च न करण्याविषयीं सांगितलें. त्या हजारांपैकीं पांचशें रुपयांचे आनंदीबाईला दागिने, व पांचशें रुपये लग्नाचे इतर किरकोळ खर्चामध्यें खर्च करावे, असें त्यांचें मत पडलें. आनंदरावाचे मनांतूनही लग्नासाठीं पांचशें रुपयांपेक्षां

अधिक खर्च करण्याचें नव्हतेंच. त्याचा हा बेत पाहून त्याचे जे दुसरे मित्र होते, त्यांना फार वाईट वाटलें. दुसऱ्याचा पैसा पाहिजेल तसा उधळून टाका ह्मणून सांगण्यास लोकांना फारसें जड वाटत नाहीं. कित्येक ह्मणूं लागले कीं,—"पहा, लोकांपाशीं पैसा नसला तरी कोणाचें तरी कर्जवाम काढून " रीण फिटेल पण हीण फिटावयाचें नाहीं " असें समजून, ते लग्नासारखें मंगलकार्य साजरें करीत असतात; आणि आनंदरावापाशीं स्वतःचा पैसा असून देखील तो खर्च करण्यांत इतका कंजूषपणा करितो !" आनंदराव लग्नामध्यें काटकसरीनें खर्च करणार आहे, असें पाहून त्याचे कित्येक मित्रांना इतकें वाईट वाटलें कीं, त्यांनीं त्याला लग्नाचे कामांत मदत कसली ती मुळींच केली नाहीं. इतकेंच नव्हे, तर ते त्याचे कंजूषपणाबद्दल लोकांजवळ भलभलतेंच सांगूं लागले. हा सर्व कांहीं प्रकार पाहून व ऐकूनही, आनंदरावानें खर्चाचे संबंधानें जो एकदां बेत केला होता, तो यत्किंचित्‌ही न फिरवितां तसाच कायम ठेविला.

या सर्व गोष्टींचे संबंधानें आनंदीबाईचा काय अभिप्राय आहे, हें समजून घेणें अवश्य होतें. यासाठीं आनंदराव हे एके दिवशीं डाक्तर साहेबांचे येथें जाऊन आनंदीबाईला पुन्हा एकदां भेटले, व तिला ह्मणालेः—" लग्नाला आतां एकच आठवडा काय तो अवकाश राहिला आहे, तेव्हां आतां सर्व गोष्टींची तरतूद करून ठेविली पाहिजे. नाहीं तर

ऐन वेळीं सगळीच धांदल उडून जायाची. हें लग्न जरी आपल्या बाबांचे येथें होणार आहे, तरी त्याचे-करितां सर्वांशीं त्यांना खर्चांत घालणें हें मला नीट दिसत नाहीं; व हें मी तुह्मांस पूर्वींच सांगितलें आहे. या लग्नप्रसंगीं खर्च किती करावा, याजबद्दल मला अमुकच नेमकें कांहीं सांगतां येत नाहीं. ज्यांचा या गोष्टींत विचार घ्यावासा वाटला, त्यांनीं एक हजार रुपये खर्च करण्यास आपलें अनुमोदन दिलें आहे. पैकीं पांचशांचे तुह्मांला दागिने आणि पांचशें लग्नाचे इतर किरकोळ खर्चाकडेस खर्च करावे, असें सांगितलें. याचे संबंधें तुमचें मत काय आहे तें कळवावें."

आनंदीबाईला ही गोष्ट ऐकून हसूं आलें. आणि ती ह्मणाली, "मजकरितां एवढ्या दागिन्यांची काय जरूरी आहे? निरर्थक शोभेसाठीं मजकरितां इतका खर्च करावा, अशी माझी स्थिति अजून आली नाहीं. जे श्रीमंत लोक आहेत, ते आपला मोठेपणा दाखविण्यासाठीं कपड्यांलत्यांत व दागदागिन्यांत उगाच किती तरी पैसा उधळीत असतात! हें त्यांचें करणें मला योग्य वाटत नाहीं. आणि सामान्य स्थितींतील गृहस्थांस तर असा मोठेपणाचा डोहळा लागणें हें सर्व प्रकारें त्यांचे नाशास कारण होय. आपणच ह्मणतां कीं, आपल्याला शेंकड्या पाठीमागें दरमहा एक रुपया व्याज मिळत असतें. तेव्हां या पांचशें रुपयांवर आह्मांस महिन्याचे महिन्यास पांच रुपये व्याज

नाहीं का मिळणार? त्यापासून संसारांतील अनेक अडचणी दूर करितां येतील, आणि जरकरितां संसारांतील खर्च मोठ्या बातबेतानें केला, आणि त्यांतून कांहीं पैसा शिलकीस पाडला, तर त्या पैशांत आपणांस पुष्कळ सत्कार्यें व दानधर्म करितां येईल. यापासून जें सुख होईल, तें सोन्या रुप्याचे दागिने अंगावर लादल्यानें यत्किंचित् तरी होण्याचा संभव आहे काय? ह्मणून मजकरितां दागिने करण्याचे भरीस आपण मुळींच पडूं नका.

आनंदराव—तुह्मी ह्मणतां तें खरें आहे. परंतु अंगावरचे दागिने न घालणें हें कांहीं चांगलें नव्हे.

आनंदी०—छे, छे, माझें मत मुळींच तसें नाहीं! माझ्या हातांत सोन्याच्या बिलोरीबांगड्या बाबांनीं मला लहानपणीं करून घातल्या होत्या; परंतु त्या करून पुष्कळ दिवस झाले, असें बाबांनीं ह्मणून त्यांत अधिक सोनें घालून त्या परवांचे दिवशीं वाढवून आणल्या आहेत. शिवाय गळ्यांत एक सरी व कानांत एक कर्णफुलांचा जोड नवीनच करविला आहे. हे दागिने मला पुष्कळ झाले, आणि हे जरी नवीन करविले नसते, तरी देखील चाललें असतें. परंतु ज्या अर्थी बाबा आणि आई अशा प्रसंगीं ते मला मोठ्या आदरानें देत आहेत, त्याअर्थी मलाही ते नको ह्मणतां येत नाहींत. त्यांनीं मला इतके दिवस लहानाचें मोठें केलें, विद्या शिकविली, आणि मला वैधव्यदुःखांतून काढून पुन्हा संसारसुखांत घालण्याची योजना केली आहे;

असे त्यांचे अनंत उपकार मजवर झाले आहेत. हींच म-ला रत्नखचित सुवर्णभूषणें होत. त्यांची मजवर अशीच सर्वदा प्रीति राहो, असें परमेश्वराजवळ माझें रात्रंदिवस मागणें आहे. त्यांचे प्रीतीशिवाय आणखी मला त्यांजपासून दुसरें कांहीं नको. बाबांचा विचार आपणांसही कांहीं द्यावयाचा होता; परंतु मीच त्यांना नको ह्मटलें, तरी पण त्यांनीं एक आंगऱ्यांचा जोड आपणांकरितां करविला आहे, तो आपण ग्रहण करावा. नको ह्मणूं नये. कदाचित् आपण नको ह्मटलें तर त्यांना उगाच वाईट वाटेल. बाबा आणखी आज आईपाशीं ह्मणत होते कीं, उद्यां आपणांस कोटांत बरोबर घेऊन जाऊन आपल्या आवडीप्रमाणें आपणां-करितां एक घड्याळ व सांखळी घेऊन द्यावी, असें आहे.

आनंदरावः—तुमच्या बाबाला या प्रकारें खर्चीत घालणें हें मला नीट दिसत नाहीं. ऊंस गोड लागला ह्मणून का तो मुळापर्यंत खावयाचा आहे? तुमची फारच इच्छा आहे, तर मग ह्या तीन वस्तु विकत घेण्यापुरते पैसे मी तुह्मांपाशीं ठेवून जातों. ते तुह्मी कोणत्या तरी युक्तीनें आपल्या बाबापाशीं द्या.

आनंदी०—आपण पैसे ठेवून जाण्याची कांहीं ज-रूरी आहे असें नाहीं. मी त्यांना पैसे दिले आहेत आज इतकीं वर्षें घरांतील सर्वांचीं कापडें वगैरे शिवून राहिले त्या वेळांत मोजे, टोप्या, गळपट आदिकरून मीं तयार करीत असें व ते एका बोहोऱ्याजवळ विकण्याकरितां देत

असें, आणि त्याचे जे पैसे येत ते सर्व माझे नांवें बाबा ब्यांकेंत ठेवीत असत. या प्रकारें मजपाशीं चारशें रुपये जमले होते, त्यांतून दोनशें रुपये बाबांना व्यावयास सांगितले आहेत. मात्र आपणांस उद्यां वेळ मिळाल्यास त्यांजबरोबर जावयाचें करावें.

हें भाषण ऐकून आनंदराव मनांत फारच हर्ष पावला. आणि आनंदीबाईस ह्मणाला, "बरेंपण दुसऱ्या खर्चाचे संबंधें तुमचें काय मत आहे, हें तुह्मी कांहींच कळविलें नाहीं?"

आनंदी०–आपण या लग्नानिमित्य पांचशें रुपये खर्च करणार ह्मणतां, त्यास माझी कोणतीही ना नाहीं. परंतु माझी इतकीच इच्छा आहे कीं, त्या पैशांतून घरखटल्यास लागणाऱ्या जरूरीच्या अशाच वस्तु खरेदी व्हाव्यात. मी हिशेब करून पाहिला आहे कीं, साधारण व्यवहारोपयोगी सामानाखेरीज आह्मां स्त्रियांच्या घरखटल्यास लागणारें सामान विकत घेण्यास किमानपक्ष दोनएकशें तरी रुपये पाहिजेत. मी घरांत आलें कीं त्या सर्व वस्तु पहिल्यानें अगोदर लागणार. परंतु त्या पुरुषांस आवडनिवड करून घेतां येणार नाहींत, ह्मणून सध्यां त्या घेण्याच्या तहकूब ठेवा; मी घरीं आलें ह्मणजे त्यांचें पहातां येईल. सध्यां ज्या वस्तूंची गरज आहे अशांची मी एक यादि केली आहे, ती पहातां त्या खरेदी करण्यास सुमारें एकशें तीस रुपये लागतील, असा अदमास आहे. त्यांतून कित्येक वस्तु आपल्या स्वतःच्या उपयोगीं पडणाऱ्या आहेत, आणि

कित्येक स्वतःच्या उपयोगीं पडणाऱ्या नाहींत, अशाही आहेत; आणि त्या फारतर पांच पन्नास रुपयांच्या होतील. हे पन्नास रुपये मी आपणांस देतें ते घ्या, नको ह्मणूं नका. माझ्या स्वतःच्या उपयोगीं ज्या वस्तु आहेत, ह्या आपण आपल्या पैशांतून विकत घेतल्या असत्या, तर त्यापासून आपणांस अधिक आनंद झाला असता, हें खरें आहे; परंतु आपण तसें करूं नये. याविषयीं आईनें फारच आग्रह धरिला आहे. या वस्तूं शिवाय आणखीही कांहीं वस्तु माझ्या उपयोगीं पडणाऱ्या आहेत, त्या आज महिना होत आला, आई हळू हळू आपल्या आवडनिवडीप्रमाणें खरेदी करीतच आहे. जर आपण या पांचशें रुपयांतून दोनशें रुपये शिलकीस टाकाल, तर त्यांतून दीडएकशें रुपयांचीं भांडीं कुंडीं घेऊन बाकी पन्नास रुपये राहातील, ते या लग्नाचे संबंधें गरीब दुबळ्यांस दानधर्म करण्यास आणि अशाच दुसऱ्या सत्कार्यास लावावे, अशी माझी इच्छा आहे. आतां आमंत्रण वगैरे गोष्टीचे संबंधें किती खर्च येईल हें माझ्यानें सांगवत नाहीं, तरी पण त्याचा अजमास समजून घेण्याची आपली इच्छा असेल; तर आईकडून तो काढतां येईल. परंतु अशा भानगडींत पडण्यापेक्षां मला वाटतें कीं, हा सर्व कांहीं खटाटोप आईपाशींच रुपये देऊन जर तिजवर सोपाल, तर सर्वोत्कृष्ट काम होणार आहे. आमच्या घरीं जीं कांहीं भोजनें होत असतात, त्यांची सर्व कांहीं तरतूद आई स्वतःपहात असते. आणि जे जे लोक आमच्या येथें

भोजनास येत असतात, ते ते आमच्या येथल्या भोजनाची फारच तारीफ करीत असतात, आणि आई ह्मणते कीं, अशा जेवणांस फार खर्च लागतो असेंही कांहीं नाहीं."

याप्रमाणें आनंदरावानें या गोष्टीचे संबंधें आनंदीबाईचा काय विचार होता, तो समजून घेतला. नंतर आनंदीबाई आपल्या आईला विचारण्याकरितां ह्मणून घरांत निघून गेली. आणि कांहीं वेळानें परत येऊन ह्मणाली,–"आई ह्मणते कीं, दोनशें रुपयांत तीनशें मनुष्यांचें भोजन अति उत्तम करितां येईल. तेव्हां कोणकोणत्या किती मंडळीस आमंत्रण करणार त्यांची यादी एव्हांपासूनच करायास लागा. लग्नाच्या दिवशीं मंडपशोभा करण्याकडेस व तेलवातीचे खर्चाकडेस पन्नास रुपयांपेक्षां अधिक खर्च होऊं देऊं नये, असें तिचें ह्मणणें आहे." नंतर आनंदरावानें डाक्तर साहेबांचे पत्नीकडेस देण्याकरितां ह्मणून अडीचशें रुपये काढून आनंदीबाईचे हातावर ठेविले, आणि आनंदीबाईनें पूर्वी सांगितलेली यादी आणि पन्नास रुपये आनंदरावापाशीं दिले. नंतर उभयतां एकमेकांचा निरोप घेऊन निघून गेलीं.

यानंतर जे कांहीं थोडे दिवस बाकी राहिले होते, त्यांमध्यें लग्नाची सर्व कांहीं तयारी होऊन राहिली. आनंदरावाकरितां शेला पागोटें, आनंदीबाईकरितां दागदागिने, आदिकरून सर्व कांहीं सामान सुमान खरेदी करून झालें. जेवणाची सर्व कांहीं तरतूद डाक्तरसाहेबांचे पत्नीनें अगदीं लख्ख करून ठेविली होती. तिकडेस दुसऱ्या कोणास पाहायाची मुळींच गरज पडली

नाहीं. डाक्तर साहेबांचे दोघे मुलगे आणि त्यांच्या तैनातींतील चाकर माणसें यांनीं मिळून डाक्तर साहेबांचा बंगला व दारांतील लहानसा मंडप पल्लवांनीं आणि पुष्पांनीं इतका सुशोभित करून सोडला कीं, जणुं तें तपस्व्याचें परम पवित्र तपोवन किंवा पर्णकुटिकाच आहे कीं काय, असें वाटलें. लग्नाचे दिवशीं प्रातःकाळपासून डाक्तर साहेबांचे घरीं विवाहाचा उत्साह व आनंद सुरू झाला. कामाचा दिवस असला ह्मणजे तो केव्हां निघुन जातो हें कळत सुद्धां नाहीं. त्याप्रमाणें हां हां ह्मणतां त्या दिवशीं संध्याकाळ होत आली. आमंत्रण केलेली मंडळी एका मागून एक येऊन जमूं लागली. डाक्तर साहेब मंडपाचे दाराशीं उभे राहून आलेल्या मंडळीचें आगतस्वागत करूं लागले. आणि त्यांचे दोघे बंधू आलेल्या पाहुण्यांस लग्नमंडपांत नेऊन योग्य स्थळीं बसवूं लागले. दुसरे एक गृहस्थ त्यांचा आदरसत्कार करून त्यांच्याशीं संभाषण करूं लागले. श्रीमंत गरीब, लहान मोठे, या सर्वांचा सारखा मानपान ठेवला गेला. माझा आदरसत्कार करण्यामध्यें हेळसांड किंवा दुर्लक्ष झालें, अशी कुरकूर कोणा एकास देखील करण्यास जागा राहिली नाहीं. जी व्यवस्था बाहेर मंडपांत, तीच व्यवस्था स्त्रियांच्या अंतःपुरांतही होती. तेथें डाक्तर साहेबांची पत्नी दुसऱ्या दोन जवळच्या नातेवाईक बायांना मदतीस घेऊन स्त्रियांचा आदरसत्कार ठेवीत होती.

याप्रमाणें एकामागून एक स्त्रिया आणि पुरुष येऊन खूप गर्दी होऊन गेली. त्यांत प्रार्थनासमाजाची सभासद मंड-

ळी बरीच होती. डाक्तर साहेबांचा व मागें सांगितलेले यशवंतराव माणगांवकर यांचा फारच वरोबा होता; आणि आनंदरावाला या चांगल्या मार्गी लावण्यास तेच कारण झाले होते; ह्मणून पौरोहित्यही त्यांनींच चालवावें, असें डाक्तर साहेबांनीं त्यांना सांगितलें होतें. नंतर त्यांनीं तो विधि ब्राह्म धर्माला अनुसरून चालविला. प्रथमत: वधूवरांस दोघांला दोन ठिकाणीं, सर्वविघ्नहर्ता जो मंगलमूर्ति परमेश्वर त्याचें ध्यान करण्यास बसविलें. कांहीं वेळानें वरास बाहेर आणून कन्यादात्याच्या समोर बसविलें. नंतर, कन्यादात्यांनीं यथाविधि वस्त्राभरणांहीं सत्कार केला. मग नवीं वस्त्रें वरानें परिधान केल्यावर, कन्यादात्याच्या पत्नीनेंही वरील प्रमाणेंच वराचा पुन: सत्कार केला. या नंतर वरास बाहेर आणून कन्यादात्याच्या उजवे बाजूस बसविलें, व नववस्त्रें परिधान केलेल्या व अलंकारयुक्त अशा वधूस स्त्रियांनीं आणून कन्यादात्याच्या डावे बाजूस वराशीं संमुख असें बसविलें. मग उभय पक्षांच्या नामगोत्रांचा उच्चार होऊन, कन्यादान झालें, व वधूवरांचा विवाहसंस्कार ह्मणजे परस्परांचीं परस्परांशीं अभिवचनें झालीं; आणि आपले सर्व धर्म आपणांस सदासर्वकाळ यथायोग्य रीतीनें पाळतां यावे ह्मणून त्यांनीं सर्वशक्तिमान्, परमेश्वराची प्रार्थना करून त्याजपाशीं साहाय्य मागितलें. मग, या विवाहित तरुण स्त्रीपुरुषांस प्रपंचमार्गी सत्याची वाट दाखवावी, त्यांच्या क्रिया मंगल असाव्या, त्यांहीं सदा भक्तिपरायण रहावें, व शांति, धर्म व सुख यांचा

लाभ त्यांस व्हावा, अशी आचार्यांनींही परमेश्वराची प्रार्थना केली. एथवर विधि झाल्यानंतर, आचार्यांनीं वधूवरांस त्यांच्या पुढील कर्तव्याविषयीं बोध केला. तो असा:—

" हे विवाहित स्त्रीपुरुषहो, या मंगल आणि गंभीर अशा प्रसंगीं तुह्मांस चार शब्द मित्रभावानें सांगण्याची माझी इच्छा आहे. तर तुह्मीं कृपाकरून त्यांकडे लक्ष्य द्यावें. तुह्मीं लहान अहां. विवाह बहुधा तारुण्याच्या प्रारंभींच होतात. तरुणांस प्रपंचाचा अनुभव नसतो. तेव्हां अशा दंपतींतल्या शेंकडा नव्याण्णवांस, आपणाला आतां एकसारखें अविच्छिन्न सुखच मिळणार आहे, असें वाटतें. सुख मिळण्याची इच्छा असणें स्वाभाविकच आहे. पण अशा तरुण नवविवाहित स्त्रीपुरुषांची सुखाविषयीं कल्पना ह्मटली ह्मणजे धन, वस्त्र, अलंकार, विषयापासून होणारें प्रापंचिक सुख, हीं होय. परंतु हें सुख देखील संसारीं अविच्छिन्न मिळत नाहीं. देव ज्या स्थितींत ठेवील त्यांत संतोष मानून राहिलें पाहिजे. पुनः, वस्त्रालंकारांची जरी अनुकूलता असली, तरी काय त्यांहीं मन सदां तृप्त आणि संतुष्ट राहणार? केवळ प्रापंचिक व विषयसंबंधीं सुखानें मन कंटाळल्यासारिखें झाल्यावांचुन राहणार नाहीं. अहो, हें सुख अनित्य आहे. परंतु तें देवाच्या दयेनें प्राप्त झालें तर त्यांत कांहींच समाधान नाहीं असें ह्मणणें नाहीं. देवाच्या भक्तीपासून होणारें जें नित्य व खरें सुख, तें जर घरांत आहे, तर प्रपंचांत सर्व वस्तूंची अनुकूलता असण्यामध्यें

जो सुखाचा अंश असतो, तो विशुद्ध होऊन समाधानकारक होतो. तर पहा कीं तुह्मीं उभयतां आज प्रपंचमार्गी लागलां अहां. तुह्मांस निरंतर सुखच व्हावें अशी माझी इच्छा आहे. परंतु मनुष्याच्या इच्छेप्रमाणें नेहमीं सर्व गोष्टी घडत नाहींत. संसार नेहमीं सुखावहच होतो असा अनुभव नाहीं. संसार करणें ह्मणजे प्रवास करणें आहे. प्रवासांत मार्गक्रमण करीत असतां वाटेंत इंद्रियांस सुखकारक अशाच वस्तु लागतात असें नाहीं. सदां थंड वायु सुटून श्रांत झालेल्या शरीरास विश्राम करितो, इच्छेस वाटेल तेथें गोडें पाणीं प्यावयास मिळून तृषा शमन करितां येते, सर्वत्रच हिरवेगार वनवृक्ष दिसून नेत्रोत्सव करिताहेत, मनाला भीति उत्पन्न करणारें मार्गी कांहीं एक विघ्न नाहीं, मार्गी विषमता ह्मणून कांहींच नाहीं, कोणती अडचण प्राप्त होत नाहीं, असें सुदैव कोणाचें आहे? प्रवासी जो असतो त्याला अनेक प्रसंग येतात. त्याचा मार्ग नेहमीं सरळ व कंटकरहित असतो असें नाहीं. वास्तविक पहातां तो मार्ग याहूनही कठीण आहे. केव्हां पाऊल चुकून त्या कड्यावरून पडावयास होईल हें सांगवत नाहीं. आणि तेथें वाट दाखवावयास कोणी मनुष्य समर्थ होत नाहीं, असा व्यासादि महर्षींचा अनुभव आहे. या बिकट वाटेचा नकाशा ह्मटला ह्मणजे धर्म हा होय. ह्मणून तुह्मी सर्व प्रसंगीं धर्माचा अवलंबन व आचरण करा. केवळ दोन पैसे पदरीं केल्यानें सुख होतें असें समजूं नका. धर्मसंचय पदरीं केला तर मात्र शाश्वत सुख

निःसंशय होतें. आणि सकल धर्मांचे झरे जेथून निघतात तो उगम एकच अद्वितीय परमेश्वर होय. त्याला तुह्मीं आराधनेनें आळवा. तो एकटाच तुह्मांला इहलोकीं आणि परलोकीं उपयोगीं पडणार. तोच तुह्मांस एकटा धर्ममार्ग दाखवील. तुह्मांस संसारीं सर्व प्रसंग गोड करील, विपत्तींत धैर्य देईल, संपत्काळीं क्षमा देईल, दुःखीं समाधान व संकटीं आश्रय देईल. देवाला कधीं विसरूं नका. विषयसुखाला भुलूं नका. सकळ सुखें देणारा एकला तोच हें मनीं घट्ट करा. त्याच्या ठायीं भक्तिपरायण व्हा. तुमचें एकमय अंतःकरण हा देवाचा देव्हारा आहे, व तुमचें घर हें त्याचें पवित्र देवालय आहे, ही गोष्ट अनुभवास आणून दाखवा आणि तेणेंकरून कुटुंबांत धर्माची समृद्धि करा. आपले बंधु त्रिवर्ग आहेत—पैका, बांधव आणि धर्म. यांतून पहिला अंतकाळीं उंबरठ्याच्या बाहेर पाय काढीत नाहीं. दुसरा स्मशानापर्यंत मात्र येतो. परंतु तिसरा ह्मणजे धर्म आपलें इहलोकीं कल्याण करून आपणाबरोबर परलोकींही येतो.

अहो आनंदरावजी, आतां आपणास माझें विशेष ह्मणणें असें आहे कीं, आज आपण या गुणयौवनसंपन्न स्त्रीचें पाणिग्रहण केलेंत, ती अबला आहे, व अज्ञ आहे. तिला आतां संसारमार्गी सोबत व धीर तुमचाच असावयाचा. कोमल लतारूपी स्वभावानें ती आतां ज्या वृक्षाचा आश्रय करणार, तो आधारभूत वृक्ष तुह्मीच होय. आतां तुमची एकट्याचीच तुह्मांस काळजी

नाहीं. तुमची आतां ही पत्नी जन्माची भागीदारीण झाली आहे. तेव्हां तुह्मी तिचें स्वतःप्रमाणेंच कल्याण करावें. तुह्मीं आज पवित्र विधीनें तिचा धर्मपत्नी ह्मणून अंगीकार केला आहे. तर तिला तुह्मीं यत्नेंकरून धर्मज्ञान करून द्यावें. आणि अबला स्त्रीस प्रपंचांत जें जें पुरुषाचें साहाय्य पाहिजे, तें तें सर्व तिला तुह्मीं द्यावें. धर्मार्थादिकांमध्यें तिला कोणत्याही प्रकारें अंतरूं नये. या धर्मपत्नीशीं प्रेमानें व सख्यत्वानें वागून व पत्नीव्रतधर्म पाळून तिला संतुष्ट ठेवावें.

अहो आनंदीबाई, तुह्मांसही दोन विशेष शब्द सांगतों.-आजवर तुह्मीं डाक्तरसाहेबांचे घरीं वाढलां. आतां डाक्तर साहेबांनीं ह्मणजे तुमच्या वडिलांनींच ह्मणा, तुह्मांवरील आपलें सर्व स्वामित्व काढून तुह्मांस सर्वसाक्षी परमेश्वरासमक्ष तुमच्या पतीच्या स्वाधीन केलें आहे. आजपासून तुह्मांवर सर्व अधिकार तुमच्या पतीचा होय. तर आतां तुह्मीं पतीचा आश्रय करून त्याच्या समागमें सदा सुखी रहावें. धर्मादि आचारांमध्यें त्यांचे तुह्मीं साहचर्य करावें. तुमचे पति हें तुमचें जन्माचें सौभाग्य होय. तुह्मीं त्यांच्या आज्ञेंत आणि सेवेंत रहावें, आणि त्यांच्या साहाय्यानें धर्मज्ञान संपादावें, व आपल्या सर्व क्रिया शुद्ध होत अशा रीतीनें वर्तन स्त्रीस्वभावाला योग्य अशा वृत्तीनें व मर्गानें वागावें. तुह्मां स्त्रियांच्या ठायीं साजणारें व उभय कुलांस भूषण देणारें असें एक उत्तम रत्न ह्मटलें ह्मणजे पातिव्रत्य हें होय. पतिव्रताधर्माची स्तुति करा-

वी तितकी थोडीच. ऋषींनीं प्रशंसापूर्वक या धर्माचा बोध केलेला आहे. पुराणांनीं त्याचें माहात्म्य वर्णिलें आहे. आज मितीपर्यंत सर्व लोकांत हा धर्म स्त्रियांस मोठा अलंकार गणिला आहे. कडक पातिव्रत्य हें स्त्रीधर्मरक्षणार्थ एक तीक्ष्ण खड्ग आहे. पतिव्रतेस ज्या गोष्टी साध्य होतात, त्या महापराक्रमी पुरुषांच्या बाहुबळानें होत नाहींत. यास पुष्कळ प्रमाणें मिळतात. पहा, पतिव्रताधर्माची सिद्धि मोठी आहे. अशा स्त्रीवर ईश्वर प्रसन्न असतो. तिच्या घरीं लक्ष्मी वास करिते. तिचीं लेंकरें चांगलीं निपजतात. तिचा उभय कुळांस अभिमान वाटतो. ती घरांतील वडिलांस मान्य होते, व आपल्या पतीस प्रिय होते. तिचा चांगला लौकिक होतो. तिचा कित्ता पुष्कळ स्त्रियांस उपयोगीं पडतो, व तिचें तेज इतर स्त्रियांमध्यें पडून त्यांच्यामध्यें अपूर्व सुधारणा होते. पतिव्रतेस घरीं व शेजारीं मान मिळतो, आणि "धन्य ती माउली" असें सर्वांमुखीं निघतें. स्त्रियांची कोणी संपत्ति विचारीत नाहीं. पातिव्रत्य हीच त्यांची संपत्ती होय. आणखी, पातिव्रत्याचें पवित्र व सौम्य तेज पातिव्रतेच्या सर्वांगीं उत्तम रीत्या शोभतें. चंद्रहार, मोत्यांचे घोंस, बुगड्या, बाळ्या, वज्रटीक, सरी, तोडे, कंकणें, जोडवीं, विरोद्या, हे जरी उंच धातूंचे दागिने असतात, तरी ते फक्त घातलेल्या स्थळीं मात्र थोडी शोभा देतात. पण या धातूंहून पातिव्रत्य ही अति उच्च धातु होय. हें जिनें लेइलें, त्या स्त्रीच्या सर्वांगीं शुद्ध कांतीची प्रभा

फांकते. तर हा धर्म, पतीची आज्ञा पाळणें, पतिसेवा करणें इत्यादि अनेक कार्यांमध्यें तुह्मी पाळावा.

पुनः शेवटीं उभयतांला दोन शब्द सांगून आटपतों. आजपासून तुमचीं हीं दोन कुटुंबें एक झालीं आहेत. तर या दोन्ही कुटुंबांतील वडील मनुष्यांस तुह्मी मान देत जा. त्यांनीं पुष्कळ त्रास सोसून तुह्मांस लहानाचें मोठें केलें आहे, व आज तुमचें मंगल कार्य करून तुह्मांस एकमेकाचे जन्माचे सोबती करून देऊन, तुमचें सुख पहावें अशी आशा तीं कारेताहेत. तर त्यांहीं आजपर्यंत तुह्मांवर केलेले व यापुढें करतील ते उपकार कृतज्ञतापूर्वक स्मरा. त्यांच्या आज्ञेंत रहा, त्यांची सेवा करा, व त्यांस साहाय्य करा. आपल्या चाकरनोकरांवर ममता व दया करा, त्यांची काळजी वहा, व त्यांची सदा तहान भूक पहा. त्याप्रमाणेंच गरीबांची तुह्मांस नेहमीं दया यावी. ते आपले बंधूच होत. त्यांस दानधर्म केला ह्मणजे तो देवास पावतो, व आपल्या गरीब बंधूंची आपण कळकळ केली ह्मणजे तो आपणांवर प्रसन्न होतो. शिवाय, दीनांस दानधर्म केल्याविना गृहस्थाश्रमाचें सार्थक्य होत नाहीं. शेजाऱ्यांच्या संबंधानेंही कांहीं घस व गैरसोय सोसावी लागली तर ती संतोषवृत्तीनें सोसून त्यांकडून भलेपणा मिळवा. घरीं सर्वांशीं प्रेमानें व मिळून रहा, व जगीं सर्वांशीं नम्रतेनें वागा. गृहस्थाश्रम ही मोठी पुण्य जोडण्याची जागा आहे, यांत बहुत सत्क्रिया, परोपकार व धर्म करण्याची सवड आहे. तर, ही अमूल्य संधि व्यर्थ न दवडितां तिजपासून तुह्मीं

लाभ करून घ्यावा, व भगवत्पदकमलीं सदा लीन असावें, अशी माझी उभयतांपाशीं विनंती आहे. मुली, तुझा पिता परलोकवासी झाल्यापासून आज बारा वर्षें तुझा प्रतिपाळ डाक्तरसाहेबांनीं चांगल्या रीतीनें करून तुला शिक्षणही दिलें, व बारा वर्षें ह्मणजे तुझ्या लहानपणापासून तुझें वर्तन मीं पाहात आलों आहें; तूं आपल्या घरीं चांगला प्रपंच करून रहा, असें सांगण्याचा जो मला योग आला त्याचा मला संतोष वाटतो. तर या पुढेंही घरीं चांगलें ह्मणून घे ह्मणजे तें ऐकून मला नेहमीं आनंद होईल."

नंतर या तरूण दंपतीनें चिरकाल सुखी असावें ह्मणून पुरोहितांनीं ईश्वरापाशीं आशीर्वाद मागितला. मग स्त्रियांचे अहेर वगैरे झाले. नंतर अत्तर, गुलाब, तुरे, नारळ व विडे वांटल्यावर मंडळीनें फराळ केला. व जाणार मंडळी निघून गेली, आणि राहिलेल्या मंडळीचा कांहीं वेळानें भोजन समारंभ झाला.

बाहेरील दालनांत पुरुष मंडळीकरितां व आंतील दालनांत बायकांकरितां पात्रें मांडलीं होतीं; आणि त्यांवर चटण्या कोशिंबिरी, शाखभाज्या आदिकरून दाटी न होण्याजोगे व्यवस्थेशीर. रितीनें पदार्थ वाढून, ती सर्व तयारी अगोदरच करून ठेविली होती. जेवणार मंडळी पात्रावर येऊन बसली तेव्हां पोळ्या, भात, वरण इत्यादि पदार्थ वाढून जेवणास आरंभ झाला. " मीठ आणा मीठ, वरण आणा वरण " असा गोंगाट करून कोणा एकास देखील वाढावयास सांगण्याची गरज पडली नाहीं.

कां कीं, वेळोवेळीं व क्रमाक्रमानें वाढपी स्त्रिया व पुरुष सर्व कांहीं पदार्थ घेऊन पंक्तीमधून फिरतच होते, आणि ज्यांना जें लागेल तें विचारून वाढीत होते. वाढ-प्यांची चलाखी, व जेवणाचा सर्वोत्कृष्ट बातबेत, हीं पाहून जेवणार मंडळी फार संतुष्ट झाली, आणि मोठ्या आनंदानें भोजन करूं लागली. भोजन करीत असतां कोणी जेवणाची प्रशंसा करूं लागले, कोणी मधून मधून श्लोक, आर्या इत्यादि ह्मणूं लागले, कोणी एकमेकांस इकडच्या तिकडच्या गोष्टी सांगूं लागले, कोणी पाठीमागचे मंडळीकडेस वळून हळूच ह्मणूं लागले कीं, " कां महाराज, या अशा सुग्रास भोजनावर आडवातिडवा हात मारण्यास सां-पडला, याबद्दल आमचे उपकार माना, नाहीं तर आ-नंदराव कसचा मारवाडी ! तो तर लग्नाचा सर्व खर्च पांचशें रुपयांतच आटपून घेण्यास पहात होता, पण आह्मीं कीं नाहीं, जेव्हां त्याला इकडून तिकडून चांगला खांसडला, कीं बाबारे, मोठमोठ्या धेंडांस तूं जेवणाचें आमंत्रण करणार ह्मणतोस, तेव्हां त्यांच्या पुढें ताकभात घालून आपली फजीती का करून घेणार ! ! तेव्हां तो अम्मळ शुद्धीवर आला. आणि मग हा असा जेवणाचा थाट त्यानें करविला. " असो. सांगायाचें इतकेंच कीं, याप्रमाणें सर्व कांहीं लग्नकार्य मोठ्या आनंदानें व निर्विघ्नपणें शेवटास गेलें, लग्नाचे खर्चाकरितां ह्मणून जी रकम आनंदरावानें निराळी काढून ठेविली होती, त्यांतून आनंदीबाईचे

सांगीवरून खर्चाची काटकसर करतां करतां शंभर रुपये शिलकीस पाडले, आणि तिचेच अनुमतानें त्यानें ते रुपये लग्नाचे स्मरणार्थ धर्मकृत्याकडेस लाविले.

## प्रकरण अकरावें.

### प्रपंचास आरंभ.

विवाह झाल्यावर आनंदीबाई तीन दिवस माहेरीं राहून, चौथे दिवशीं पतीचे घरीं राहावयास निघून गेली. नवीन घरांत रहावयास गेलें ह्मणजे तेथील व्यवस्था व टापटीप करण्यामध्यें किती परिश्रम करावे लागतात, याचा अनुभव सर्व गृहस्थांना थोडाबहुत तरी आलाच असेल. आनंदीबाई तर अशा टापटिपीचे कामामध्यें किती कुशल होती, हें सांगावयास नकोच. यामुळें त्या दिवशीं तिला आंवढा घोटण्यास कशी ती फुरसत मिळाली नाहीं. आनंदीबाई ते परिश्रम करण्यामध्यें थकून जाऊन अगदीं त्रासून गेली होती कीं काय? तिला पवित्र प्रेमाचे ऐवजीं धनसंपत्तीचीच अधिक आवड होती कीं काय? हें स्त्रीनिंदकांनीं त्या दिवशीं तेथें एक घटकाभर तरी जाऊन पहावयाचें होतें. आपल्या मनाजोगा पति न सां-

पडल्यास आपण लग्न करावयाचें नाहीं, असा तिनें मनामध्यें दृढ निश्चय केला होता; पण हें टवाळखोर लोकांना कळणार कोठून? त्यांनीं तर नेहमीं लोकांपाशीं जाऊन तिची निंदा करून ह्मणावें कीं, आनंदीबाई प्रेमाची भुकेली व गुणाची परीक्षा करणारी ह्मणतात तशी नाहीं आहे. ती तर ऐश्वर्य संपत्तीची दासी आहे. धनसंपत्तीला तिनें आपला देह विकून टाकला आहे. या प्रकारें स्त्रीद्वेष्ट्यांनीं आनंदीबाईचे संबंधानें नानाप्रकारची वल्गना करून तिचें पवित्र मन आपापल्या वाचाळतेनें व्यर्थ भ्रष्ट करण्याचा प्रयत्न किती केला होता, तें कांहीं पुसूं नका. अशाप्रसंगीं कुटाळ लोकांच्या कुत्सित शब्दबाणांपासून आपल्या मनाचें सांत्वन करून घेण्याकरितां आनंदीबाईला एक सबळ कारण होतें. तें हें कीं, जेवढ्या ह्मणून सुशिक्षित व शिकणाऱ्या बाया शहरामध्यें होत्या, त्या सर्वांशीं आनंदीबाईची ओळख थोडी बहुत होतीच, आणि त्या सर्व बाया त्या कुटिल शिरोमणींचे स्तुतीस थोड्या बहुत पात्र होऊन चुकल्याच होत्या. परंतु त्यांस आमचें इतकेंच विचारणें आहे कीं, सुशिक्षित, नीतिमान् आणि गृहव्यवस्थेंत निपुण अशा पत्नीचें पाणिग्रहण करण्याची इच्छा त्यांच्या मनांत नाहीं कीं काय? ज्या ज्या सुशिक्षित स्त्रिया याप्रमाणें निंदेच्या वावटळींत सांपडतात, त्या सर्व सद्गुणांच्या भुकेल्या असाव्या, यांत कांहीं संशय नाहीं. यावरून त्यांचा मनुष्यपणा

ढळढळीत व उघड दिसून येतो. आतां "ऐश्वर्य संपत्तीला देह विकून टाकणाऱ्या" हा जो त्यांच्यावर दोषारोप आहे, तो नीच आणि कुटाळ अशा मनुष्यां शिवाय दुसरा कोणीही त्यांस सहसा देऊं शकणार नाहीं. आतां आनंदीबाईचे संबंधें पाहूं गेलें तर, ती या दोषारोपास मुळींच पात्र नव्हती, हें तिनें आपल्या उदाहरणांवरून लोकांपुढें ढळढळीत प्रमाण ठेवलेंच होतें. तिच्याशीं पुनर्विवाह लावण्याकरितां पुष्कळ मोठमोठ्या लोकांनीं पूर्वीं खटपट करून पाहिली होती, परंतु ती सर्व निष्फळ झाली होती. शेवटीं आनंदरावासारख्या गरीब मनुष्याशींच तिनें लग्न लाविलें, आणि त्याचे घरीं गेल्यावर तेथील घरसंसार ती आनंदानें चालवूं लागली हें स्त्री निंदकांनीं एक वेळ जाऊन पहावयाचें होतें, आणि मग जर त्यांना निंदा करावीशी वाटली असती तर त्यांनीं ती खुशाल करायाची होती.

आनंदीबाईला सकाळ सांज अशा दोन्ही वेळां सैंपाक करून जो वेळ सांपडे, त्या वेळामध्यें तीन दिवस रात्रंदिवस परिश्रम करून घरांतील सर्व कांहीं सामान सुमान बंदोबस्तानें व व्यवस्थित रीतीनें लावून टाकलें. जें सामान ज्या जागीं ठेविलें असतां ऐन गरजेचे वेळीं त्याचा चांगला उपयोग करितां येऊन. शिवाय त्याचे पासून घरास शोभाही येईल, तें सामान त्या त्या जागीं ठेविलें होतें. याप्रमाणें प्रत्येक वस्तूला एक एक जागा तिनें नेमून टाकली. फार कशास, पण घरांतील मोडकें तोडकें सामान व केरकचरा

अव्यवस्थित न टाकतां, त्यालाही एक ठिकाण नेमून दिलें. लहानसहान वस्तूंची हेळसांड केली तर, हळू हळू मोठमोठाल्या वस्तूंविषयींही आपली अनास्था होत असते, याचा अनुभव तिला पूर्णपणें आला होता; आणि अशा लहानसहान वस्तु व केरकचरा सांठवून ठेविला असतां, समयीं त्यापासून मोठा लाभ होत असतो, हेंही तिला पूर्ण माहीत होतें. ह्मणून अशा वस्तु सुद्धां ती मोठ्या आस्थेनें जतन करून ठेवीत असे.

आनंदीबाईला हातभार लावण्याकरितां, आनंदरावाच्या मित्रांनीं जी एक बाई पाहून दिली होती, ती घरांतील सामानसुमान नीटनेटकें लावण्याचे कामीं आनंदीबाईला यत्किंचित्‌ही उपयोगीं पडली नाहीं. परंतु आनंदीबाईनें ज्या वस्तु ज्या जागीं व्यवस्थित रीतीनें रचून ठेविल्या होत्या, त्या कांहीं कामाकरितां तिनें दुसऱ्या ठिकाणीं नेल्या तर त्या पुन्हा जागचेजागीं आणून ठेवण्यासही तिला जड वाटे. एका जागेवरील वस्तु दुसरे जागीं ठेविली असतां, त्यापासून सामानाचा फार गोंधळ होत असतो, आणि असा सामानाचा गोंधळ झाला ह्मणजे त्यापासून कामही चांगलें व वेळचेवेळेवर होत नसतें, हे आनंदीबाईनें तिला कितीएक वेळां समजून सांगितलें होतें. परंतु त्यापासून तिचे मनावर कांहीं एक परिणाम झाला नाहीं. तिनें शहरांतील शेंकडों मोठमोठ्या लोकांचीं नांवें पटापट घ्यावीं, आणि ह्मणावें कीं, "इतक्या लोकांचे इथें मीं काम केलेलें आहे, व त्यांच्या घरच्या सामानसुमानाचा सर्व कांहीं बंदो-

वस्त मीं जातिनिशीं ठेविला आहे, व तो ठेवून ठेवून माझे हे काळ्याचे पांढरे केंस झाले आहेत. आणि आतां तुह्मीं नउ्यानवतीच्या कालच्या पोरी मला शिकवूं लागलां, याला ह्मणावें तरी काय ?" बरें, तिला बाजारांतून कांहीं जिन्नस आणावयास सांगितला ह्मणजे, तिनें चांगला आणावयाचा टाकून जितका नासका कुजका सवंग मिळेल, तितका पाहून आणावा, आणि एक पैशाचा आणला तर त्याला दीड पैसा सांगावा. कधीं कधीं एक जिन्नस आणावयास सांगितला, तर तिनें आपले मर्जीस वाटेल तसा भलताच आणावा. आणि त्याचेसाठीं कांहीं ह्मणायास गेलें कीं, पुन्हा मोठमोठ्या लोकांच्या नांवांचा जप तिनें करावा, आणि ह्मणावें, "अमक्या तमक्याचे घरीं मी होतें तेव्हां दर दिवस नाहीं तरी तीन चार रुपयांचा नुसत्या किराण्याच जिनसाचा बाजार मी करीत असें, तेव्हां कशी ती एका कवडीला मी त्यांच्या शिवलें नाहीं; आणि पुढें आतां मला लेंकरें बाळें व्हावयाचीं आहेत कीं नाहीं, त्यांच्याकरितां तीन चार आण्यांचा बाजारांतून पैसा मागें ठेवितें आहें." असें ह्मणून तिनें मुळमुळ रडूं लागावें. आनंदीबाईनें पाहिलें कीं, हें असें डोईवर चढून बसणारें चाकर माणूस ठेवून आपल्या कांहीं कामाचें नाहीं, याचेपासून आपणांस दुप्पट त्रास मात्र होतो. ही जी सामानाची चाळवाचाळव करून टाकिते, तें पुनः नीटनेटकें करून ठेवायाला माझा बराच वेळ मोडतो. नाहीं तर तितके वेळामध्यें

दुसरीं अनेक कामें करितां आलीं असतीं. असा विचार करून, आनंदीबाईनें तिला लवकरच रजा दिली, पण तेणेंकरून तिनें आपले पाठीस एक नवीन विकत श्राद्ध मात्र लावून घेतलें. मोलकरीण तेथून निघाल्यावर, सगळ्या गांवभर हिंडून, जेथें जेथें समाजाचे लोक रहात असत त्यांजपाशीं जाऊन, आनंदीबाई अशीच, आनंदीबाई तशीच, ती निर्दयच, तिला दया नाहीं, असें भलभलतें सांगूं लागली. ज्या गोष्टीपासून आपल्या पदरास कांहीं खार लागत नाहीं, अशा गोष्टींत पुष्कळ लोक आपणांस विलक्षण प्रकारचा कळवळा व दुःख झाल्याचें दाखवीत असतात, त्याप्रमाणें ह्या मोलकरणीचें कपटी अश्रुजाल पाहून, पुष्कळांचें हृदय अगदीं पोळून गेलें, आणि त्या सर्व जणांनीं आनंदीबाई ह्मणजे निष्ठुरतेची प्रतिमूर्तिच आहे, असें समजून आपले मनांत बळकट गांठ घालून ठेविली.

असो. मोलकरणीची रवानगी आनंदीबाईनें केल्यावर, ती आनंदरावास ह्मणाली कीं, "आपण जेव्हां सकाळचे प्रहरीं फिरायास निघतां, तेव्हां नारायणास आपले बरोबर घेऊन जाऊन, जर त्याचे जवळ बाजारांतील जिन्नस घेऊन द्याल, तर फार चांगलें होईल." हा विचार आनंदरावालाही पसंत पडला. नारायण हा नगराकडलाच रहाणारा होता. तो आनंदरावाचे हपिसांत पांच रुपयांस हमालाचे कामावर होता. तो आनंदरावाचे घरचें काम काज करून आज तीन वर्षें त्याचेच येथें जेवीत खात असे. आनंदराव दररोज नारायणास

बरोबर घेऊन जाऊन त्याजपाशीं भाजी पाला व सामानसुमान घेऊन देत असे. आनंदीबाई ही आपल्या हातें सैंपाक करीत असे, परंतु त्यांतले त्यांत जेवणास उशीर न करतां तिनें तीन चार प्रकार नेहमीं करावे. आणि आनंदराव जेवायास बसला कीं, ते उत्तम पंचामृतासारखे लागतात, असें ह्मणून त्यानें फार खूष व्हावें. आनंदरावास सकाळचे प्रहरीं अम्मळ लवकर हापिसांत जावें लागत असे, त्यामुळें त्या नवराबायकोस सकाळचे वेळीं एका पंक्तीस जेवायास फावत नसे. परंतु संध्याकाळचे वेळीं मात्र एका पंक्तीस बसून मोठ्या मौजेनें तीं गोष्टी करीत करीत भोजन करीत असत. मोलकरीण गेल्यानंतर, तिनें चार दिवसांचाच हिशोब ताडून पाहिला, त्यावरून तिला असें दिसून आलें कीं, मोलकरणीचे हातून जितका खर्च होई, त्याचे पेक्षां थोड्या खर्चांत चांगले चांगले जिन्नस आणून सैंपाकही उत्तम प्रकारचा होत असतो.

मोलकरणीला याप्रमाणें काढून दिल्यावर आनंदीबाईनें दुसरी एकादी मोलकरीण आढळल्यास ती पाठवून देण्याविषयीं आईस पत्र लिहिलें. त्याचें उत्तर, डाक्तर साहेबांचे पत्नीनें पाठविलें, तें येणेंप्रमाणें:—

बुधवार ता. ९ एप्रिल.

चिरंजीव सौभाग्यवती आनंदीबाई;—

फार फार प्रेमालिंगन पूर्वक आशीर्वाद विशेष—तूं नारायणाचे हातें पत्र पाठविलेंस तें पोंचलें. त्यावरून असें दिसलें कीं, तूं मोलकरणीचे त्रासानें अगदीं कंटाळून गेली असावीस, आणि ह्मणूनच तूं तिला काढून लावलीस, एऱ्हीं तुझे हातून अशी गोष्ट झाली नसती. बरें, आतां तूं आमचे सखूचे ओळखीनें कोणी चांगली मोलकरीण किंवा गडी पा-

ठेवून देण्यास लिहितेस, तर, या मुंबईसारख्या बकाली शहरामध्यें चांगलें गडीमाणूस मिळण्यास कोण मारामार पडते, याचा अनुभव तुला अजून पुरता आला नाहीं. पहिल्यानें फार प्रयासानें सखूसारखी मोलकरीण आह्मांस मिळाली, आणि नंतर आज कितीएक वर्षें आमचे येथें ती राबतां राबतां काम करण्यामध्यें आमचे मनाजोगी निवडली आहे. मी सखूलाच तुला दिली असती; परंतु ती दिल्यानें आमच्या या घरखटल्याच्या अफाट कामाचा सर्व गोंधळ होऊन जाईल, हें तूं सर्व जाणते आहेस. तरी पण तुला दुसरें कोणी गडी माणूस मिळेपर्यंत तुझे कामीं हातभार लावण्याकरितां सवडी सवडीनें सखूलाच तुजकडेस पाठवीत जाईन. सखूला विचारतां, तूर्त कोणी कामाची माहितगार, गरीब आणि विश्वासू अशी मोलकरीण मिळेल असें वाटत नाहीं, ह्मणून कांहें नवी नवखी आढळण्यांत आली तर पहातें. सध्यां तुझा संसार लहान आहे; तेव्हां नवीन एकादी मोलकरीण मिळाली तर त्यापासून तुझें फारसें अडेल असें वाटत नाहीं. शिवाय दुसरें असें आहे कीं, नवीन मोलकरीण असली ह्मणजे तिला पाहिजेल तसें वळण देऊन शिकवितां येतें, व तीही ऐकून त्याप्रमाणें वागते. तूं सुज्ञ आहेसच, परंतु या चाकर माणसांचे संबंधानें दोन गोष्टी तुला कळवाव्याशा वाटतात. त्यांपैकीं पहिली गोष्ट ही कीं, जें चाकरमाणूस श्रीमंतांचे येथें वहिवाटलें असतें, त्यास आपल्यासारख्या गरीब मनुष्यांनीं कधींही चाकरीस ठेवूं नये. आपल्या घरांतील गडी माणसांतून कोण कसें काम करीत असतें, याकडे श्रीमंत लोकांच्या बायकांचें मुळींच लक्ष नसतें, त्यामुळें चाकर लोकांस आपल्या मनास वाटेल तसें काम करण्याची संवय लागलेली असते. तेव्हां अर्थात् त्यांना दुसऱ्याचे सांगीप्रमाणें काम करण्यास रुचत नाहीं. ते समजतात कीं, आह्मीच काय ते शहाणे, कोणतें काम कसें करावें, हें इतरांपेक्षां आह्मांसच चांगलें कळत आहे. तेव्हां आमच्यासारख्यांनीं त्यांना, असें नाहीं असें, सांगितलें कीं, त्यांच्या पूर्वीचे धनन्यांप्रमाणें आह्मी मोठ्या मनाच्या नव्हेंत, आमची नजर बारीक, असें समजून ते आमची हेळणा करायास लागतात. दुसरी गोष्ट अशी आहे कीं, जो पुष्कळ दिवस एका घरीं चाकरी क-

रून नंतर तेथून निघाला आहे, अशालाही आपण कदापि चाकरीस ठेवूं नये. याचें मुख्य कारण असें आहे कीं, फार दिवस आपल्या येथें इमानें इतबारें काम केलेल्या चाकर माणसास कोणी तशाच मोठ्या अपराधाशिवाय एकाएकीं काढीत नसतो. तसेंच, ज्यानें एका घरीं पुष्कळ दिवस काम केलेलें आहे, त्याला तें घर सोडून दुसरीकडे चाकरीस राहाणें, हें सहसा आवडत नसतें. सारांश, अशा लोकांशी माथाकूट करतां करतां उगाच आपला वेळ मात्र खर्च होतो. ह्मणून माझें तुला इतकेंच सांगणें आहे कीं, कोंकणांतून आलेला अगदीं नवा नांगऱ्या जरी मिळाला, तरी तूं त्याला बेलाशक चाकरीस ठेव. मात्र त्याची प्रकृति सदृढ असून तो साफसूफ रहाण्याविषयीं जपतो कीं नाहीं हें पहा; ह्मणजे झालें. त्याला जरी कामाची फारशी माहिती नसली, तरी चालेल, परंतु त्यानें तुझ्या सांगण्याप्रमाणें मात्र सर्व कांहीं काम केलें पाहिजे, आणि असें केलें तर त्यापासून तुझा, कांहीं तोटा नाहीं, यांत पण तुझा उलटा फायदाच आहे असें समज. तूं आपले इच्छेप्रमाणें त्याला कामाचें वळण लावूं शकशील, अशी माझी खातरी आहे. चाकर माणसांना उगीचेंउगीच किंवा थोडक्या कारणाकरितां देखील रागें भरणें किंवा त्यांचा तिरस्कार करणें, हें योग्य नाहीं. त्यांजवर नेहमीं ममता करून त्यांना प्रीतीनें वागवीत जावें. हें सर्व तुला मी सुचविलें पाहिजे असें नाही, तें तूं सर्व जाणतच आहेस. जर तुला फारच अडचण पडूं लागली, तर त्याप्रमाणें लिही, ह्मणजे दुसरें गडीमाणूस मिळेपर्यंत चार दिवस सखूलाच तुजकडेस रहावयास पाठवीन. कळावें, हे आशीर्वाद.

तुझें कल्याण इच्छिणारी माता,

लक्ष्मीबाई.

आईचें वरील पत्र वाचून आनंदीबाईला पुष्कळ लाभ झाला. श्रीमंतांचे घरीं वहिवाटलेलें गडीमाणूस चाकरीस ठेविल्यापासून आपला किती तोटा होत असतो, याचा पूर्ण अनुभव तिला पूर्वींच आला होता,

आणि आतां तर तिनें असा निश्चय केला कीं, आईनें सांगितल्याप्रमाणें जोंपर्यंत आपणास गडी माणूस मिळणार नाहीं, तोंपर्यंत तें ठेवायचेंच नाहीं. याप्रमाणें गड्याशिवाय बरेच दिवस आनंदीबाई ही घरचें कामकाज करूं लागली. परंतु थोड्याच दिवसांत तिला एक मनाजोगी मोलकरीण मिळाली. त्या मोलकरणीचें नांव सगुणा. ती राजापुरची रहाणारी असून ती बालपणींच झालेली विधवा होती. या वेळीं तिचें वय सुमारें बावीसएक वर्षांचें होतें. तिचा प्रतिपाळ करील असें तिचे घरीं, माहेरीं किंवा आजोळीं कोणी मनुष्य नव्हतें. तेव्हां नवरा वारल्यापासून, ती तेथील एका ब्राह्मणाचे घरींच काम करण्यास राहिली होती. त्या ब्राह्मणाची स्त्री मोठी कर्कशा बायको होती. ती तिला फार वाईट रीतीनें वागवीत असे, आणि समयीं मारझोड देखील करी. शेवटीं सगुणा या तिचे त्रासानें अगदीं कंटाळून गेली, आणि पोट भरण्याचे आशेनें कांहीं बायांबरोबर मुंबईस निघून आली. ज्या परोपकारी गृहस्थानें आनंदरावास आपल्या संगें नेऊन पहिल्यानें आश्रय दिला होता, त्याच गृहस्थाचे येथें एक बाई कामकाजास होती, तिचे ओळखीनें सगुणा आनंदरावाचे येथें आली. तेव्हां आनंदीबाईनें तिची सर्व विचारपुस करून तिला आपले येथें ठेवून घेतलें. पहिल्यानें तीन चार दिवस आनंदीबाईनें तिला कांहीं एक काम करूं दिलें नाहीं; मात्र इतकेंच सांगितलें कीं, "घरांतील कोणकोणतें सामान कोणकोणत्या ठिकाणीं ठेवलेलें आहे, हें तुम्हीं तीन चार

दिवस वारंवार पाहून चांगलें लक्षांत ठेवा, आणि जेव्हां तें सर्व सामान तुमचे डोळ्यांसमोर ठेविलेलें आहे असें वाटूं लागेल, तेव्हां मी लागेल ती वस्तु तुह्मांला आणावयास सांगेन, ह्मणजे मग ती तुह्मी पटदिशीं आणून मला दिली पाहिजे; आणि त्याचें काम आटोपल्यावर ती पुन्हा जागचे जागीं नेऊन ठेवली पाहिजे. असें तिला चांग ल्याप्रकारें समजाऊन सांगितलें.

सगुणा ही मूळचीच मोठी चतुर व शाहाणी बायको होती. तिनें आपले धनीनीचे सांगण्याप्रमाणें, कोणकोणत्या वस्तु कोणकोणत्या जागीं ठेविल्या आहेत, हें दोन तीन दिवसांचे अवकाशांत पुनः पुनः पाहून चांगल्या प्रकारें लक्षांत ठेवलें, आणि आनंदीबाईनें कोणतीही एकादी वस्तु मागितली तरी, ती तिनें लागलीच आणून द्यावी; व काम आटोपलें कीं पुन्हा ती जागचे जागीं नेऊन ठेवावी. सर्व वस्तु, जागचेजागीं ठेवण्यास सगुणा आतां चांगल्या प्रकारें शिकली, असें पाहून, आनंदीबाई घरखटल्यासंबंधी इतर कामें एकामागून एक तिला दाखवून देऊं लागली. आणि तीं कामें ती करीत असतां तिचे हातून एकादी चूक झाली, तर त्यासाठीं तिला रागें न भरतां, असें नव्हे असें, ह्मणून तिला तिनें नीट समजावून सांगावें, व पुन्हा अशी चूक न होण्याविषयीं सावध रहा, असें गोड शब्दांनीं ह्मणावें. याप्रमाणें नुस्ते गोड गोड शब्द बोलूनच आनंदीबाई तिला प्रेमानें वागवीत नव्हती; तर,

जे जे पदार्थ ती आपण खात असे, त्यांतून एकही पदार्थ तिनें तिला दिल्याशिवाय राहूं नये. या सर्व कारणांवरून सगुणा आनंदीबाईचे अर्ध्या वचनांत वागूं लागली. आणि आपले धनिनीला जेणेंकरून वाईट वाटेल अशी एक देखील गोष्ट ती करीत नसे. ज्यांच्या ज्यांच्याशीं तिची गांठ पडे, त्यांच्या त्यांच्या जवळ आपल्या धनिनीची ती अतिशय वाखाणणी करीत असे. आनंदीबाईवर सगुणेची ही इतकी प्रीति जडायाला आणखी एक निराळेंच कारण होतें. सगुणा राजापुरास त्या ब्राह्मणाचे घरीं असतां तिला "सग्डू किंवा सगु" अशी कोंडून हाक मारण्याचा परिपाठ होता; परंतु आनंदीबाईचे येथें ती आल्या दिवसापासून, आनंदीबाई तिला "सगुणाबाई, अहो सगुणाबाई," अशी मोठ्या आवडीनें व बहुमानानें हाक मारीत असे. तें ऐकून सगुणा मनामध्यें अगदीं आनंदभरित होऊन जात असे. या एका गोष्टीवरून सगुणीनें आनंदीबाईला मोठ्या सज्जन बायकांमध्यें अग्रगण्य अशी निवडून काढली होती. आणि हें तिचें अनुमान कांहीं खोटें नव्हतें. गोड शब्दांनीं जें काम होतें, तें मोठ्या देणग्यांनीं होत नाहीं. ही गोष्ट पुष्कळांस माहीत असते; परंतु, त्याप्रमाणें वागणें फार थोड्यांकडून होतें.

आनंदीबाई जेव्हां सैंपाकांत गुंतलेली असे, तेव्हां सगुणीनें तिचे शेजारीं बसावें, आणि आपल्या संकटाच्या गोष्टी, आपणांवर गुदरलेले प्रसंग, व गांवच्या लोकांच्या हकीकती, हीं इत्थंभूत सांगावीं. सगुणे-

ला आपल्या दुःखाच्या गोष्टीच अधिक सांगाव्याशा वाटत. आनंदीबाईनें, त्या तिच्या संकटाच्या गोष्टी ऐकून फार कष्टी व्हावें, आणि तिनें तिचें मोठ्या प्रेमानें सांत्वन करावें. एके दिवशीं आनंदीबाई सैंपाक करीत असतां, तिचे शेजारीं सगुणा ही बराच वेळ पर्यंत मुकाट्यानें येऊन बसली. तेव्हां ही कांहीं तरी बोलण्याचे विचारांत आहे, पण तिला तें सांगण्याचें धैर्य होत नाहीं, असें तिचे मुद्रेवरून आनंदीबाईनें तेव्हांच ताडलें, आणि ह्मटलें, "सगुणाबाई, आज तुह्मी अशा उगा कां राहिलां हो ! कांहीं नाजूक गोष्ट मनांतून सांगायाची आहे काय ? "

सगुणा—बाई, नाजूक गोष्ट कांहीं नाहीं, पण आज कित्येक दिवस आपणांला विचारीन ह्मणतें कीं, आपण मला बाजारांतली शाकभाजी आणायाला कां बरें पाठवीत नाहीं ? मला मालाची चांगली पारख आहे, तेव्हां पाठविलें तर मी कांहीं नासका कुजका माल आणणार नाहीं.

आनंदी०—माल कुजका घेऊन याल, अशा अर्थानें मी तुह्मांस बाजारांत पाठवीत नाहीं, असें नव्हे; पण हा घरांतला कामाचा पसारा आटोपतां आटोपतां तुह्मांला नको नकोसें होतें, तेव्हां तुह्मांला बाजारांत जायाला तें कोणत्या वेळीं फावेल ! आणि सगुणाबाई, दुसरी गोष्ट ही कीं, तुमच्यासारख्या तरुण मुलीला, जेथें चार प्रकारचे लोक येणार, अशा बाजारासारख्या ठिकाणीं एकटें पाठवायला ह्मणजे अम्मळ विचाराचेंच काम आहे.

**सगुणा**—वैनी, एकटें कशाला जायाला हवें? शेजारच्या आपल्या सखूबाई दररोज नाहीं का जात? त्यांच्याबरोबर गेलें ह्मणजे झालें.

**आनंदी०**—ह्या आपल्या सदाशिवरावांच्या येथल्या सखूबाई होय? पण त्यांनीं तुह्मांस बाजारांतील पैसे काढून ठेवायची हिकमत नाहीं ना शिकविली!! छेः सगुणाबाई, तुमच्या हातून अशी गोष्ट होणार नाहीं; हें मी पक्कें समजतें, पण सांगायचें इतकेंच कीं, त्या सखूबाईचे नादाला तुह्मीं फारशा लागूं नका. ती कांहीं भली बायको नव्हे. चोरी करणें हें महापाप आहे. आपणांस जें वेतन मिळतें, त्यांतच मनुष्यानें संतोष मानावा; आणि साधल्यास चांगल्या मार्गानें पैसा मिळविण्याचा यत्न करावा; पण ती बायको तशी नव्हे. आणि सगुणाबाई तुह्मांसारख्यांला जें वेतन मिळतें, तें तरी खरें पाहिलें असतां काय करायाचें आहे! जीवांत जीव आहे तोंपर्यंत वाईट बरें पोटभर अन्न, व नेसायाला लहान मोठें वस्त्र मिळालें ह्मणजे पुरे आहे. तुह्मांला कोणी मागें ना पुढें, तेव्हां पैसा सांचवून ठेवणार तो कोणाला?

हें ऐकून सगुणाबाई निरुत्तर झाली. तिचे डोळे पाण्यानें भरून आले, आणि ती ह्मणूं लागली, "वैनीबाई, माझे हातून अपराध झाला. मी त्या सखूच्या नादीं लागून तिच्या भलभलत्या गोष्टी ऐकल्या. माझी एवढी चूक माफ करून मला क्षमा करा. मी पुन्हा तिचे संगतीस लागणार नाहीं."

**आनंदी०**—अहो सगुणाबाई, मी तुह्मांस ज्या

दोन गोष्टी सांगितल्या, त्या तुह्मांस रागानें बोललें असें मनांत आणूं नका. पण तिनें तुह्मांस आपल्या बरोबर बाजारांत येऊन त्यांतून पैसे कसे काढून घ्या-वेत अशाविषयीं कान फुंकले आहेत, असें माझे ऐक-ण्यांत आलें, आणि ह्मणूनच मी आपणांस सावध केलें. अशा दुष्ट लोकांच्या गोष्टी ऐकून तुह्मीं कधींही वाईट मार्गास प्रवृत्त होऊं नये. मी मनांत असा विचार केला आहे कीं, तुह्मीं एकदां चांगला सैंपाक करायास ला-गलां ह्मणजे मग तुमचा पगार वाढवीन ह्मणतें.

सगुणा—वैनीबाई, मला सैंपाक करायास तर पहिल्यापासून येतच आहे; आणि त्यांत चांगला करायास तो आणखी कसा शिकायचा?

आनंदी०—मी जे जे पदार्थ करतें, त्यांची रुचि फार नामी लागते, असें ह्मणून तुह्मी रोज जेवणाची वाखाणणी करीत असतां, आणि ह्मणतां कीं, हेच पदार्थ त्या ब्राह्मण गृहस्थाचे येथें करीत असत, पण त्यांची रुचि पाहिली तर ती कशीशीच लागत असे. ह्मणून ह्मणतें कीं, जोंपर्यंत सैंपाकाचें प्रमाण समजून त्याप्रमाणें हातोटी चांगली साधली नाहीं, तोंपर्यंत चांगला स्वयं-पाक कधींही करितां येणार नाहीं. आणि दुसरें असें कीं, जो प्रकार तुह्मीं कधीं रांधला नाहीं, तो समजून घेतल्याशिवाय व पाहिल्याशिवाय तुह्मांस कसा तयार करितां येईल?

असें जेव्हां आनंदीबाईनें ह्मटलें, तेव्हां आपणही सैंपा-काचे कामाची माहिती कशी ती चांगली करून घ्यावी,

असें सगुणेला वाटूं लागलें. आणि त्या दिवसापासून आनंदीबाईही तिला सैंपाकाची थोडथोडी माहिती करून देऊं लागली. कोणता एकादा पदार्थ शिजवायचा झाला, ह्मणजे त्यास कोणकोणते जिन्नस लागतात, व ते कोणकोणत्या प्रमाणानें घालावे लागतात, याचें टांचण आनंदीबाईनें माहेरीं असतां एका वहींत लिहून ठेविलें होतें, आणि घरीं आल्यावरही एकादें नवीन पक्वान्न तिनें कधीं शिजविलें ह्मणजे, तेंही त्याच वहींत तिनें टांचून ठेवावें. आनंदीबाई सगुणेला ह्मणाली, "सगुणाबाई, जर तुह्मी थोडेंसें लिहिण्यावाचण्यास शिकाल, तर कोण कोणतीं पक्वान्नें कसकशीं करावीं, हें तुह्मांस फार त्वकर आणि चांगल्या प्रकारें शिकतां येईल." तेव्हां सगुणा त्याप्रमाणें शिकण्यास तयार झाली. सैंपाकाचेवेळीं कोणतेंही पक्वान्न करायाचें झालें ह्मणजे त्यास लागणारें सर्व साहित्य आनंदीबाईनें सगुणेपाशीं द्यावें, आणि सैंपाकाचा सर्व भार तिजवर सोंपून आपण दुसऱ्या कोणत्या तरी कामाला लागावें. इकडे तीन चार महिन्यांचे अवकाशांत सगुणीनें लिहिणें वाचणें शिकण्याकडे फार मेहनत घेतली, व आनंदीबाईनें सुवाच्य अक्षरांनीं लिहून ठेविलेलें पक्वान्नांचें टांचण तिला चांगलें वाचतां येऊं लागलें. तेव्हां आनंदीबाईनें आपली ती लिहून ठेवलेली वही तिचे स्वाधीन केली, आणि त्यांतून दररोज एक एक प्रकार तिनें तिला तयार करण्यासाठीं नेमून द्यावा, आणि तो कसकसा करावा हें आणखी तोंडीं समजाऊन सांगावें.

याप्रमाणें हळू हळू कांहीं दिवसांनीं सगुणा पक्वान्नें करण्याचे कामामध्यें मोठी सुगरीण बायको होऊन गेली.

मुंबई शहरामध्यें धोबी लोक कापडें लवकर धुऊन आणीत नाहींत, ही एक मोठीच गैरसोय आहे. आणि ह्मणून पुष्कळांना तेंच तें वस्त्र पुन्हापुन्हा जेमतेम घरीं धुऊन वापरावें लागतें. अंगावरील वस्त्रें, व बिछान्यावरील चादर, हीं स्वच्छ राखण्याची तर आनंदीबाईला जन्मापासूनची सवय होती, परंतु धोब्याचे या गैरसोईमुळें व निष्काळजीपणामुळें, आपली जन्मापासूनची सवय देखील थोडथोडी मोडून टाकावी लागणार आहे, असें जेव्हां आनंदीबाईला दिसून आलें, तेव्हां लहान लहान कापडें घरींच धुवून स्वच्छ करण्याचा तिनें निश्चय केला, आणि सगुणाही या गोष्टींविषयीं तिला साह्य करूं लागली. याप्रमाणें आठवड्यांतून दोन वेळां आनंदीबाई कापडें धुण्याचा कारखाना मांडीत असे. शिवाय आंघोळीचे वेळीं भिजविलेलीं कापडें हीं तर नेहमीं धुवावयाचीं असतच. आठवड्यांतून दोन वेळां जीं कापडें ती धुत असे, तीं अगदीं धोब्याप्रमाणें तिनें धुवावीं; ह्मणजे, पहिल्यानें खाराचे पाण्यांत उकळून काढावीं, नंतर त्यास साबू चोळून स्वच्छ पाण्यानें तीं धुवावीं, आणि मग त्यांस खळ देऊन तीं उन्हांत वाळवावीं, आणि वाळलीं ह्मणजे पुन्हा त्यांवर पाणी शिंपडून तीं थोडींशीं ओलसर करावीं, आणि मग त्याचेकरितां मुद्दाम विकत घेतलेल्या इस्तरींत विस्तव भरून ती त्यांजवर फिरवावी. ही नवीन सोय तिनें केल्या दिवसापासून तिचे घरीं

एक देखील वस्त्र फार दिवस मळून पडलेलें रहात नसे.

अंगावरील व बिछान्यावरील वगैरे कापडें स्वच्छ ठेवण्याची आनंदरावालाही पराकाष्ठेची आवड होती. परंतु विचारा करितो काय? धोब्याचे गैरसोईमुळें निरुपाय होऊन तो केव्हां केव्हां अगदीं त्रासून जाई. परंतु लग्न झाल्यानंतर त्याला त्या गोष्टीची काळजी कशी ती मुळींच बाळगावीं लागली नाहीं. कारण आनंदीबाईनें कापडें स्वच्छ ठेवण्याविषयींची जी नवीन युक्ति काढिली होती, तें पाहून आनंदरावाला एक विलक्षण प्रकारचा आनंद वाटूं लागला. घराची निर्मळता व रमणीयता पाहून त्याचें मन सर्वदा प्रफुल्लित रहात असे, आणि विशेषेंकरून जेव्हां तो कचेरींतून थकून भागून येत असे, तेव्हां तर घरांत पाऊल ठेवलें कीं, त्यास आपण एकाद्या पवित्र व शांत अशा महर्षीच्या आश्रमांत आलों कीं काय असें वाटून त्याचा अंतरात्मा संतुष्ट व्हावा.

आनंदीबाईचे येथें, घर शृंगारण्याकरितां, तसेंच कांहीं अपूर्व व सुंदर सामानसुमान होतें, असें नाहीं. तर साधारण सामानसुमान जें तिचे येथें होतें, त्याची मांडणी तिनें अशा चातुर्यानें करून घराला शोभा आणली होती कीं, तशी शोभा पुष्कळांचे येथें सुंदर सुंदर सामानसुमान असूनही त्यांना आणतां आली नसती. आनंदीबाईचे अंगीं दुसरा एक मोठा गुण होता. तो हा कीं, अगदीं यत्किंचित् अशा वस्तूंनीं देखील घराला सौंदर्य कसें आणावें, हें तिला

चांगल्या प्रकारें कळत होतें. अनेक जातींच्या चित्रविचित्र रंगाच्या पक्ष्यांचे पंख गोळा करून त्याची तिनें एक सुंदर चवरी गुंफावी. तसेंच कागदाच्या शोभायमान फुलझाडांच्या कुंड्या करून त्या दिवाणखान्यामध्यें शोभतील अशा ठिकाणीं जागजागीं ठेवाव्या. याप्रमाणें क्षुल्लक क्षुल्लक अशा नानाप्रकारच्या वस्तूंनीं देखील ती घराला अवर्णनीय शोभा आणीत असे. कोणतेंही सामान घ्यावयाचें झालें ह्मणजे तें सुंदर व मजबूद पाहून घ्यावयाचें, असा आनंदराव व आनंदीबाई यांचा नेम असे; आणि त्यांच्या घराला जें इतकें सौंदर्य आलें होतें, त्याचें कारण मुख्य तेंच होतें. सारांश, त्यांच्या येथें सामानसुमान कांहीं पुष्कळ नव्हतें, परंतु जें होतें तें उत्तमापैकींच होतें. उत्कृष्ट सामान असलें ह्मणजे त्याचे अंगीं सौंदर्य आणण्याची शक्ति अधिक असते, हें त्यांना चांगल्याप्रकारें कळत होतें.

आतां शेवटीं एक गोष्ट सांगून हें आनंदीबाईचें घरखटल्या संबंधी प्रकरण पुरें करूं. शाखभाजी आदिकरून नासणाऱ्या वस्तु खेरीज करून धान्य वगैरे ज्या खायाच्या जिनसा लागत असत, त्या रोजचे रोज बाजारांत जाऊन थोडथोड्या तीं आणीत नसत, तर आनंदराव हा प्रत्येक महिन्याचे शेवटल्या रविवारीं बाजारांत जाऊन पुढील महिन्यास पुरेल अशी सर्व कांहीं सामग्री एकदम खरीद करून आणीत असे. आणि मग आनंदीबाई व सगुणी यांनीं मिळून ती नेटनेटकी करून, त्याच्या त्याच्या भांड्यांत भरून, जागचेजागीं

नेऊन ठेवावी. कोठलेही जिन्नस एकदम खरीद केल्यापासून ते थोडेसे स्वस्त पडून, त्यांजकरितां वारं-वार आपल्याला वेळ मोडावा लागत नाहीं, हा एक मोठा फायदा आहे. ह्मणून आनंदराव हा एक दिवस खपून व चार दुकानें हिंडून, सर्व कांहीं माल चोख पाहून आणीत असे. नाहीं तर, आज काय तेल नाहीं, जा बाजारांत; आज काय साखर संपली, जा दुकानीं; आज अमकें नाहीं, उद्यां तमकें नाहीं; असें ह्मणून वारंवार बाजा-रांत खेपा घालून बराच वेळ फुकट घालावा लागतो.

## प्रकरण बारावें.

—o—

### सुशीलतेचें फल.

आरबथनाट कंपनींत चाकरीस राहिल्यास आनं-दरावाला आज सात वर्षें होत आलीं. दरमहा पन्नास रु-पये पगाराला भुलून आनंदराव जो एकदां तेथें गेला, ते त्याचे आज इतकीं वर्षें झालीं तरी पन्नासाचे पन्ना-सच राहिले. त्याची तेथें बढती न झाल्यामुळें त्याला वाईट तर वाटे खरें, पण त्यांतूनही त्याच्या कचेरींती-ल अगदीं अजागळ अशीं माणसें भराभर वाढून जर त्याचे पुढें गेलीं नसतीं, तर पगार न वाढल्याचें त्याला

इतकें दुःख वाटलें नसतें. कचेरींतील जो वरिष्ठ कारकून होता तो, आपल्या नात्यागोताच्या लोकांपैकीं अगदीं ढ देखील आणून कचेरींत भरूं लागला, आणि त्यांना एक दोन वर्षं झालीं न झालीं तोंच हळू हळू त्यांचा पगारही तो वाढवूं लागला. या वरिष्ठ कारकुनाचा एक मुलगा आणि एक मेहुणा असे दोघे आनंदरावाचे हाताखालीं काम करीत होते; पण हळू हळू ह्मणतां ह्मणतां थोडे दिवसांचे आंतच ते आनंदरावाचे वरती येऊन बसले. परंतु त्यांना आपलें काम कसें करावें, हें सुद्धां कळत नव्हतें; यामुळें त्यांचें राहिलें साहिलेलें काम देखील नि- रुपायामुळें आनंदरावालाच पुरें करावें लागत असे. हें पाहून आनंदरावानें मनामध्यें फार दुःखी व्हावें. आणि हा असल्या प्रकारचा अन्याय पाहून त्यानें अनेक वेळां ती कचेरी सोडून जाण्याचा निश्चयही पण केला; परंतु दुसरीकडे कोठें तरी तजवीज करायचे अगोदर ती सोडली असतां कदाचित् फजीती होऊन जायाची, या भीतीनें ती एकदम सोडून देण्यास त्याची छाती होईना.

आनंदरावानें पुनर्विवाह केल्यामुळें तो बाटला आहे, अशा समजुतीनें त्या वरिष्ठ कारकुनाची त्याजवर गैर- मर्जी होती. त्याच्यानें त्याला उघडपणें तर कांहीं ह्म- णवेना; कां कीं त्याला आनंदरावाचे कामामध्यें चूक कशी ती कधीं आढळून आलीच नाहीं. पण आं- तून त्यांनीं मोठा कावेबाजपणा करून त्याला असा त्रास द्यावा कीं, त्यानें आपण होऊनच कचेरी सोडून

जाईसें करावें. वर सांगितल्याप्रमाणें वरिष्ठ कारकुनाच्या ज्या नातलगांचें काम हा करून देत असे, ते एकमेकांची थट्टामस्करी करूं लागले ह्मणजे त्यांनीं अपरोक्ष रीतीनें याला लागे असें कांहीं तरी उद्देशून ह्मणावें. लग्न केल्यावर आनंदरावावर कचेरींतील कामाचा रगडा इतका पडूं लागला कीं, त्याला तें कांहीं केल्या कचेरींतील वेळांत आटोपतां ह्मणून येईना. ह्मणून त्यानें तें घरीं आणावें, व मध्यान रात्रपर्यंत जागत बसून पुरें करावें. जर आनंदरावानें लग्न केलें नसतें, आणि कचेरींतील लोकांचें याप्रमाणें त्याच्याशीं वर्तन असतें, तर आनंदराव अशा चाकरीला सोडचिठी देऊन तो कधींच चालता झाला असता. आनंदराव कचेरींतील कामासाठीं याप्रमाणें दर दिवस एकसारखा जागत असतो, असें पाहून आनंदीबाई एके दिवशीं त्याला ह्मणाली;—"जर आपल्या कामांत मजकडून कांहीं मदत होण्यासारखी असली, तर ती मला सांगा; ह्मणजे मग इतके रात्रपर्यंत आपल्यास जागावें तरी लागणार नाहीं."

आनंद०-तुमचें सुंदर हस्ताक्षर माझ्या पुष्कळ कामाला उपयोगी पडेल असें आहे, परंतु या शोचनीय गुलामगिरींत तुह्मांला वांटेकरी करण्याविषयीं माझें मन घेत नाहीं. मला वाटतें कीं, गुलामगिरीची ही रुपेरी बेडी या घटकेस अगदीं तोडून टाकावी. या अशा परतंत्रतेच्या त्रासांत रहाण्यापेक्षां कोणी एक वेळ ओली कोरडी भाकर खाऊन रहाण्यास सांगेल, तर तें मला मोठ्या आनंदानें पत्करेल!

आनंदीः--प्रियकरा, असें काय ह्मणतां? मी आपली अर्धांगिनी ना ? जर माझें अक्षर आपल्या उपयोगीं पडण्यासारखें आहे, तर मला ल्याहावयास सांगण्यास हरकत ती कोणती ? आतां आपण चाकरी सोडणार ह्मणतां, तर ती निराळी गोष्ट आहे, पण सध्यां आपलें जें सुख दुःख, तेंच माझें सुखदुःख ना ! ! जर आपणास या चाकरीचा कंटाळा आला आहे, तर एकदांची द्या परती सोडून. महिन्याचे कांठीं नाहीं तरी आपल्यास तीस पसतीस रूपये निवळ व्याजाचे येत असतात ; त्यांत आपला हा लहानसा संसार काटकसरीनें चालविल्यास नाहीं का चालणार ? तेव्हां संसार कसा चालेल याची काळजी एव्हांशीं कशाला करायला हवी ! आणि त्यांतूनही आह्मीं उभयतांनीं खटपट केल्यास दुसऱ्या कोणत्या तरी उपयांनीं चार पैसे आह्मांस नाहीं का मिळवितां येणार ! ! तेव्हां आणखी थोडे दिवस हपिसांत कसें काय चालतें तें पहा, नाहीं तर बेलाशक चाकरी सोडा, असें आपणांस माझें सांगणें आहे. शत्रूंच्या चेष्टा कधींही तडीस जाऊं देतां कामा नये. असल्या चेष्टांनीं आपली डाळ कांहीं शिजत नाहीं, असें जेव्हां त्यांना पक्कें वाटूं लागेल, तेव्हां मग आपण होऊन चाकरी सोडावी, आधीं सोडूं नये. ह्मणून तेथपर्यंत आपल्यास कांहीं मदत मजकडून होण्यासारखी असल्यास ती मला सांगा. नाहीं ह्मणूं नका.

असें ह्मणून आनंदीबाई आनंदरावाचे शेजारीं ल्याहावयास बसली. आनंदीबाईचें हस्ताक्षर आनंदरावा-

च्या हस्ताक्षरापेक्षां किंचित् चांगलेंच होतें. आणि आनंदरावाचे कचेरींतील तें काम चार चौघांचे समोर जावयाचें, असें समजून ती तें विशेष काळजीनें लिही. यामुळें तर तें विशेष चांगलें दिसे; आणि तें पाहून आनंदरावाला पराकाष्ठेचा आनंद होई. असो. याप्रमाणें तिनें लागोपाठ चार दिवस लिहून आनंदरावाचें शिलक राहिलेलें सर्व कांहीं काम संपविलें. एवढ्यामध्यें दैवयोगानें आनंदरावाचें भाग्य उदयास आलें. तें असें, एके दिवशीं कचेरींतील वरिष्ठ साहेब, मिस्तर आरबथनाट हे कांहीं हिशोब तपासीत असतां त्यांची दृष्टि त्यांतील स्त्री हस्ताक्षरावर गेली. तें पाहून ते मोठ्या संशयांत पडले. आणि तेथील वरिष्ठ कारकुनाला बोलावून त्या संबंधी चौकशी करूं लागले. वरिष्ठ, कारकून तें ऐकून फार भयभित झाला, आणि ह्मणालाः-" हें मी आनंदरावापाशीं ल्याहावयास दिलें होतें, पण त्यानें हें कोणाकडून लिहून आणलें, हें मात्र मला माहीत नाहीं. नंतर आर्बथनाट साहेबानें त्याला जावयास सांगून आनंदरावाला आपल्यापाशीं बोलाविलें. या वरिष्ठ साहेबांजवळ जाण्याचा प्रसंग आनंदरावाला आजपर्यंत कधीं आला नव्हता. आनंदरावानें त्याचे समूर जाऊन मोठ्या अदबीनें त्याला सलाम केला; नंतर, साहेबानें त्याला विचारलें:-" आनंदराव, हें अक्षर कोणाचें?" नंतर आनंदरावानें तें आपल्या पत्नीचें आहे असें सांगितलें. त्यावरून आनंदरावाशीं साहेबाचें त्या संबंधानें इकडलें तिकडलें बरेंच संभाषण

झालें. आनंदरावाला इंग्रजी भाषा ह्मणजे अगदीं मुठींतली होऊन गेली होती; त्यामुळें तो साहेबाशीं बराच वेळ पर्यंत अस्खलित एकसारखें बोलत होता. हें पाहून साहेबाला मोठें नवल वाटलें; आणि ते फार खुष झाले. आणि जेव्हां त्याची सगळी हकीकत ऐकली, तेव्हां तर त्याला त्याहूनही नवल वाटलें, व आपल्या हपिसांतील वरिष्ठ कारकून त्याच्याशीं किती अन्यायानें वागत आहे, हें सर्व कांहीं त्याला या प्रसंगीं कळून आलें. नंतर आनंदराव निघून जाण्याचे पूर्वी साहेबानें त्याला ह्मटलें:—"तुमच्या पत्नीला आमच्या मडम साहेबाचे भेटीला एक दिवस घेऊन या. तुमच्या बोलण्यावरून मला असें वाटतें कीं, आमच्या घरीं खायाला जेवायाला तुह्मांस कोणतीही हरकत नसावी." नंतर आनंदरावानें आपण जातिभेद मानीत नाहीं, त्याअर्थी कोणाचे येथें जेवायला हरकत नाहीं, असें ह्मणून साहेबाला सलाम करून तो आपले जागीं जाऊन बसला.

आनंदरावाबरोबर साहेबाच्या या गोष्टी बुधवारीं झाल्या; आणि शनिवारीं संध्याकाळीं आपल्याकडेस भोजनास यावें ह्मणून साहेबानें त्यास आमंत्रण पाठविलें. आर्बेथनाट साहेब, त्यांची पत्नी आणि त्यांच्या कन्या, आदिकरून साहेबांचे घरची मंडळी आनंदराव व आनंदीबाई यांच्याशीं भाषण करून फार संतुष्ट झाली. हिंदु लोकांत इतकी सुशिक्षित मुलगी असेल, हें आर्बेथनाटच्या कुटुंबांतील माणसांच्या स्वप्नीं सुद्धां आलें नव्हतें. सारांश, हिंदु लोकांत हें झांकलेलें स्त्रीरत्न पाहून त्यांना मोठाच

अचंबा वाटून ते तिची फारच वाखाणणी करूं लागले. नंतर उभयतांच्या जातींतील सामाजिक आचार विचार, या संबंधानें त्यांचें बराच वेळपर्यंत संभाषण चाललें. शेवटीं आनंदराव व आनंदीबाई जेव्हां साहेबांचे घरचे मंडळीचा निरोप घेऊन जाऊं लागलीं, त्यावेळीं आर्बथनाट साहेब आनंदीबाईस उद्देशून ह्मणाले:— " आपल्या पतीचे संबंधानें आज इतके दिवस माझे कचेरींत जो मोठा अन्याय चाललेला आहे, त्या अन्यायाची चौकशी करून मी लवकरच योग्य बंदोबस्त करीन."

आनंदराव व आनंदीबाई यांना आर्बथनाट साहेबांनीं शनिवारीं आपल्या घरीं आमंत्रण केलें आहे, हें सर्वांस माहीत झालें. आणि त्याबद्दल सोमवारचे दिवशीं त्याचे कचेरींत एकच गवगवा होऊन गेला. आनंदरावाचे अपरोक्ष, जे ते, एकमेकांचे कांनाशीं लागून कुजबूज करूं लागले. पण बाह्यात्कारीं त्याच्याशीं ते त्या दिवशीं फार अदबीनें वागूं लागले. फार काय, पण एवढा मोठा वरिष्ठ कारकून, ज्याचा सगळ्या कचेरीवर मोठा दरारा असे, आणि जो इतके दिवस आनंदरावाला कोणतेंही एकादें काम सांगायाचें झालें ह्मणजे मोठ्यानें दरडावून सांगे तो देखील यावेळीं अगदीं नम्र होऊन गेला, आणि मोठ्या गोडीगुलाबीनें आनंदरावाशीं वागूं लागला. असो. आनंदरावाला त्या नोकरीवर फार दिवस काढावे लागले नाहींत. आर्बथनाट कंपनीनें नवीनच दुसरा एक व्यापार चालू केला;

आणि आनंदरावाला तिकडेस घालून त्याला शंभर रुपये पगार केला; आणि त्या व्यापारांत चांगली किफायत झाली असतां याहूनही पगार वाढवूं असें आनंदरावाला अश्वासन दिलें.

---

## प्रकरण तेरावें.

---

### उभयतांचें परोपकारसाधन.

आनंदीबाई नवीन घरांत राहावयास आल्यावर, तिची शेजारपाजारची मंडळी तिला पहावयास आली. तेव्हां तिनें त्या सर्वांचें मोठ्या प्रेमानें आगतस्वागत केलें. लोभ आणि प्रेम केल्याचे योगें लोक जसे लुब्ध होऊन मोठे आनंदित होतात, तसे दुसऱ्या कशानेंही होत नाहींत. आनंदराव आणि आनंदीबाई यांचा आदर-सत्कार पाहून शेजारचे लोक फारच खूष झाले. आणि दर दिवस त्यांच्या बायकांपैकीं पुष्कळजणी आनंदीबाईचे भेटीस येऊं लागल्या. आनंदीबाईच्या घरांतील सामान सुमानाची व्यवस्था लागून सर्व प्रकारें थारवाथारव झाल्यावर, ती आपल्या शेजाऱ्यांच्या सुखदु:खाची व गृहसंबंधी स्थितीची चौकशी करूं लागली. आनंदराव कचेरींत गेल्यावर घरांतील सर्व कांहीं काम आटोपून तिनें शिवण काम घेऊन तें शिवावयास बसावें,

आणि शिवतांशिवतांच ज्या चारचौघी तिचे शेजारीं बसलेल्या असत, त्यांच्याशीं तिनें घर खटल्यासंबंधी स्थितीची अनेक प्रकारें विचारपुस करावी. त्या गोष्टीवरून तिला असें दिसून आलें कीं, त्या सर्व स्त्रियांना पुरसत पाहिजेल तितकी असते; त्यांचे नवरे किंवा घरांतील दुसरी पुरुष मंडळी, कोणी मोठ्या पहांटेस, कोणी आठ किंवा साडेआठ वाजतां, आपल्या कामांवर एकदां निघून गेली ह्मणजे, ती, संध्याकाळीं दिवेलावणीचा सुमार झाल्याशिवाय कांहीं परत येत नाहीं; आणि त्या बायकांना काम पाहिलें तर, सगळ्या दिवसांत सांजसकाळचे सैंपाकाशिवाय बहुधा कांहीं एक नसतें; तेव्हां ह्या आपला वेळ आळसांत किंवा दुसऱ्याच्या उखाळ्या पाखाळ्या काढून त्यांच्याशीं भांडणांत फुकट घालवीत असतात. असें जेव्हां चौकशीअंतीं तिला पक्कें समजून आलें, तेव्हां हा त्यांचा विपुळ वेळ चांगल्या कामीं कसा लावितां येईल, हा विचार आनंदीबाईचे मनांत साहजिकच घोळूं लागला. शेवटीं, तिनें त्यांना शिवणकाम शिकविण्याचें मनांत आणिलें, आणि हा विचार त्या सर्वांना कळविला. तेव्हां त्या सगळ्या जणींनीं मोठ्या आनंदानें त्या गोष्टीस रुकार दिला; आणि त्याप्रमाणें रोज आनंदीबाईचे येथें जाऊन त्या शिवणकाम शिकूं लागल्या. या गोष्टीला दोन तीन महिने लोटले नाहींत तोंच, त्यांतून पुष्कळ जणींचा हात शिवणकामावर चांगला बसून गेला. हें पाहून, याला कांहीं तरी नांव रूप देऊन एक कारखाना काढावा, असा आनंदीबाईचे मनांत विचार घोळूं लागला. आज इतके दिवस

त्या स्त्रिया जाडें भरडें शिवून जे कपडे तयार करीत, ते नळाचे बाजारांतील एक व्यापारी विकत घेऊन जात असे; आणि त्यापासून त्यांना थोडासा लाभही पण होई. त्या सर्व स्त्रियांचा शिवणकामावर आतां चांगल्या प्रकारें हात बसून गेला आहे, तेव्हां, ह्या शिवणकामाच्या कारखान्याला कांहीं तरी नांव देऊन, तो रंगरूपास आणला, तर, त्यापासून येथें येणाऱ्या स्त्रियांना पुष्कळ लाभ होईल, असें आनंदीबाईला वाटूं लागलें. आणि तिनें हा आपल्या मनांतील उद्देश त्या बायांना कळविला. तेव्हां, आनंदीबाई जें कांहीं करिते, तें, नेहमीं आपल्या फायद्याकरितांच करिते, अशी त्या सर्वांची पक्की खातरी झाली होती, ह्मणून त्यांनीं मोठ्या आनंदानें त्यास रुकार दिला. तेव्हां तिनें आपल्या स्वतःचे रुपयांतून १०० रुपये आनंदरावापाशीं देऊन, त्याला एक शिवण्याचें यंत्र आणायास सांगितलें, आणि त्या कारखान्याला "स्त्री-उद्योग-शाळा" असें नांव देऊन, त्या ठिकाणीं सर्व जातीचीं कापडें नियमित वेळीं आणि नेमस्त दरानें शिवून मिळतील, अशाविषयीं वर्तमानपत्रांतून एक लहानशी जाहिरातही पण दिली. पहिल्या पहिल्यानें कांहीं दिवस लोकांकडून त्यांना फारसें काम मिळालें नाहीं; पण ह्या ठिकाणीं शिवणकाम सुरेख, स्वस्त आणि नेमलेल्यावेळीं मिळत असतें, असें जेव्हां हळू हळू लोकांना कळून आलें, तेव्हां तर त्या कारखान्यांत कामाचा रगडा इतका पडूं लागला कीं, त्याचा हिशोब वगैरे

ठेवण्याकरितां तिला एक स्वतंत्र कारकूनच ठेवावा लागला. या उद्योगशाळेपासून जो कांहीं नफा होईल, त्याचा चौथा हिस्सा आनंदीबाईचा, आणि तीन हिस्से सर्वांचे, असें सर्वानुमतें ठरलें होतें; त्याप्रमाणें पहिल्या तीन महिन्यांचा हिशोब करून पहातां, कोणाला ह्मणजे प्रत्येक महिन्यास पांच रुपयांपेक्षां कमी मिळाले, असें आढळून आलें नाहीं. कामाचे मानानें कोणाला कमी, कोणाला जास्त, असा देण्याचा पूर्वीच ठराव झाला होता, तेव्हां कोणाला सात, कोणाला आठ, असेही दरमहा पडले होते. आणि आनंदीबाईला तर आपल्या हिशाचे दरमहा तीस तीस रुपये आले. त्या सर्व स्त्रियांचा घरचा खर्च त्यांच्या नवऱ्यांच्या मिळकतीवर कसा तरी चालत असतो, तेव्हां, हा शिवणकामावर मिळविलेला पैसा त्यांनीं उगाच न खरचितां त्याचा संग्रह करावा, अशाविषयीं त्या सर्व बायांची आनंदीबाईनें चांगल्या प्रकारें समजूत केली. आणि पोष्टाचे सेव्हिंग ब्यांकेमधून, त्या प्रत्येकीचे नांवें एक एक पुस्तक मागवून, त्यांत दरमहा त्यांच्या हिशास आलेला पैसा ती जमा करीत चालली.

आनंदराव सकाळीं कचेरींत जेवून जाई तो अगदीं संध्याकाळीं परत घरीं येई, तेव्हां मधल्या वेळांत किती बाया उद्योगशाळेंत येत असतात, आणि ती कितीशी भरभराटीस आलेली आहे, हें त्याचे पहाण्यांत येत नसे. आणि घरीं आल्यावरही त्याला कचेरींतील काम करावें लागत असल्यामुळें, उद्योगशाळेविषयीं विशेष शोध व

चौकशी करण्यास त्याला सवड हीपण नसे. आणि काम करण्यास येणाऱ्या झाडून साऱ्या बायांचे रुपये, त्यांचे त्यांचे नांवें ब्यांकेंत अनामत ठेविले आहेत, हें तर आनंदरावाला मुळींच माहीत नव्हतें. आनंदरावाच्या चाकरी सोडण्याच्या गोष्टी जेव्हां चालत होत्या, त्यावेळीं "आह्मी उभयतांनीं खटपट केल्यास, दुसऱ्या कोणत्या तरी उपायांनीं चार पैसे आह्मांस नाहीं का मिळवितां येणार?" असें जें आनंदीबाईनें ह्मटलें होतें, तें याच उद्योगशाळेच्या जोरावर ह्मटलें होतें. जेव्हां आनंदरावाचा पगार वाढला, आणि कचेरींतील कामाचा त्रास समूळ नाहींसा झाला, तेव्हां त्याचें मन अगदीं स्थिर होऊन गेलें, आणि आपल्या शेजारचे लोकांचें कल्याण कोणत्या उपायानें होईल, हा विचार त्याचे मनांत घोळूं लागला, व ही गोष्ट एके दिवशीं त्यानें आनंदीबाईपाशीं काढली. तेव्हां आनंदीबाई किंचित् हांसून ह्मणाली;— "प्रियकरा, आतां आपल्यापासून ही गोष्ट चोरून ठेवितां उपयोगाची नाहीं. आपण आपल्या मनांतील उदारत्वाची इच्छा ज्या अर्थीं मजपाशीं प्रगट केली आहे, त्याअर्थीं, आज इतक्या दिवसांच्या माझ्या खटपटीचें श्रेयही आपल्या कानावर घालणें, हें माझें कर्तव्यकर्म होतें; परंतु या माझ्या खटपटीला इतकें चांगलें यश येईल, याची मला खात्री नसल्यामुळें, आपणांस इतके दिवस मी तें कळविलें नाहीं. याबद्दल आपण मला क्षमा करावी. आतां जगदीश कृपेनें माझे या खटपटीचें फळ चांगलें झालें आहे, ह्मणून आतां तें

सांगण्यासही मला मोठा आनंद होत आहे." असें आनंदीबाईनें ह्मणून, सर्व कांहीं घडलेला प्रकार आनंदरावास सांगितला. तें ऐकून आनंदरावाचे डोळे आनंदाश्रूंनीं डबडबून आले. नंतर त्यानें कोणकोणाचे किती किती रुपये जमा झाले आहेत, हें प्रत्येकीचें ब्यांकबूक उघडून पाहिलें; आणि आनंदीबाईला हांसून ह्मटलें, "आनंदी! तुह्मीं तर घरांत मोठी प्रचंड **सेव्हिंग ब्यांकच** स्थापन केलेली आहे, हें मला इतके दिवस माहीत नव्हतें. मला तर आतां असें वाटूं लागलें आहे कीं, दुसऱ्यांचे गुलामगिरींत रहाण्यापेक्षां, या आपल्या ब्यांकेचीच सेवाचाकरी पत्करावी." आनंदरावाचे मनामध्यें या वेळेस ज्या आनंदलहरी उसळत होत्या, त्यांचें वर्णन कोण करूं शकेल!! त्याचे मनांत असा विचार आला कीं, जर सर्व कुलीन स्त्रिया आपल्या वेळेचा असा चांगला उपयोग करितील, तर संसारांतील दुःख व दरिद्र, ह्या आपदा अगदीं नाहींतशा होतील. " गृहिणी गृहमुच्यते " ह्मणजे स्त्री हेंच एक घर, असें जें पुरातन ग्रंथांतून ह्मटलें आहे, तें कांहीं खोटें नव्हे. परंतु दुःखाची गोष्ट ही कीं, या एक वेळ घरांत पडल्या ह्मणजे, तेथें आपल्याला कसें वागलें पाहिजे, व आपलें कर्तव्य काय, इत्यादि गोष्टी सर्व विसरून जात असतात. या प्रमाणें जर स्त्री व पुरुष हीं उभयतां स्वकष्टानें मिळवूं लागलीं तर, जीं कुटुंबें हल्लीं अगदीं गरीब दिसताहेत, तीं थोड्याच दिवसांत सुखी होतील; आणि जीं कुटुंबें

खाऊन पिऊन साधारण सुखी आहेत, त्यांच्यामध्यें थोड्या दिवसांत लक्ष्मीही नांदूं लागेल; असें आनंदरावाला या प्रसंगीं वाटूं लागलें. आनंदराव, आनंदीबाईचे सद्सद्विचाराची प्रशंसा करून ह्मणाला;—"प्रिये आनंदी, तुह्मीं तर आपला रामबाण उपाय योजून आपल्या स्त्रीवर्गाचें कल्याण करीत आहां, परंतु मी आपल्या शेजारी पुरुषवर्गाला कोणत्या उपायांनीं ताळ्यावर आणावें, याबद्दल एखादी युक्ति तुह्मांस सुचत असल्यास, ती मला सांगा."

मुंबईत शनवारची रात्र ह्मटली ह्मणजे ती अति भयानक. असें वाटतें कीं, ती रात्र पिशाचमूर्तीनें भारून अगदीं खग्रास करून टाकली आहे. जिकडे जिकडे ह्मणून जावें, तिकडे तिकडे सर्व पिशाच व्यापार चाललेले दृष्टीस पडतात. आणि आनंदरावाचे शेजारचे लोक हलक्या प्रतीचे असल्यामुळें, त्यांच्यामध्यें तर, ह्या भूतचेष्टा विशेष दिसून येत होत्या. तेव्हां या शनवारचे रात्रीं घडणाऱ्या वाईट गोष्टींपासून वळवून, यांना सुमार्गास लावण्यास काय युक्ति करावी, अशाविषयीं तीं उभयतां विचार करूं लागलीं. शेवटीं, त्यांनीं कीर्तनाचे रूपानें दर शनिवारीं त्यांना बोध करण्याचें मनांत आणलें. आणि हें मनांत आणल्यावर, पहिल्याच शनिवारीं आनंदरावानें सर्व शेजाऱ्यांना आपल्या घरीं हरिकीर्तनास यावें, ह्मणून आमंत्रण दिलें. तेव्हां सर्वांनीं तें आमंत्रण मोठ्या खुशीनें स्वीकारलें. आणि शनिवारचे रात्रीं एकूणएक मंडळी त्याचे घरीं जमा झाली. आनंदरावानें कीर्तनाचा थाट

उत्तम प्रकारें केला होता. त्याचे स्नेह्यांपैकीं जे गाणारे होते, त्यांना आपल्या पाठीमागें उभें राहून गाण्याची मदत करण्यास बोलाविलें होतें. नेमलेल्या वेळीं सर्व मंडळी जमली तेव्हां, आनंदीबाईनें हार्मोनियम बाजा वाजवून त्याच्या सुरावर ईश्वरस्तुतिपर कांहीं पद्यें मंजुळ स्वरावर ह्मटलीं. तीं ऐकून, सर्व मंडळी अगदीं तल्लीन होऊन माना तुकवूं लागली. नंतर आनंदरावानें,

हेचि थोर भक्ति आवडती देवा। संकल्पावी माया संसाराची १
ठेविलें अनंतें तैसेंचि राहावें। चित्तीं असों द्यावें समाधान ॥२॥
वाहिल्या उद्वेग दुःखची केवळ। भोगणें तें फळ संचिताचें ॥३॥
तुका ह्मणे घालूं तयावरी भार। वाहूं हा संसार देवापायीं ॥४॥

या अभंगावर कीर्तनास आरंभ केला. आणि त्याचे पुष्टीकरणार्थ इकडल्या तिकडल्या पौराणिक गोष्टींचे दृष्टांत देऊन, मंडळीचे मनांत तो अभंग चांगल्या प्रकारें ठसवून दिला. मंडळीही तो उपदेश ऐकून फार आनंद पावली. याप्रमाणें कीर्तन आटपायाला बारा वाजले. नंतर आलेल्या मंडळीला काफीचा एक एक प्याला देऊन, त्यांचा निरोप घेतला. मंडळी निघून जातेवेळीं आनंदराव त्यांना ह्मणाले;—"जर आपणां सर्वांस हा माझा कीर्तनाचा प्रकार आवडला आहे, तर, येत्या शनिवारीं देखील आपली मर्जी असेल तर, कीर्तन करण्याचा माझा विचार आहे."

याप्रमाणें, आनंदरावानें मंडळीचा विचार घेऊन लागोपाठ चार शनिवार कीर्तन केल्यानंतर, शेजारच्या कित्येक बाया आनंदीबाईपाशीं येऊन ह्मणाल्या कीं;—"बाई,

आमच्या घरची पुरुष मंडळी चांगल्या मार्गास लागावी, ह्मणून तात्या रात्रंदिवस झटताहेत, आणि आपला पैसा देखील पाण्यासारखा खरचताहेत; हें आह्मांला बरें दिसत नाहीं. आह्मीं जें कांहीं मिळवितों, तें केवळ आपल्या आशीर्वादानें होय, आणि असें जर आहे, तर त्यावर आमची सत्ता मुळींच नाहीं, ह्मणून त्यांतून या खर्चाकरितां आपण थोडथोडे पैसे घेत जावे, असें आपणांस विनयपूर्वक आमचें सांगणें आहे; तेवढें मान्य करा. ना ह्मणूं नका." आनंदीबाई या प्रकारें त्यांचें सरळ अंतःकरण पाहून, मनामध्यें फार हर्षित झाली, आणि त्यांचे सूचनेस तिनें आपलें अनुमोदन दिलें. नंतर तिनें, या आणि अशाच दुसऱ्या खर्चाकरितां ह्मणून, त्या सर्वांवर थोडथोडी मासिक वर्गणी बसविली, आणि त्यांत आपला व आपल्या पतीच्या हिशाचा बराच मोठा अंश घालून, ती एक निराळीच रकम जमवून सांठवूं लागली. याप्रकारें वर सांगितल्याप्रमाणें, दर शनिवारीं आनंदरावाचे घरीं कीर्तन होऊं लागलें. आनंदीबाई शेजारच्या बायांतून कित्येकींना गाणें शिकवीत असे, तेव्हां कांहीं दिवसांनीं कीर्तन समयीं त्याही आनंदीबाईला गाण्यामध्यें मदत करूं लागल्या. असे तीन चार महिने लोटल्यावर, शेजारचे मंडळीचें मन वाईट गोष्टींपासून आतां बरेंच वळलें आहे, हें जेव्हां आनंदरावानें पाहिलें, तेव्हां त्यांना लिहिण्या वाचण्याची गोडी लावावी, असें त्याला वाटूं लागलें. आणि त्यासाठीं एका शिक्षकाची योजना करून, रात्रीचा एक

वर्ग चालू करण्याचें मनांत आणलें, व त्यांच्या कानावर ही गोष्ट घातली. आनंदराव व आनंदीबाई यांची परोपकार-बुद्धि व सद्गुण पाहून, शेजाऱ्यांची श्रद्धा त्या उभयतांवर इतकी बसून गेली होती कीं; तीं जें सांगतील तें वेद-वाक्य समजून, त्याप्रमाणें वागण्यास त्यांनीं एका पायावर तयार व्हावें. तेव्हां या गोष्टीसही ते सहजच कबूल झाले. या ठिकाणीं विशेषेंकरून पहिल्यानें हें सांगितलें पाहिजे होतें कीं, आनंदरावानें पुरुष मंडळीस शिकवि-ण्यास आरंभ करण्यापूर्वीच, आनंदीबाई, ही शेजारच्या दोघां तिघां बायांस फावल्यावेळीं लिहिणें वाचणें शिकवूं लागली होती. आणि आनंदरावानें, हें जें लोकांना शिकविण्याचें मनांत आणलें, तें तरी, आनंदी-बाईचे सूचनेवरूनच होतें. असो. या प्रमाणें आनंदराव व आनंदीबाई यांच्या प्रयत्नानें अगदीं कनिष्ट प्रतीच्या माणसांतही विद्येची अभिरुचि उत्पन्न झाली, आणि तीं मोठ्या आस्थेनें व्यावहारिक विद्या शिकूं लागलीं. आनंदीबाईला ज्या ज्या वेळीं अवकाश मिळत असे, त्या त्या वेळीं तिनें शेजाऱ्यांच्या घरीं जाऊन, त्यांच्या बायकांचा व मुलांचा क्षेम समाचार घेऊन, त्यांना नाना विषयांवर दोन उपदेशाच्या गोष्टी समजून सांगाव्या. या तिच्या उपदेशानें शेजारच्या बायांना, लोकांशीं कसें वागावें, पांघुरणें स्वच्छ कशीं ठेवावीं, घर निर्मळ कसें राखावें, सामानसुमानाची जतन कशी करावी, आदिकरून गोष्टींचें ज्ञान, सहज प्राप्त झालें. आणि त्याप्रमाणें थोड-थोड्या त्या वागूंही पण लागल्या.

आनंदीबाईनें या प्रचंड कामास आरंभ करून पूर्ण एक वर्ष झालें, तसें तिनें त्या उभ्या वर्षाचा हिशोब करून पाहिला, तेव्हां प्रत्येकीचे वांट्यास पन्नास रुपयांहून कांहीं कमी आले नाहींत, असें आढळून आलें. आणि कोणाचे हिशास पाऊणशें, कोणाचे हिशास शंभर, असे देखील रुपये आले. ही गोष्ट तिनें आनंदरावाचे कानावर घातली, तेव्हां, पुढील शनिवारीं शेजारी लोक जेव्हां त्यांचे येथें जमले, तेव्हां अमक्याचे बायकोचे अमुक, तमक्याचे बायकोचे तमुक, असें त्या सर्वांना आनंदरावानें सांगितलें, आणि म्हटलें, "जर तुम्हीही आपल्या स्त्रियांप्रमाणें आपल्या प्राप्तींतून थोडथोडा पैसा राखून ठेवाल, तर तो तुमच्या संकटाचे वेळीं तुम्हांस फार उपयोगी पडेल; आणि संकटाचे वेळीं जरी उपयोगी न पडला, तरी, तो तुमच्या सुखाला कारण होईल." नंतर त्यानें प्रत्येकाची प्राप्ति काय, कुटुंबांत मनुष्यें कोण कोण, त्यांना खर्च लागतो किती, हें सर्व कांहीं विचारून घेतलें. आणि त्या प्रत्येकाला शिलकीस किती किती पाडतां येईल, हेंही सांगितलें. नंतर त्यानें आपल्या पूर्व स्थितीचा सगळा इतिहास सांगून, त्यावरून त्यांच्या मनांत चांगला ठसे, असा त्यांना बोध केला. तेव्हां त्या सर्वांनीं आपापल्या प्राप्तींतून थोडथोडी रकम, आनंदरावापाशीं आणून द्यावयाचें कबूल केलें, आणि तेव्हांपासून महिन्याचे महिन्यास ती रकम ते नेमानें आणून देऊंही लागले. कांहीं वर्षांनीं त्यांचा हा सांठलेला पैसा, आणि आपला स्वतःचा कांहीं पैसा, असा एकत्र करून, आनंदरावानें त्यांस रहाण्याक

रितां लहान लहान कौंवळी घरें बांधून दिलीं. आणि त्यांच्या-पैकीं कित्येक दुसऱ्यांच्या गाड्या हांकण्याचें काम करीत असत, त्यांस स्वताहाच्या गाड्या करून दिल्या, व त्या गाड्यांकरितां बैल आणि घोडे हेही घेऊन दिले. याप्रमाणें कोणाला कांहीं, कोणाला कांहीं, असें सर्वांना त्यांच्या त्यांच्या उदरनिर्वाहाचें साधन करून दिलें; आणि त्यापासून त्यांना जो फायदा होई, त्यांतून खर्चापुरते पैसे तेवढे घेऊन, बाकीचे पैसे ते आनंदरावापाशीं आणून देऊं लागले. असें करतां करतां, कांहीं दिवसांनीं घरें बांधायास आणि गाडी, घोडा, बैल, इत्यादि विकत घ्यावयास लागलेला सर्व कांहीं पैसा उभा झाला; आणि प्रत्येकाचें उपजीविकेचें साधन स्वतःहाचे घरचें होऊन गेलें. पुढें तीन चार वर्षांनीं त्या प्रत्येकाची स्थिति इतकी चांगली होऊन गेली कीं, कोणी चारशें, कोणी पांचशें, अशा रुपयांचे असामी होऊन गेले. या सुमारास दुसरी लक्षांत ठेवण्यासारखी एक गोष्ट घडून आली, ती ही कीं, हे लोक रहात असत त्या वाडीचा धनी आपल्या उधळ्या स्वभावामुळें फार कर्जबाजारी होऊन, तें त्याचें कर्ज फेडण्याकरितां, त्या वाडीचें लिलांव होणार, अशाबद्दल शेरीफ मार्फत जाहीरनामा लागला. तेव्हां आनंदरावानें आपल्या शेजाऱ्यांचे विचारानें ती वाडी विकत घेण्याचें ठरविलें. आणि लिलांव होऊं लागलें तेव्हां, सर्वांपेक्षां अधिक किम्मत चढवून ती वाडी विकत घेतली. नंतर त्याचे लहान लहान तुकडे करून, ते त्यांच्या सामर्थ्याप्रमाणें त्यांजकडून विकत घेवविले.

याप्रमाणें त्या ठिकाणीं आनंदरावाची एक लहानशी नगरी झाली; परंतु त्या नगरीमधील रहाणाऱ्या मंडळीचीं घरें दारें, त्याचें आरोग्य चांगलें रहाण्याजोगीं करावीं, अशी आनंदरावाचे मनांतून फार इच्छा होती. पण त्या कामाला खर्च बराच होईल असें वाटल्यावरून, आणि हें शेजारचे मंडळीला कळलें तर, ते कदाचित् या गोष्टीला आपली सम्मति देणार नाहींत, या भितीनें, त्यानें ही गोष्ट त्यांच्याजवळ मुळींच काढली नाहीं. परंतु या सुमारास दैवयोगानें त्याचा हा हेतु सिद्धीस गेला. तो असा. एके दिवशीं मध्यानरात्रीचे समयीं, त्याचे घरापासून थोड्याच अंतरावर एका आळीस, केरोसन तेलाचा दिवा एकाएकीं भडकल्यामुळें मोठी आग लागली; आणि त्या योगें ती आळीची आळी अगदीं जळून खाक झाली. ही जागा मोकळी झाली तशी, आनंदरावानें सर्वांचे विचारानें, मोऱ्यांतील पाणी दूर वाहून नेण्याकरितां कांहीं गटार बांधविले. स्त्रियांकरितां ह्मणून कांहीं निराळेच शेतखाने करविले. एकदोन उत्तर दक्षिण असे नवीन रस्ते केले, आणि त्या रस्त्याचे दुतर्फा, उंच पाया व भिंती घालून कांहीं घरें बांधविलीं. आणि ते उत्तर दक्षिण दोन रस्ते ज्या ठिकाणीं एकमेकांना मिळत होते, त्या ठिकाणीं मधोमध लहानसें पटांगण सोडून, तेथें एक सुंदर बागशाई उठवून दिली. आणि त्या बागामध्यें दोन लहानशा पाण्याच्या टांक्या बांधविल्या. वाडीमधील ही सगळी व्यवस्था पाहून, कित्येक अशिक्षित लोकांनीं तिला

" सुधारलेल्या बामनाची वाडी " असें नांव दिलें. आणि पुढें सर्व लोकही तिला त्याच नांवानें ओळखूं लागले. याप्रमाणें सर्व कांहीं व्यवस्था केल्यावर त्या वाडींतील रोगराईचा अगदीं बीमोड होऊन गेला. या छोटेखानी नगरीचा राजा आनंदराव आणि राणी आनंदीबाई, हीं होत. जर अशा सर्वच राजाराण्या मिळून आपापलीं राज्यें, व्यवस्थित रितीनें हांकवील, तर, या संसारांत येणाऱ्या अनेक संकटांचा ऱ्हास होऊन सर्व मनुष्यमात्रांस सुख प्राप्त होईल, यांत संशय नाहीं.

## प्रकरण चौदावें.

### सिंहावलोकन.

आनंदराव व आनंदीबाई, हीं याप्रमाणें परोपकार साधनामध्यें गुंतून गेल्यामुळें, कुटुंबांतील कर्तव्यकर्में विसरून जाऊन त्यांजकडेस त्यांनीं दुर्लक्ष केलें, असें नाहीं. आनंदीबाईनें सगुणीला गृहकृत्यामध्यें अशी निपुण करून सोडली कीं, घरांतील बहुतेक सर्व कारभार स्वतः सगुणीच पाहूं लागली. सगुणीचा लहानसा पगार आनंदीबाईनें व्याजीं लावून त्याला भर घालावी. सगुणीला अवांतर खर्च कांहीं एक नव्हता. मात्र राजापुरास ज्या ब्राह्मणाचे घरीं ती राहिली होती, त्या ब्रा-

ह्मणाला एकुलता एक लहान मुलगा होता, आणि त्या मुलावर सगुणीचा फार लोभ असे. जेव्हां राजापुरास सगुणीचे ओळखीचा कोणी मनुष्य जात असे, तेव्हां तिनें त्याजबरोबर त्या मुलाला कांहीं तरी खाऊ किंवा खेळणीं हीं मोठ्या आवडीनें पाठवावीं. हाच काय तो वर्षाचे कांठीं तिला तीन चार रुपयांचा खर्च होत होता.

घराचे पुढील दारचे व मागीलदारचे लहानशा बागांमध्यें, आनंदीबाईनें सुंदर सुंदर फुलझाडें, आणि शोभायमान वृक्षलता, हीं लाविलीं होतीं, आणि याचेशिवाय त्या बागांमध्यें नानाप्रकारचा भाजीपालाही तिनें लाऊन दिला होता. गृहस्थाश्रमाला ह्मटलें ह्मणजे, शोभायमान सामग्रीचे पेक्षां, उपयुक्त अशाच वस्तु विपुळ उत्पन्न केल्या पाहिजेत. आणि याप्रमाणें आनंदीबाईनें, आपल्या बागामध्यें भाजीपाल्याची अगदीं गर्दी करून सोडिली होती, ह्मणून तिला शाखभाजीपैकीं कोठलाही जिन्नस फारकरून बाजारांतून विकत आणावा लागत नसे. पण कधीं कधीं शेजारचे लोकांनाही वांटून देतां यावा, इतका विपुळ भाजीपाला तिचे बागामध्यें सांपडावा.

आनंदीबाईला नासाडीचा फार तिटकारा असे. यत्किंचित् सामान्य वस्तूचा देखील, उगाच कारणाशिवाय जर नाश होत आहे, असें तिनें पाहिलें, तर, त्यापासून तिला फार दुःख वाटावें. तिचे येथें पिठाचा कोंडा, उरला सुरला भात, खरकटें, शाखभाजीचीं टरफलें, आदिकरून जिन्नस, उगाच टाकून द्यावे लागत असत, हें

पाहून तिला वारंवार फार वाईट वाटत असे. शेवटीं ही नासाडी टाळण्याकरितां, तिनें एक युक्ति शोधून काढली. ती अशी. आनंदरावाला सांगून तिनें एक चाळीस रुपयांची गाय विकत घेतली. गाय वर्णानें दुधासारखी पांढरी होती, ह्मणून तिनें तिचें नांव धवली असें ठेविलें. धवली दररोज सांजसकाळ असें मिळून सात शेर दूध देत असे. त्या दुधापासून आनंदीबाई दहीं, ताक, लोणी, मलयी, कढी, असे नानाप्रकार उत्पन्न करूं लागली. धवली घरीं आणल्यापासून आनंदीबाईची कोणतीही वस्तु वायां जाईनाशी झाली. तिचे शेणापासून तर बागालाही उत्तम प्रकारचें खत मिळूं लागलें. धवळीकरतां दिवसांतून दोन आण्यांपेक्षां अधिक खर्च होत नसे. धवलीला चारावैरण घालायची सर्व कांहीं व्यवस्था नारायणराव हा करीत असे. नारायणानें पूर्वीचें कचेरींतील हमालीचें काम सोडून, आनंदरावाचे नवीन कचेरीमध्यें तो पटेवाला होऊन राहिला होता. तेव्हांपासून त्या कचेरीमध्यें त्याला राव ही पदवी मिळाली. आणि शेजारचे सर्व लोकही त्याला नारायणराव या नांवानेंच हांका मारूं लागले.

आर्बथनाट साहेबानें नवीन काढलेली पेढी, आनंदरावाचे परिश्रमानें दिवसेंदिवस फार भरभराटीस येऊं लागली. हें पाहून आर्बथनाट साहेब मोठे खुष झाले. आणि, त्यांनीं दोन वर्षांचे आंतच आनंदरावाला दोनशें रुपये पगार वाढविला. यावेळीं आनंदरावानें आनंदीबाईचे अनुमतानें एक लहानसा तट्टु व शिग्राम गाडी ठेविली.

हा गाडीघोडा ठेवल्यापासून, त्याचेसाठीं त्याला, दरमहा पंचवीस रुपये खर्च येऊं लागला. परंतु इकडे घरखर्चामध्यें आनंदीबाईनें बरीच काटकसर केली. ती अशी. मागें सांगितलेंच आहे कीं, आनंदीबाईचे घरीं, दररोजचे खर्चास लागणारा दाणागोटा आदिकरून सर्व कांहीं जिन्नस, महिन्यास पुरतील अशा बेतानें, ती वाऊक खरेदीनें महिन्यांतून एक वेळ आणीत असे. पण, आतां तिचे शेजारचे लोक खाऊनपिऊन चांगले गबरू झाल्यामुळें, त्यांच्या विचारानें तिनें एक सामायिक कोठार स्थापन केलें. आणि हें कोठार तिनें आपल्या घरामध्यें उघडलें. ज्यावेळीं ज्या जिनसाचा हंगाम असे, त्यावेळीं, ते ते जिन्नस सर्वांस वर्षभर पुरतील अशा बेतानें, कोणा दलाला मार्फत व्यापाराचे भावानें तिनें एकदम खरेदी करावेत. आणि कधीं कधीं कित्येक जिन्नस मुंबईंत चांगले व सोईवार मिळत नसल्यास, ते तिनें बाहेरगांवाहून खरेदी करून आणवावे. या युक्तीनें सर्वांचा खर्च थोडक्यांत आटपून, शिवाय दाणागोटा सर्व कांहीं जिन्नस त्यांस चोख मिळूं लागला.

स्वताहाचा गाडी घोडा झाल्यावर, आनंदीबाई कधीं-मधीं सायंकाळचे वेळीं आनंदरावाबरोबर बाहेर फिरायास जाऊं लागली. पण याचे शिवाय माहेरीं जाण्यायेण्याला विशेष सोई झाली, हें पाहून तिला विशेष आनंद वाटूं लागला. बाहेर फिरायास निघाली ह्मणजे, आठवड्यांतून दोन वेळ तरी आईला भेटून ती येत असे. आणि जेव्हां जेव्हां ती जाई, तेव्हां तेव्हां आईला आवडणाऱ्या

पदार्थांतून एकादा पदार्थ तिनें आपल्याबरोबर न्यावा. आनंदीबाईची आई, आपल्या जांवयासाठीं व कन्येसाठीं नेहमीं कांहींना कांहीं मेवामिठायी पाठवीत असायची. आणि कधींमधीं त्या मिठायीबरोबर जांवयाचे नांवें एक पत्रही तिनें पाठवावें. आणि त्या पत्रामध्यें एकादेवेळीं आनंदीबाईचें नांव चुकून ल्याहायाचें राहिलें, ह्मणजे तिनें माहेरीं जाऊन आईला ह्मणावें;—" कांग आई, आतांशा मजवर तुझी माया पातळ झाली, नाहीं का! बरें, आतां यापुढें तूं एकादा खायाचा जिन्नस पाठीव तर खरी, मग शपथ आहे, तो कोण तोंडांत घालील त्याला!! ज्यांच्याकरितां तूं पाठवितेस, तेच बापडे एकटे खाणार असतील तर खावोत!" आनंदरावाबरोबर आनंदीबाईची जेव्हां जेव्हां थोडीशी चुरसाचुरस होई, तेव्हां तेव्हां, हीच एक गोष्ट पुढें पुढें येई. कधीं कधीं आनंदीबाईनें गाडी पाठऊन भावावहिणींना आपल्या घरीं पाचारण करावें, आणि त्यांना मोठ्या आवडीनें कांहीं तरी गोड पोळी करून घालावी.

## प्रकरण पंधरावें.

### हें कांहीं स्मशान क्षेत्र नव्हे.

आनंदीबाईचें लग्न होऊन सुमारें पांच वर्षं होत आलीं. तोंपर्यंत तिचे पोटीं कांहींएक मूलबाळ झालें नाहीं. हें पाहून सगुणीनें फारच कष्टी व्हावें, आणि

जेव्हां तेव्हां आनंदीबाईला ह्मणावें,–" बाई, आपणाला एखादें लेकरूं झालें असतें, तर त्याला मी पोटाशीं धरून सारा दिवस नाचलें असतें." त्यावर आनंदीबाईनें हांसून ह्मणावें,–" सगुणाबाई ! काय, आमच्या येथें मुलांचा तोटा आहे वरें !!" पण ह्या उत्तरानें सगुणीचें समाधान न होतां, तिनें ह्मणावें–"अहो, दुसऱ्यांचीं मुलें झालीं ह्मणून का त्यांवर आपली सत्ता आहे वरें! आपण दुसऱ्यांचे लेंकरांवर कितीही जीवप्राण घातला, तरी तीं शेवटीं लोकांचीं तीं लोकांचींच."

आनंदीबाई–(हासून) अहो सगुणाबाई, हें एवढें ब्रह्मज्ञान आपणांला केव्हांपासून कळूं लागलें?

सगुणी०–यांत ब्रह्मज्ञान तें कसचें बैनी ! हें एकाद्या तान्ह्या लेंकराला विचाराल, तर तेंही सांगू शकेल !!

आनंदी०–तर मग सगुणाबाई तुह्मी दुसऱ्यांचे मुलांवर इतका जिवप्राण कां वरें घालीत होतां? आणि अझूनही त्याचे करितां कधींमधीं पैसे कां खरचीत असतां? आणि त्याची आठवण पडली ह्मणजे तुह्मांला रडूं कां वरें येतें? आणि आतां तेंच दुसऱ्याचें इयें मूल नाहीं ह्मणून, तुह्मांला इतकी रात्रंदिवस काळजी ती कां ?

हें ऐकून सगुणी अगदीं कुंठित होऊन गेली. आणि शेवटलें वाक्य ऐकून तर तिचे काळजावर डाग द्यावा तसें झालें. ती कांहीं वेळ आनंदीबाईचे तोंडाकडेस टकमक पहात राहिली, आणि शेवटीं ह्मणाली,–" बाई, लोक कोण ? आपण का ! आपण तर जेव्हां तेव्हां माझी सगुणाबाई, माझी सगुणाबाई

असें मी दुसऱ्याजवळ ह्मणतां, तें सगळें एकून मिथ्या वाटतें!!" असें ह्मणतां ह्मणतां, तिचे डोळे पाण्यानें भरून आले, आणि ती मुळमुळ करून रडूं लागली.

सगुणेला, या अशा बोलण्यानें इतकें वाईट वाटेल, ही कल्पना आनंदीबाईचे लक्षांत पूर्वी आली नाहीं. तिनें आपल्या पदरानें सगुणीचे डोळे पुसून तिला ह्मटलें,—"सगुणाबाई, असें वेडीसारखें काय करतां बरें? उगी रहा. मी कांहीं तुह्मांला लोक समजतें होय? वास्तवीक पहातां, या संसारामध्यें ह्मटलें ह्मणजे, सर्व लोक परकीयच आहेत; एक मात्र उत्पन्नकर्त्या परमेश्वराशिवाय, आपला असा ह्मणायाला दुसरा कोणी नाहीं. एऱ्हीं पाहिलें असतां ज्याला आपलें असें करावें, तेंच खरोखर आपलें आहे. ज्यांच्याशीं रक्तमांसाचा आपला कोणताही संबंध नाहीं, असे लोक, वेळ प्रसंग आला असतां, आईबाप, भाऊबहिण, यांच्यापेक्षांही आपल्या अधिक उपयोगीं पडत असतात; असें आपण नेहमीं पहातों. आतां सगुणाबाई तुह्मीच पहा कीं, तो ब्राह्मणाचा मुलगा तुमचा कोणी कांहीं आप्तसोयऱ्यांतला होता? नाहीं. पण त्याचेसाठीं तुमचा जीव अझून इतका खालीं वर कां बरें होत असतो? तर ही गोष्ट समजून देण्याचे हेतूनें मी तुह्मांस ह्मणालें कीं, दुसऱ्याचें लेंकरूं जरी झालें, तरी त्याचेवर आपल्या मनाचें शांतवन करितां येतें."

असो. आनंदीबाईचे पोटीं हा वेळपर्यंत कांहीं एक मूलबाळ झालें नाहीं, हें पूर्वी सांगण्यांत आलेंच

आहे. तथापि तिचें घर स्मशान क्षेत्रासारखें सुनें नव्हतें. लहान लहान मुलगे व मुली यांचे कल्लोळानें तिचें घर नेहमीं गजबजलेलें असे; त्यांचें उडणें बागडणें, व धांवणें पळणें, यांचे योगें तिचे आवारांतील जमीन अगदीं दणदणून जात असे. दुसऱ्यांचे लेंकरांस खायास देणें, त्यांस कपडे करणें, आणि हरएक प्रकारें त्यांची स्थिति सुधारणें, यांत आनंदीबाईला मोठें सुख व समाधान वाटत असे. कोणी ह्मणेल कीं, या गोष्टीपासून आपला नांवलौकिक वाढावा, या हेतूनें ती इतकी झटत होती, तर असा मुळींच अर्थ नव्हता. पण उलटा या गोष्टीचा तिला भारी कंटाळा असे. केवळ दुसऱ्यांच्या लेंकरांचें संगोपन करण्यामध्येंच तिला एक प्रकारचा उल्हास वाटत असे, ह्मणून ती त्यांकरितां इतकी झटत असे. शेजारचे लेंकरांस आपल्या घरीं बसवून, त्यांना लिहिणें वाचणें शिकविण्यास आरंभ करून, तिला आज दोन वर्षें होत आलीं. पहिल्यानें एक दुःखकारक गोष्ट घडून आली, तीवरून ही रीति प्रचारांत आली. ती गोष्ट ही कीं, ज्या बाया शिवणकामाला आनंदीबाईचे येथें जमत असत, त्यांचीं मुलें बहुतकरून इतके दिवस घरीं एकटींच रहात असत. आणि अशीं घरीं राहिलीं ह्मणजे, त्यांनीं मनास वाटेल तिकडे बोकलत असावें. एके दिवशीं तीं अशीं उडत बागडत विहिरीचे कांठीं गेलीं; आणि तेथें धिंगामस्ती करितां करितां, त्यांपैकीं एक लेंकरूं त्या विहिरींत पडलें. दैवयोगानें बरें

झालें कीं, त्या विहिरींत पुष्कळ पाणी नव्हतें, ह्मणून त्या लेंकराचा प्राण वांचला. नाहीं तर त्यावेळीं तें ठार मरायाचेंच. परंतु विहिरींत पडल्याचेयोगें त्या मुलाचे शरीरास पराकाष्ठेची इजा झाली. तेव्हां त्या मुलाला आनंदीबाईनें आपले घरीं आणलें, आणि चार दिवस त्याला एकसारखे औषध उपचार करून, व त्याचा खाण्यापिण्याचा बंदोबस्त ठेऊन, त्याला थोडेंसें हिंडतें फिरतें केलें. फार काय सांगावें, पण पहिला दिवस तर तिनें अहोरात्र त्या मुलाला मांडीवर घेऊन काढला. या घडलेल्या भयंकर गोष्टीवरून मुलांना घरीं एकटें ठेवणें हें बरोबर नाहीं, असें आनंदीबाईला वाटूं लागलें. आणि तेव्हांपासून त्या मुलांना लिहिण्यावाचण्यास शिकविण्यासाठीं, आणि त्यांचा सांभाळ करण्यासाठीं ह्मणून, एक शाळा आपल्या घरीं स्थापन केली. याप्रमाणें त्या वाडींतील झाडून सारे मुलगे व मुली आज दोन वर्षें या शाळेंत येऊन शिकूं लागलीं. आनंदीबाईनें त्या शाळेंत शिकविण्याची बहुतेक रीति, जर्मनीचा प्रसिद्ध पंडित, प्रोफेसर फ्रेबलर याच्या पद्धतिप्रमाणें चालू केली होती. लहान लहान लेंकरांना तर तिनें नानाप्रकारची करमणूक दाखवून, त्यापासून त्यांना उपदेश व शिक्षण देत असावें. तिचे या शिकविण्याचे पद्धतीवरून मुलांना कांहीं एक जड न वाटतां, तीं मोठ्या हौसेमौजेनें येऊन तिचे येथें शिकूं लागलीं.

ही शाळा स्थापन होऊन कांहीं महिने लोटल्यावर, आनंदीबाईचे वाचण्यांत एक इंग्रजी पुस्तक आलें;

त्यांत असें लिहिलें होतें कीं, बेलज्यम देशांत, अगदीं गरीब लोकांच्या मुलांस शिकविण्याकरितां घातलेल्या शाळांतून, एकेक फंड जमा केला जातो. आणि त्या फंडास प्रत्येक मूल दर आठवड्यास एक पेनि, ह्मणजे आठ पै पर्यंत पैसा टाकीत असतें. याप्रमाणें गरीब मुलांनीं जमा केलेल्या फंडापासून एका वर्षांत ऐशीं हजार रूपये उभारले गेले. हें वाचून आनंदीबाईनेंही आपल्या शेजारच्या मुलांच्या कल्याणार्थ ह्मणून, या प्रकारचा एक फंड उभा केला. आणि त्या फंडांत प्रत्येक मुलानें दर आठवड्यास एक एक पैसा आणून घालावा असें ठरविलें. तिनें आरंभापासूनच सर्वांचे विचारानें असा एक चांगला नियम करून टाकला होता कीं, तिच्या त्या लहानशा नगरीमध्यें कोणाला लेंकरूं झालें ह्मणजे, त्या लेंकराचे बारशाचे दिवशीं, त्याचे नांवें प्रत्येक स्त्री पुरुषानें एक एक रूपया द्यावा, असें सर्वांच्या विचारानें तिनें ठरविलें होतें. तिचे शाळेमध्यें एकंदर मुलगे व मुली मिळून, चोवीस जणें शिकावयास जात असत, त्या सर्वांना या उपयुक्त ठरावाचा उपभोग घेतां येईल अशी व्यवस्था तिनें करून ठेविली होती. दुसरा एक ठराव आनंदीबाईनें असा केला होता कीं, जितके ह्मणून रोजगारी लोक होते, त्या सर्वांनीं आपआपल्या मुलाचे नांवें एक वर्षपर्यंत दरमहा दोन दोन रुपये आनंदीबाई पाशीं आणून द्यावे. या व दुसऱ्या आणखी कांहीं तजविजींनीं एक वर्षाचे अखेर, दरएक मुलाचे नांवें शंभर शंभर रुपये जमा झाले. तेव्हां

दुसऱ्या वर्षापासून कोणाला कांहींच द्यावें लागलें नाहीं. जेव्हां नवीन मूल जन्मास येई, त्यावेळीं मात्र प्रत्येकाला त्याचे बारशाचे दिवशीं एक एक रुपया काय तो द्यावा लागे. याप्रमाणें मुलांचे नांवें सांठविलेला पैसा ब्यांकेंत ठेवण्याचे ऐवजीं कोणत्या तरी चांगल्या व्यापारांत घातला असतां तो वृद्धि पावतो, असें आनंदीबाईला वाटून तिनें तो व्यापारांत घातला. या प्रकारें आनंदीबाईनें आपल्या लहानशा नगरींतील मुलांलेंकरांचा, आणि भावि संततीच्या पोटपाण्याचा एका प्रकारें बंदोबस्त करून ठेविला, असें ह्मणण्यास कांहीं चिंता नाहीं. आनंदीबाईची ही व्यवस्था जर सर्व भरतखंडामध्यें प्रचारांत येईल, तर, त्यापासून पुढील संततीवर अगणित उपकार होऊन, त्याचें फळ किती सुंदर निपजेल बरें !!

ह्याप्रमाणें, परोपकाराच्या अत्यंत पवित्र कामांत आनंदराव आणि आनंदीबाई हीं उभयतां जरी अगदीं गढून गेलीं होतीं, तरी, जन्मास येण्याच्या मुख्य सार्थक्याकडे त्यांचें दुर्लक्ष झालें होतें, असें नाहीं ; एवढेंच केवळ नव्हे ; तर, त्या कामांत त्यांचें पाऊल दिवसेंदिवस पुढें पुढें पडत चाललें होतें. ज्यानें हें विश्व निर्माण केलें आहे, त्या विश्वंभराची भक्ति करणें, त्यास शरण जाणें, त्याचें चिंतन करणें, त्याजपाशीं आपलीं पापें कबूल करणें, त्यांबद्दल त्याची क्षमा मागणें, आणि निरंतर पवित्र कामाची वासना त्याजपाशीं मागून, मरणोत्तर आत्म्यास शांति, देण्याविषयीं अनन्यभावेंकरून प्रार्थना करणें, हें जें जन्मास आल्याचें

मुख्य फळ; तें, त्यांच्या उभयतांच्या दृष्टीपुढें निरंतर असे, आणि त्याच्या अनुरोधानें तीं उभयतां वर्तत असत. परमेश्वरभक्ति हेंच त्यांचें मुख्य आनंदसाधन असे. सकाळ संध्याकाळ प्रार्थना आणि उपासना करणें, हें त्यांस अत्यंत संतोषपर वाटे. आणि त्यावेळीं तीं जणु काय भक्तिसमुद्रांत मोठ्या आनंदानें पोहताहेत अशीं दिसत. "तुझा विसर न व्हावा" हेंच त्यांचें मागणें देवापाशीं निरंतर असे. अशीं ज्यांचीं प्रेमळ मनें होतीं, त्यांस इहलोकींचीं कामें करतांना सुख व्हावें, आणि मरणा नंतर उत्तम गति प्राप्त व्हावी, ह्यांत कांहीं विशेष नाहीं. अमृतपान केल्यावर अमरत्व यावें, ह्यांत नवल तें कोणतें? जी गोष्ट आनंदराव आणि आनंदीबाई ह्यांस साधली आणि फलद्रूप झाली, ती गोष्ट दुसऱ्या कोणालाही साधण्यासारखी आणि फलद्रूप होण्यासारखी आहे. ह्मणून आमच्या मित्रांनो आणि मैत्रिणींनो, तुह्मी ह्या दंपतीच्या आचरणाचा कित्ता घ्या; उद्योग करा; शांति धरा; आणि परमेश्वरावर भाव ठेवून, आपलीं सर्व कामें, शुद्ध मनानें, परोपकारार्थ करा; ह्मणजे तुह्मांस इहलोकीं शांति, आणि परलोकीं उत्तम गति, ह्या खचीत खचीत प्राप्त होतील.

समाप्त.

# वधूदर्पणमाला. १.

## या पुस्तकाबद्दल पत्रकर्त्यांचे आणि इतर लोकांचे अभिप्राय.

(डायरेक्टर आफ् पब्लिक इन्स्ट्रक्शन, आणि दक्षिणा प्राइझ कमेटिचे सेक्रेटरी, यांनीं सुचविल्याप्रमाणें हें पुस्तक शोधलें जाऊन याची दुसरी आवृत्ति निघणार आहे.)

सर डब्ल्यु. वेडरबर्न, बार्ट, पुण्याचे जज्ज, व सेशन जज्ज, दक्षिणेंतील सरदारांचे एजंट आणि मुंबईच्या हैकोर्टाचे मा॰ जज्ज हे, ग्रंथकर्त्याला आलेल्या एका पत्रांत असें लिहितात—

"I made enquiries among my Native friends regarding your previous work "Vadhû Darpan," and was pleased to find that they spoke very favourably of it."

---

सुबोधपत्रिका, ता. २२।१।८२.

ह्या पुस्तकाच्या गुणाकडे पाहातां एकंदरीत हें पुस्तक स्त्रियांनीं अवश्य वाचावें असें आहे. त्यांस ह्यापासून केवळ करमणूक होईल असें नाहीं तर यापासून त्यांस बोध होईल व त्यांचा स्वभाव व वर्तन अंशतः तरी सुधारतील यांत संशय नाहीं. आमच्या स्त्रियांची सुधारणा व्हावी असें ज्या ज्या आमच्या देशबंधूंस वाटत असेल त्यांनीं हें पुस्तक आपल्या घरच्या स्त्रियांकडून अवश्य वाचवावें.

---

इंदुप्रकाश, ता॰ २०।२।८२.

हें स्त्रियांच्या मनांत सदाचरणाच्या मूलतत्वांचा ठसा उठविण्याच्या उद्देशानें लिहिलें आहे. ह्याची भाषा बरी आहे, व ह्यांत ज्या गोष्टी सांगितल्या आहेत, त्या बऱ्याच बोधप्रद आहेत.

हें पुस्तक सर्व कुटुंबांत संग्रह करण्यासारखें आहे. अशा प्रकारचीं पुस्तकें आमच्या देशांतील स्त्रियांची योग्यता वाढण्यास अत्यंत आवश्यक आहेत.

---

ज्ञानोदय, ता॰ २३।२।८२.

या पुस्तकाची भाषा चांगली साधारण लोकांच्या वहिवाटींतील असून याचें वाचन चित्तवेधक आहे. स्त्रियांस तर तें शेवटपर्यंत वाचल्याशिवाय सोडवत नाहीं.

यांत एतद्देशीय लोकांच्या अं—

तःपुरस्थ रीतिभाती चांगल्या दाखविल्या आहेत. यास्तव युरोपियन वगैरे ज्या परकीय लोकांस ह्या रीतीभातींची माहिती व्हावी अशी इच्छा असेल त्यांनीं हें पुस्तक लक्षपूर्वक वाचून व पुरतें समजून घ्यावें. हालिकडे "एक धड ना भाराभर चिंध्या" या म्हणीप्रमाणें ज्या बहुत वायग्या कादंबऱ्या ( नावेलें ) झाल्या आहेत त्यां सारख्या आणखी न होतां, या वधूदर्पण सारख्या बोधपर व सुशिक्षणदायक गोष्टी हिंदु, मुसलमान व ख्रिस्ती बायांसाठीं होतील, तर फार चांगलें होईल असें आह्मांस वाटतें.

---

सत्यवादी, ता० १।३।८२.

ह्या पुस्तकाचा स्त्रियांस उपयोग झाल्यावाचून राहणार नाहीं. ह्यांत मनरंजन असून बोध व उपदेश व सुधारणुकेसंबंधी सूचना आहेत. स्त्रियांकरितांच चांगल्या पुस्तकांची महाराष्ट्र भाषेंत फार उणीव आहे. मि० गांगनाईक ह्यांनीं लोककल्याणबुद्धीनें हें पुस्तक श्रमपूर्वक तयार केलें यावरून यांची तारीफ करण योग्य आहे.

---

दीनबंधु, ता० १९।३।८२.

अशा उपयुक्त पुस्तकाची योजना मुलींचे शाळेंत केली असतां खरोखरच फायदे होणार आहेत. त्याचप्रमाणें ज्या कोणास आपापली गृहस्थिति सुधारावी अशी इच्छा असल्यास हें पुस्तक घेऊन त्यांतील थोडथोडा भाग दररोज घरांतील मनुष्यास वाचून दाखविल्यास त्यापासून फायदेच होतील. हें पुस्तक खरोखरच आश्रय देण्यास योग्य आहे.

---

नेटिव्ह ओपिनियन, ता. १।४।८२.

पुस्तकांत ग्राह्यांश पुष्कळच सांपडेल यांत संशय नाहीं.

पुष्कळच भाग अत्यंत संसारोपयोगी होईल.

केसरी, ता० ४।४।८२.

प्रथमतः उपोद्घात घेऊं. हा फार बहारदार आहे. ह्यांत रा० गांगनाईक यांनीं आपली लिहिण्याची शैली बरीच दाखविली आहे; ह्यांनीं आमच्या आर्य मुलांस व मुलींस त्यांच्या आयुष्यक्रमाचें मनांत ठसण्याजोगें ज्ञान थोडक्यांत करून देण्याचा प्रयत्न केला आहे व तो पुष्कळ अंशीं सफळही झाला आहे.

हा भाग फारच मनोरंजक, उपदेशपर, व आवडता होईल अशी आमची पक्की खात्री आहे.

---

पंडिता रमाबाई यांच्या एका पत्रांतील उतारा. ता० १७।८।८२.

वधूदर्पण हें पुस्तक फार मनोरंजक आणि स्त्रियांस उपयुक्त अशा नीतीचें ज्ञान करून देण्यास विशेषेंकरून फार उपयोगी पडणारें आहे.

यांतील हिराबाईच्या बापाचीं पत्रें आणि उपोद्घात वगैरे नीतिप्रदर्शक भाग फार उत्तम असून सरळ आणि सुरस भाषेंत लिहिलेले आहेत. ते वाचतांना मनांत त्यांचें स्वरूप चांगलें ठसतें. एकंदरींत हें पुस्तक प्रत्येक गृहांतील स्त्रियांच्या फारच उपयोगी पडणारें असल्यामुळें तें सर्वांनीं आपल्या संग्रहीं अवश्य ठेवावें अशी विनयपूर्वक देशबांधवांस आणि भगिनींस माझी सूचना आहे.

---

रेव्हरेंड मि. गणपतराव नवलकर हे आपल्या एका पत्रांत असें ह्मणतात:—

*The diction is most pleasing, and free, as the oregonal Urdu, from the tinsel if false ornament.* I have great pleasure in recommending it to Marathi readers, and to European and other foreign students of the language who would like to read a Marathi book written in a simple but chaste style. . . .

---

# वधूदर्पणमाला. २.

कैलासनिवासी विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचें ह्मणणें अशासारखें आहे कीं, " विलायत सुधारणेच्या उंच शिखरास जाऊन पोंचली आहे तरी, तेथें सामान्य वाचकांकरितां व नवशिक्यांकरितां उपयोगी पडेल असा शास्त्रीय ग्रंथ रचायाचा ह्मटला ह्मणजे, मुलास जसा भात सुरबुरीत करून द्यावा लागतो, त्याप्रमाणें तो अगदीं मूलतत्वरूपानें किंवा संभाषणाच्या वगैरे रूपानें लिहून देत असतात या सोईमुळें ज्यांना नुस्ती अक्षर ओळख होऊन चुकली आहे, त्यास सुद्धां कोणाची मदत फारशी न लागतां, पुष्कळ विष-

यांचा परिचय करून घेतां येतो. मागें विद्याध्ययन हें जसें गुरुमुखावांचून बहुधा अशक्यच होतें, तशी आतां बिलकूल स्थिति नाहीं. ज्यास बरीच बुद्धि आहे, असा मनुष्य सतत उद्योग जर करील तर केवळ स्वतःच्या परिश्रमानें त्यास मोठी विद्वत्ता संपादन करणें, हें, हल्लींच्या काळांत अत्यंत सुलभ झालें आहे." हा विचार मनांत येऊन स्त्रियांना आणि इतर जनांना सहज कळतील अशीं शास्त्रीय विषयांवर सुलभ, सोपीं, आणि उपयुक्त, अशीं पुस्तकें मराठी भाषेमध्यें अद्यापि फारशीं झालीं नाहींत; ह्मणून ही वाण अंशतः तरी दूर करण्याकरितां "वधूदर्पण" च्या मूळ पुस्तककर्त्यानें उर्दू भाषेंत केलेलें "बना-तून-नाआश" या पुस्तकाचें भाषांतर करून, आणि त्याच धर्तीवर अन्य ग्रंथांचे साह्यानें, त्या सर्व विषयांची अधिक परिस्फुटता करण्याचा आमचा विचार आहे. या पुस्तकांत सृष्टिजन्य ईश्वरज्ञान, पदार्थविज्ञान, रसायन, भूगर्भ, आरोग्य, पाक, शिवणकला, स्त्रीसुधारणा, प्रपंचव्यवस्था, आदिकरून शास्त्रीय, व स्त्रीशिक्षणसंबंधी अनेक विषयांचें ज्ञान, कोणाचें आर्जव न करितां, संभाषणानें आणि गोष्टीचे रूपानें सुलभ रीतीनें करून घेतां येईल, असें आहे. या सर्व विषयांचा एकाच पुस्तकांत समावेश करितां येणार नाहीं, ह्मणून याचा पूर्वार्ध आणि उत्तरार्ध, असे दोन भाग केले आहेत. पूर्वार्धामध्यें येणारे विषय अनुक्रमणिकेच्या रूपानें खालीं दिले आहेतः-

१ **विद्या संपादन.**-२ **उद्योगीपणा.**-३ **प्रपंचव्यवस्था.**-४ **शिवणकाम.** (यांत कोणाचें साह्य घेतल्यावांचून स्वतः कपडे बेतून कापणें)-५ **किंतानावरील लोंकरी**

कशीदा.–६ रेशमी कशीदा.–७ पाकशास्त्र (यांत पक्वान्नें, मिठाई वगैरे)–८ कणारांगोळी.–९ बाजार खरेदी (यांत धान्य, भाजीपाला वगैरे पारखून व कसोशीनें घेणें)–१० वेळेची व खर्चाची काटकसर.–११ पतीशीं वागणूक.–१२ एकांतवासांतील वर्तणूक,–१३ आईबाप, बहीणभावंडें, इत्यादि माहेरच्या लोकांशीं वागणूक.–१४ सासूसासरा, नणंदाजावा, आदिकरून सासरच्या माणसांशीं वर्तणूक.–१५ कुटुंबांतील जूट.– येणेंप्रमाणें हे सर्व विषय संभाषण रूपानें दिले आहेत.

*** ह्याप्रमाणें वधूदर्पणमालेच्या पहिल्या पुस्तकाची दुसरी आवृत्ति, आणि दुसरें पुस्तक आतां लवकरच छापायास आरंभ करणार आहों. परंतु हीं दोन्ही पुस्तकें बरींच मोठीं असून, छापण्याचें काम परस्वाधीन असल्यामुळें, तीं केव्हां तयार होतील, हें आजच कांहीं निश्चयानें सांगतां येत नाहीं; ह्मणून, ज्या गृहस्थांस त्यांना वर्गणीदार व्हावयाचें आहे, त्यांनीं, आपलीं नांवें आह्मांकडेस खालील पत्त्यावर पाठवावीं, ह्मणजे पुस्तकें तयार होण्याचे सुमारास दोन महिने अगोदर, वर्गणी पाठऊन देण्याविषयीं त्यांना कार्ड पाठवून सूचना देऊं.

वधूदर्पणमालेच्या पहिल्या पुस्तकाचीं पृष्ठें सुमारें ३०० शें. आगाऊ किंमत एक रुपया, टपाल हांशील २ आणे. मागाहून किंमत अधिक ठेविली जाईल.

वधूदर्पणमालेच्या दुसऱ्या पुस्तकाचीं पृष्ठें अजमासें ३५० शिवाय आंतील विषयांच्या हुबेहूब आकृति सुमारें ७५. आगाऊ वर्गणी १॥ रुपया, टपाल

खर्च २ आणे. मागाहून किंमत जास्त ठेविली जाईल. बांधणी निरनिराळी. १२ प्रतींस एक प्रत कमिशन.

या दोन्ही पुस्तकांची भाषा विशेष काळजीनें लिहून आणि शोधली जाऊन, आंत येणाऱ्या विषयांचें विवेचन जितकें सुलभ, स्पष्ट, खात्रीपूर्वक, आणि अनुभविक देतां येईल, तितकें देण्याविषयीं आज तीन वर्षें आमचा सतत यत्न चालला आहे. आणि ह्मणूनच आज इतके दिवस ते अंक आह्मांस घाई करून काढतां आले नाहींत.

---

# वधूदर्पणमाला.

## ६.

## विधवादैन्यनिरूपण.

(येत्या मे महिन्याचे पहिले तारखेच्या सुमारास तयार होणार.)

वरील नांवाची एक लहानशी कादंबरी उर्दू भाषेंत नुक्तींच प्रसिद्ध झाली आहे. हींत एतद्देशीय लोक गतभर्तृकांस कसें वागवीत असतात, व त्यांना आपलें दुःखमय आयुष्य कसें कंठावें लागतें, याचें हुबेहूब वर्णन केलें आहे. ह्यांतील कथानकाचा सारांश असा आहे:-

"आपल्या लोकांमध्यें मुलीचें संगोपन मुलापेक्षां कमी काळजीनें करण्याची वहिवाट आहे, त्याप्रमाणेंच, एका मुलीचें पालन केलें होतें; तरी तिचे सुदैवानें तिनें संस्कृत आणि मराठी भाषेचें थोडेंसें ज्ञान, लहानपणींच संपादन केलें. परंतु तिचें लग्न, आपल्या लोकांतील चालीप्रमाणें, बालपणींच एका लहान मुलाशीं लावून दिलें. पुढें तो

तिचा नवरा मंद आणि खुनशी असा निघाला. त्याला फार वाईट दुर्व्यसनें जडून, त्यानें तिला फार वाईट रीतीनें वागवावें. पुढें, सुदैवानें असें घडून आलें कीं, तो तिचा नवरा तिजवर प्रीति करूं लागला, आणि तिचे पोटीं एक मुलगाही झाला. दुर्दैवानें हें सुख तिचे नशीबीं फार दिवस भोगण्याचें नव्हतें. कांहीं दिवसांनीं तिचा पति मृत्यु पावला, आणि तिला अत्यंत दुःखावह आणि त्रासदायक अशी वैधव्य स्थिति प्राप्त झाली. त्या स्थितीचें चित्र या ठिकाणीं फार नामी रेखिलें आहे.

ह्या दुःखदायक स्थितींत असतां, तिनें एका वर्तमानपत्रांत अशी गोष्ट वाचली कीं, कोणी एक गृहस्थ जिवंतपणीं मोठा सुधारणा करणारा ह्मणून फारच नावाजला गेला. पण, त्याचे मृत्यूनंतर तो स्त्री होता, असें आढळून आलें. ही गोष्ट वाचल्यापासून तिचे अंतःकरणांत अशी इच्छा उत्पन्न झाली कीं, आपलें बाकी राहिलेलें आयुष्य, वरील स्त्रीप्रमाणेंच स्वदेशांतील विधवांची शोचनीय स्थिति सुधारण्याचे कामीं लावावें. याप्रमाणें निश्चय केल्यावर, ती आपल्या बापाचे येथें गेली. आणि संधी साधून गोसाव्याचा वेष धारण करून नाहींशी झाली. या ठिकाणीं गोसाव्यांच्या नीच व निकृष्टावस्थेचें, आणि त्यांच्या दांभिकपणाचें वर्णन, फार नामी केलें आहे. पुढें ती मुंबईस गेली आणि तेथें तिनें इंग्रेजीचा थोडासा अभ्यास केला.

नंतर तिनें पुणें येथें जाऊन पंडिता रमाबाईची गांठ घेतली, आणि आपल्या देशभगिनींची स्थिति कोणत्या उपायांनीं सुधारतां येईल, या संबंधें तिचेशीं चर्चा चालविली. तेव्हां रमाबाईने " ख्रिस्ती लोकांनीं स्थापलेल्या ज्ञनाना मि-

शनच्या द्वारेंच आपल्या स्त्रियांची स्थिति सुधारली तरच सुधरेल " हें जें तिचें ठरींव मत होतें, तें तिला सांगितलें. परंतु या बाईचें मत त्याविरुद्ध पडून तिनें त्या ठरींव मताचें चांगल्या प्रकारें खंडण केलें.

शेवटीं या विधवेनें सर्व देशसुधारकांची, महाराणीसाहेबांची आणि तिचे मुत्सद्दी लार्ड रिपन साहेब यांची, गतभर्तृकांचा कैवार घेण्याविषयीं करुणा भाकिली आहे. लार्ड विल्यम बेंटिक यांनीं सती जाण्याचें बंद करून, जसे विधवांचे प्राण वांचविले, तसें आतां, लार्ड रिपननें पुनर्विवाहास उत्तेजन देऊन, विधवांस आमरण भोगाव्या लागणाऱ्या विपत्तींचें मोचन करावें. सरकारानें ह्या प्रकरणांत हात घातल्यावांचून, एतद्देशीय लोक विधवांची स्थिति सुधारण्याकडेस लक्ष देतील, अशी मुळींच आशा नाहीं. असें तिनें स्पष्ट सांगितलें आहे.

येणेंप्रमाणें हें उपयुक्त आणि मनोरंजक पुस्तक, आमच्या लोकांच्या रीतिभातींस अनुसरून, भाषांतर रूपानें लोकांपुढें ठेवण्याचा विचार केला आहे. याची पृष्ठसंख्या अजमासें पन्नासांचे वर होईल, असें आहे. हें येत्या मे महिन्याच्या पहिल्या तारखेच्या सुमारास तयार होईल. ज्यांस घेणें असेल त्यांनीं पुस्तकाचे किमतीबद्दल ४ आणे, आणि टपालखर्च अर्धा आणा, आमच्या खालील पत्त्यावर एप्रिल अखेर पाठवुन द्यावा.

भा. के. गांगनाईक,
" इंडियन प्रिंटिंग प्रेसांत,"
मुंबई.